Six monthly ... ... ... ,,
Single copy ... ... ... ... ...

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX — AKOLA MONDAY 2 SEPTEMBAR 1895 — NO 34

वर्ष२९ — आकोला सोमवार तारीख २ माहे सतेंबर सन १८९५ इ० — अंक ३४



## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें असल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमीशनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अब्दुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.


## पुराणप्रकाश

( महाभारत व पुराण ग्रंथांचें सरळ मराठी भाषांतर. )

हल्लींच्या विद्याप्रसारामुळें जुन्या व नव्या मतांच्या लोकांस, आपल्या प्राचीन पुराणादि ग्रंथांत काय तत्व आहे व त्यांत कोण कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत, हें समजून घेण्याची फारच उत्कंठा प्राप्त झाली आहे. असें जाणून सर्वांस घेण्यास सोईवार पडावें ह्मणून आह्मी श्रीमहाभारत, १८ महा पुराणें व उपपुराणें यांचें सरळ मराठी भाषांतर शके १८१७ च्या श्रावण महिन्या पासून दरमहा ९६ पृष्ठांच्या मासिक अंकद्वारें सुरू केलें आहे.

पुराणांत अनेकप्रकारचे इतिहास, मनोरंजक व उपयुक्त आख्यानें, बोधपर व नीतिपर मनोहर, कथा ईश्वराच्या अनेक अवतारकथा, सूर्यवंशी व सोमवंशी राजे कोणकोण झाले, सृष्टि कशी उत्पन्न झाली, तीर्थें कोणतीं आहेत, त्यांचीं महात्म्यें कशीं आहेत, यांचीं क्षेत्रें कोठें आहेत, मन्वंतराच्या कथा, कांहीं अद्भुत चमत्कारांच्या गोष्टी पुढील भविष्यें, कोणते दिवस पवित्र व त्या दिवशीं कोणतीं व्रतें व दानें करावीं, वर्णाश्रमधर्म, श्राद्ध, मोठमोठ्या यज्ञांचे इतिहास, ग्रहण, नक्षत्र, भुगोल, खगोल, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, सप्तद्वीपें, व नवखंडादिकांचीं वर्णनें, देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, नागांचीं उत्पत्ति असून सर्व उपयुक्त गोष्टींचा समावेश केला आहे.

तूर्त भारताचीं पृष्ठें ४०, गणेशपुराणाचीं २४, वराहपुराणाचीं १६ आणि नृसिंहपुराणाचीं १६ याप्रमाणें दरमहा रॉयल अष्टपत्री पृष्ठें प्रसिद्ध होत असतात.

याच्या प्रत्येक अंकाची किंमत ८ आणे प्रमाणें वर्षाच्या १२, अंकाची किंमत आगाऊ देणारास ६ रुपये व ट. ख. १२ आणे पडेल.


ता० क०—जर कोणास वर्षाच्या १२ ही अंकाची किंमत एकदम देणाराची सवड नसेल तर प्रत्येक तिमाहीचे ट ख. सह ।॥≡ आगाऊ पाठवावी. अधिक माहिती करितां अर्धा आण्याचें तिकीट पाठवा. ह्मणजे नमुन्याचा फार्म पाठवून देऊं.

पुराणप्रकाश छापखान्याचे मालक,
पत्ताः—नळबजार तीनबत्ती शेट छबीलदास लल्लूभाईचे घरांत,

**पुराणप्रकाश मंडळी मुंबई.**


## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ०।० आज्ञाशब्द



मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पोतदार यांजकडे अगर आह्मांकडे.

गोविंद भा. ओक
वाशिम, वऱ्हाड.



## उत्तम सोय

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, सतरंज्या ( कच्चे व पक्के रंगाच्या ) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना कलाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर


## पत्रव्यवहार

वाशिम वऱ्हाड
ता. २६-८-९५

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

सा० नमस्कार वि० वि० बहूत दिवसांनीं भेटीस येत आहे तरी अव्हेर न व्हावा.

हवामान—आज १५-२० दिवस पाऊस नव्हता. त्यामुळें शेतकरी लोकांचे तोंडचें पाणी पळालें होतें. यंदा पाऊस फारच कमी झाला आहे. नदी नाल्यास ह्मणण्या सारखा पुर आलाच नाहीं, त्यामुळें बहूतेक सर्व नाले वाळून गेले आहेत. पुष्कळ पाऊस पडला नाहीं तर उन्हाळ्यांत पाण्याचा दुष्काळ पडण्याची भीति आहे. गेले रात्रीं पासून बुर बुर सुरू आहे. मोठा पाऊस पाहिजे आहे. ह्या तालुक्यांतील कित्येक गांवीं महामारीचा उपद्रव सपाटून सुरू आहे. कित्येक गांवच्या शाळाही बंद कराव्या लागल्या आहेत. येथेंही तुरळक तुरळक आजार आहे.

अधिकारी— खान ब० शमसूद्दीन अलीखान येथील डे० क० साहेब ह्यांनीं सिक रजा घेतली. त्यांचे बदली मि० रस्तुमजी फरदुनजी अ. क. बुलढाणा यांस अकि० डेपुटी कमिशनर नेमिलें आहे. मिस्तर रस्तुमजी हे वयानें अगदीं तरुण आहेत.

स्वाऱ्या—पुढील महिन्यांत ने० स्यानिटरी कमिशनर हे स्यानिटरी बोर्डाचे सभे करितां व पेनशनास आलेले लोकांचे परीक्षे करितां तारीख ९ चे सुमारास येणार आहेत. मे. कान्सरव्हेटर साहेब हे नुकतेच येऊन गेले.

शाळा खातें—येथील कायमचे डे० ए० इन्स्पेक्टर साहेब हे रजेवरून परत येऊन आपले कामीं रुजू झाले. येथील मराठी शाळांची वार्षिक तपासणी सुरूं झाली. मुलींच्या शाळेचा व देवपेठ शाळेचा निकाल वरा झाला हें दोन्ही ही शाळांतील शिक्षकांस भूषणावह आहे. मुलींची शाळा हल्लींचे मास्तर आल्यापासून खरोखरीच सुधरली आहे. शाळेस मोठी जागा मिळाल्यास व मास्तरानीं जास्त मेहनत केल्यास आणखीही मुली जमतील. परंतु मुली जमविल्या ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें असें मात्र शिक्षकानें समजतां उपयोगी नाहीं. जमलेल्या मुलींस उत्तम शिक्षण देऊन त्यांस मर्यादा वगैरे नीतीचीं तत्वें शिकविलीं पाहिजेत. देवपेठ शाळा ही चांगले स्थितींत आहे. येथील हिंदुस्थानी शाळेंत सुमारें ३०-४० मुलें नमल्या आहेत. पण ह्यावरून आमचे मुसलमान बंधूस आतां स्त्रीशिक्षणाची अभिरुची लागली असें कोणी समजेल तर ती चुकी होणार आहे. त्यांच्यांत बालकांस कुराण वाचावयास शिकविण्याची चाल आहे त्या प्रमाणें आपले मुलीस कुराण वाचावयास यावें ह्मणूनच ते मुलीस शाळेंत पाठवितात. आणि मास्तरही मुलीस कुराण वाचावयास शिकवितात ह्मणूनच त्यास आपले शाळेंत इतक्या मुली जमा करतां येतात. कसेंही असो, ह्या कारणांनीं तरी इतक्या मुलींस लिहितां वाचतां येऊं लागलें तर ती गोष्ट कमी महत्वाची नाहीं. येथील इं. म. शाळेची परीक्षा पुढील महिन्यांत होईल. हल्लीं शिक्षक मंडळी जिवापाड मेहनत करीत आहेत पण ह्यामुळें लहान लहान मुलांस कधीं कधीं फारच ताण बसण्याचा संभव आहे शिक्षकांनीं विशेष कारणाशिवाय छडीचा उपयोग करूं नये. ह्मणून अलिकडे शाळाखात्यांत सरक्युलर आलें आहे ह्मणून समजतें. येथील ही एका शाळेंत मुलांस फार मारल्याबद्दल एका शिक्षकाविरुद्ध तक्रार आली होती ह्मणून समजतें.

येथील शुक्रवार पेठेंत दोन शाळागृहें बांधलीं आहेत. त्या ठिकाणीं इं. म. शाळेंतील खालच्या चार इयत्तेचे वर्ग जाणार आहेत परंतु त्या नवीन शाळेवर जो आमला नेमावयाचा त्याचे खर्चाबद्दल डि. बोर्ड व सरकार ह्यांमध्यें कांहीं लढा पडल्याचें समजतें. खरोखरी पहातां ह्याबद्दलचा विचार प्रथमच व्हावयास पाहिजे होता. ही शाळा मुनसिपालीटीचे हद्दींत आहे तेव्हां ह्या बदलचा खर्च कमेटीनें देणें हें रास्त आहे पहावें पुढें काय होतें तें.

म्युनिसिपाल कमेटी— येथील कमेटीनें बरीच मोठी रक्कम खर्च करून सदर स्टेशनांत खूप कंदील लाविले आहेत. सदर स्टेशनासारखे विरल वस्तींत व मोठ रस्त्यांनीं दर १०० पावलांस कंदील लावणें ह्मणजे म्युनिसिपालीटीचा पैसा उधळण्या प्रमाणेंच आहे. सर्व स्टेशन मध्यें सुमारें १० घरें व ४१५ सरकारी हापिसें आहेत. रस्ते सरळ असून गांवांतील रस्त्या पेक्षां दसपटीनें चांगले मुरूम टाकून रूळ फिरवून केलेले व रात्रीचे ७।८ वाजल्या नंतर कित्येक रस्त्यांनीं कोणीही मनुष्य फिरत नाहीं तर अशा रस्त्यावर सर्व रात्रभर कंदील जळत ठेवणें ह्मणजे पैशाचा अपव्यय करणें होय. कंदीलाची खरोखरीच जरूरी आहे गांवांतील कित्येक गल्ल्यांत आहे. अशा कांहीं गल्ल्या आहेत कीं, सर्व रात्रभर गुडघा गुडघा चिखल, नागोजाग वळणें, पुष्कळ लोक फिरणारे, अशा गल्ल्यांत जर कंदील लाविल तर त्या लोकांस फारच सुखावह होईल पण ह्या ठिकाणीं रहाणारे लोक गरीब व बोलतां येत असून मुके असे आहेत ह्मणून अशा गोष्टी! सरकारी बगिच्या नजीकच्या एका लहानशा नाल्यास बरीच रक्कम खर्च करून पुल बांधण्याचें घाटत आहे ह्मणून समजतें. हें काम ही विशेष जरूरीचें आहे असें नाहीं. पण जो

पर्यंत मेवर लोक आपले हक्क योग्य प्रकार बजावीत नाहींत तो पर्यंत असेंच होणार. ह्या पेक्षां येथील पद्धतीयींचे नाहयास फारशी करून तो रस्ता सुधारला तर तो खरें खरच ज्यास्त उपयोगी आहे. ह्या रस्त्यांनीं निदान दररोज कमींत कमी ७।८ शें मनुष्यें तरी जात असतील. ह्या गांवांतील सर्व मकरास ह्या बद्दल लिहिलें असता तो रस्ता अवश्य झाला पाहिजे ह्मणून ह्मणताल पण समेंच वेळी धीटपणानें त्या बद्दल कारणें सांगून आपलें ह्मणणें सभेपुढें योग्य प्रकारें मांडण्याची कटकट सहिया कोण करतो! याबद्दल कमेटींत विचार चालू आहेसे वाटतें. गांवांतील रस्ते फार खराब झाले आहेत. येथील बजारांत एक दुकाना करितां घर बांधिलें आहे पण त्यासही सामग्री फार ज्यास्त खर्च केला आहे. कमेटीनें कुलन्यायावर कर घेण्याचें ठरविलें होतें पण तें वरीष्ट अधिकाऱ्यांनीं मंजूर केलें नाहीं. सफाई कर ह्मणून बसविण्याचें घाटत आहे.

विस्तार फार झाला ह्मणून सध्या इतकेंच पुरे पुढें एखादे वेळीं राहिलेली हकिकत कळवीन.

आपला

परिचित.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १४ शके १८१७

---

मुंबई युनिव्हरसिटीच्या आर्ट शाखेकडील अभ्यासक्रम आहे तेच कायम ठेवावा पण चार वर्षांत तीन परीक्षा घेतात त्या ऐवजीं दोनच परीक्षा ठेवाव्या आणि नापास झालेला विद्यार्थी ज्या विषयांत शेंकडा ४५ किंवा त्याहून अधिक गुण मिळवील त्या विषयांत त्याला पुन्हा परीक्षा देण्याची जरूरी नसावी अशा आशयाची एक सूचना नामदार महादेव गोविंद रानडे यांनी आणिली आहे. या अभ्यासक्रमाचा मूळ वृत्तान्त असा आहे कीं तीन वर्षांचे अभ्यास व तीन वार्षिक परीक्षा अशी पद्धत हल्लीच्या अभ्यास क्रमापूर्वीं होती पण अभ्यास फार असून काल थोडा मिळतो, पुष्कळ विद्यार्थी वारंवार नापास होतात. आणि विद्यार्थ्यांच्या मनावर मोठा बोजा पडून त्यांच्या शरीराची व्यासंगातिशयानें हानि होते असें आढळून आल्यामुळें चार वर्षांचा काल बी. ए. पर्यंतच्या अभ्यासाला नेमस्त केला पण पुढें काल वाढला त्या बरोबर कै. नामदार तेलंग प्रभृति मंडळींच्या अनुग्रहानें अभ्यासक्रम ही वाढविण्यांत आला. आणि ह्या मुळें पूर्वींच्या अडचणी दुणावल्या व विद्यार्थ्यांच्या शरीरावर अति व्यासंगामुळें जे हानिकारक प्रकार घडावयाचे तेच चालूं राहिले. या नवीन सूचने पासून पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे. तीन परीक्षांच्या दोन परीक्षा झाल्या ह्मणजे बोजा कमी वाटेल. आणि शेंकडा ४५ किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून विषयवारीनें पास होण्याची परवानगी मिळाली तर बी. ए. चा अभ्यास पुरा होण्याची पुष्कळांस खात्री वाटेल आणि जो तो विद्यार्थी आपापलें बुद्धिसामर्थ्य, दृढव्यासंग व शरीरप्रकृती यांच्या मानानें जेवढा अभ्यास करवेल तितकाच पत्करील व वर्षानुवर्ष नापास होण्याची त्याच्या मनांतली दहशत दूर होईल. या सूचनेचा अखेर निकाल काय होतो हें कांहीं सांगवत नाहीं पण नामदार रानडे यांनीं ही गोष्ट मनावर घेतली आहे तेव्हां फलप्राप्ति फारशी दूर असूं नये असा अदाज आहे.

---

अलिकडे नवीन शोध असा निघाला आहे कीं इंग्रजींतली अक्षरलेखनाची पद्धति तिरकस आडवी आहे पण तिनें डोळ्याला इजा विशेष होते आणि लेखकाच्या अंगाला वळकटा पडून डोक्याची, हाताची वगैरेंची बैठक जरा कलती व एका भागावर अशी विशेष होते. अक्षरलेखन उभट लिहिल्यानें लेखकाचा पवित्रा समतोल बैठकीचा होतो आणि दोन्ही डोळ्यांशीं समान्तरानें लिहावयाचा कागद व त्यावरील लिखित ओळी हीं बरोबर मध्यभागीं येतात; आणि त्यामुळें शरीराला वेड्या वांकड्या स्थितींत ठेवावें लागत नाहीं आणि डोळ्यांसही उपद्रव कमी होतो. या उभट लेखनपद्धती विषयीं विशेष खुलासा मुंबईचे नेत्र वैद्य डाक्टर डॉ० गामा यांनीं आपल्या दृष्टीशास्त्रावरील व्याख्यानमालेंत केला आहे. आपली मराठी लेखन पद्धति उभट, सरळ, व लंबोत्तर आहे हें उत्तम आहे आणि सध्याची इंग्रजी लेखनपद्धति तशीच चालूं करण्या विषयीं शास्त्रीय दृष्ट्या प्रयत्न चालले आहेत. हें ध्यानांत धरावें आणि यथाशक्ति या प्रश्नाचा विचार सर्वांनीं करावा ही इच्छा विशेष आहे.

---

थोर व दूरदर्शी लोकांचा प्रयत्नवाद कित्ता घेण्यासारखा असतो. संकटाच्या व विपत्तीच्या वेळीं त्यांच्या प्रयत्नवादाची खरी मातबरी दिसून येते. कठीण आणिबाणीच्या प्रसंगीं महापुरुषांच्या उत्साहाला, कौशल्याला, उदात्त विचाराला व धैर्याला लाटा येऊं लागतात. किंबहुना त्यांच्या सद्गुणाची खरी कसोटी ह्मणजे संकटवेळा होय. मनाजोगतीं कार्यें घडलीं ह्मणजे कोणीही परिस्फूर्तीनें व औत्सुक्यानें आपला उद्योग चालूं ठेवील परंतु आपल्या विहित उद्योगांत अडचणी आल्या व यशप्राप्तीच्या वाटा बुजल्या सारख्या झाल्या ह्मणजे निराशेनें आरंभ सत्कर्याला तिलांजली देणारे सामान्य लोक बहुत आढळतात. पण उत्तम पुरुषांची दिशा अगदींच निराळी. त्यांची तात्पर्यावर दृष्टि असते. बंदरांत सुरक्षित पोंचेपर्यंत त्याच्या कार्यनौकेला कधीं शांत समुद्र व अनुकूळ वारा मिळतो आणि कधीं वादळ व तुफान लागतें. गमनाला अनुकूल अशा परिस्थितींत मार्गक्रमणाला कांहीं भिती नाहीं पण सन्या नावाडीपणाची, चातुर्याची व धैर्याची परिक्षा नौका उलथी पालथी होऊं लागली ह्मणजे चांगली होते. मि० दादाभाई नवरोजी पार्लमेंटाच्या गेल्या निवडणुकींत निवडून आले नाहींत ह्मणून सर्व देश अगदीं निराश व स्तब्ध झाला. पण या निवडणुकीच्या वेळीं निवड झाली नाहीं ह्मणून मि० दादाभाई यांच्या मनाची स्थिरता अगदीं ढळली नाहीं. त्यांनीं आपल्या देशबांधवास विलायतेहून एक निरोप पाठविला आहे तो अत्यंत बोधप्रद व कळकळीचा असून त्यांत त्यांनीं यशप्राप्तीची गुरुकिल्ली दाखविली आहे. लिबरल पक्षाचा पाडाव झाला इतकेंच नाहीं तर त्यांचा पक्ष सध्यां अगदीं पेंढकळीस आलेला आहे. असा मोठा पराभव झाला त्या बरोबर मि० दादाभाई हे पराभूत झाले हें कांहीं नवल नाहीं.

गेल्या अंकीं त्यांचा निरोप कळविला आहे. तेव्हां सर्व जणास सूचना इतकीच कीं मि. दादाभाईंनीं पाठविलेल्या निरोपाचें आपण सदा चिंतन करावें आणि तदनुरूप वागण्याचा प्रयत्न करावा.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 2, 1895

The Legal Practitioners Act is under revision. A bill of amending the act is before the Supreme Legislative Council. It is proposed to strengthen the hands of law in suppressing law-touting. A law-tout is one who receives brokerage for procuring profession to lawyer. This nefarious practice prevails all over India in a greater or smaller degree. The evil is there and the old law was found ineffecient to meet it. No proof could possibly be adduced to prove such an unprofessional conduct on the part of the lawyer; nor can the Dalal be found within the clutches of the law. The amendment prohibits a lawyer from accepting any *employment* in his business from a habitual law-tout or from one who offers employment with the hope of having some return for the offer. This aim is well and good. No body will question the rightness of a measure that cloggs the free and competitive profession of a lawyer. Brokerage in such a business is most detrimental to the public interests and the fair-play of courts of justice. The object and reason of the present proposal is is set forth in the eloquent words of the mover, Sir Alexander Miller. He introduces the bill with the following remark:—

"Great complaints have been made from time to time of the practice known as dalali, or touting, under which clients are induced to go to particular pleaders, not because they are proper persons to employ, nor because the clients have for any reason selected them, but because they have given a commision to the tout for getting them the business; and a very strong proposal was made last year by a leading practitioner in this Province to make this a criminal offence. However, on consideration, we thought that would be going much too far, but on the papers being circulated the High Courts seem to have agreed that some addition to their powers of repressing this practice ought to be made, and accordingly the Government of India have come to the conclusion that it is worth while to try increasing the powers of the High Court and by giving power to District and Sessions Judges and Commissioners of Divisions to suspend or dismiss pleaders or revenue-agents who are guilty of giving commissions to or taking business through the agency of these touts, subject to an appeal to the High Coutt; and the Bill accordingly proposes to amend the Act, first, by extending the powess of the High Court over pleaders and mukhtars who are guilty of this unprofessional conduct; secondly, by explaining that in order to prove that a man is an habitual law-tout it shall not be necessary to prove specific acts of touting, but that will be sufficient to prove that he is generally known as such, unless the pleader or mukhtar dealing with him is in a position to prove that he did not knew that he was a law-tout. That is the effect of the first section.

"The section proposes to amend the Act by enabling the District or Sessions Judge or the Commissioner of the Division, instead of reporting the offence to the High Court, which is at present all he has power to do, himse'f to acquit, suspend or dismiss the pleader or muktar, subject to an appeal to the High Court.

"The other two sections merely extend the same principle to revenue—agents as I have already explained with regard to pleaders and mukhtars. That is the whole of the Bill."

We grant that the bill is excellent but we are afraid that the so called amendment will equally be a dead letter if it can do no mischief in another direction. We foresee a danger in the large powers of suspension and dismissal of the lawyers, that the new bill is vesting in a District or Sessions Judge or the Commissioner of a division. Herein lies the real pit—fall. The legal profession will be at stake. It is sufficient to damage a practising lawyer when some evidence is got up as to his employment through a law—tout. He may be quite as innocent as any thing and still he will have to undergo the indignity of a trial for unprofessional conduct. Even his acquittal will be too dear for his life—long earnings of his profession. Under the old law the tribunal to judge of his conduct was the Highest Court available; now he shall have to run the risk of a trial before a subordinate court. When his employment through law—touts constitutes an unprofessional conduct some scheming and intriguing people will often succeed in harassing him to ruin. We accept and fully endorse the good principle upon which the amendment hinges but we fail to see how the proposed means will effectively check the rampant practise of touting. We may as well suggest some of the difficulties we feel in the administration of this act. Section 36 of the old act should be amended so far as to criminate a law—tout who offers a legal employment for some reward. Secondly, it may be very difficult to determine whether a legal employment is received through a tout when be accompanies a client to the lawyer's office. Generally law—touts are petition—writers, head—men in villages and those who often visit courts and lawyers. New men who want to engage a legal adviser do not know the fitest person who would be available for the sums they spend. They are forced to consult these petty foggers on these points and to get themselves introduced to the pro-

per person. Sometimes these law-touts are sharp enough to give a legal advice and to charge a moderate fee therefor. Some clients think it well to proceed with their consultations In such cases like these the new proposal will throw a hardship both on the lawyers and their clients. Thirdly, it is feared that the bill will overshoot its mark. It will teach people how to make a work of law-touting so perfect as to take it beyond the pale of law. The evil will continue in spite of al such attempts unless a moral pressure comes from within the very circle of lawyers. No doubt, the legal profession is being gradually over crowded but that is no reason why law-touting should be in the enormous increase. Let the high honor of the profession be rightly understood and let a receiprocal burden be thrown on the lawyers as a class and the justices of courts to suppress the evil by disfavouring the progressive visits and acquaintance of law-touts within the precincts of the Court-houses. We hope that the bill will be fully discussed before it becomes a law of the law.

---

The downfall of the Satta-trade in Berar is a satisfactory feature of the year 1894. A *satta* transaction is held to a binding contract but we hold it to be legalized gambling pure and simple. The trade is a fruitful source of revenue to the Stamp-department, an ample field of litigation and a sure item for municipal taxation. The following paras will tell a sorry aspect of the trade as affecting the first two branches:-

"The revenue from hundi stamps has been sinking year after year, and it is now less than half what it was in 1891 92. The further decrease during the year under report is no doubt largely due to the unprecedented slackness in the export trade in cotton and grain. Another cause is that the *satta* business, for which hundies are largely used, continued to be at a very low ebb owing to disputes and want of confidence engendered by the fact that the Marwari dealers are unable to agree and adhere to a fair method of fixing the settling rates, while the long delay that attends the disposal of *satta* cases by the civil courts is said to have had some effect on discouraging speculation."

"I have noticed that in Akola there was a considerable number of cases connected with satta dealings in the cotton and grain trade: while in Amraoti the question whether "satta transactions" were void as being gambling transactions culminated in the repudiation of some such debts. The result of the cases was that the "sattas" were upheld and not considered void as wagering contracts, following the rulings in Bombay and elsewhere. It is a very difficult question to decide how far speculation in matters of trade should receive the sanction of law, for the line between pure gambling and legitimate speculation is indistinctly drawn. In Berar the cotton and grain trade is certainly conducted on highly speculative principles, and sometimes it is difficult to say that it is not pure gambling. But it is dangerous to interfere with such business except after full enquiries, which should lead to legislation rather than judicial interference."

## वऱ्हाड

हवामान— पाऊस नाहीं ह्मणून लोक हवालदील झाले आहेत. पावसाचीं चिन्हें मात्र दिसतात पण पाण्याचा थेंब नाहीं. ताप, खोकला, हगवण, वगैरे दुखण्याची साथ बरीच आहे.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी. यांची नेमणूक तहशिलदार वर्ग २ वर होऊन त्यांस मेहकरास कायम केलें आहे. आणि ते लवकरच आपल्या कामावर रवाना होतील. यांच्या सारखे विद्वान, सुशील व होतकरूं गृहस्थ अशा जागीं नेमल्यावर कां आनंद होऊं नये!

मि० हेअर साहेब यांनीं मि० सिम्सन यांस परवा रोजीं आपले कामाचा चार्ज दिला.

मि० बुलक साहेब रेव्हिन्यु कमिशनरच्या नात्यानें प्रथम अकोल्यास ता० २७ रोजीं दिवसा बाराच्या गाडीनें आले. येथील कचेऱ्या तपासून गेल्या गुरुवारीं परत उमरावतीस गेले.

अकोल्याची यंदाची वर्षोत्सवव्याख्यानमाला सुरू होऊन बरेच दिवस झाले परंतु तीन व्याख्यानांच्या पलिकडे चौथें व्याख्यान झालें नाहीं. यावरून कल्पना होते कीं अकोल्यातील होतकरूं लोकांना आळसानें व औदासीन्यानें घेरलें आहे परंतु हेंही सांगणें जरूर आहे कीं व्याख्यानास श्रोतृसमूह फारच कमी असतो- पंधरा वीस इसम- यांतील बराच भाग विद्यार्थी लोकांचा- हजर असतात या पेक्षां अधिक शोचनीय गोष्ट कोणती असावयाची!

ब्रह्मणपूरकर हरदासांचा येथें आज सरासरी दोन महिन्यावर मुक्काम झाला. त्यांचीं कीर्तनें बरींच झालीं. कीर्तन सुरस, प्रेमळ व श्राव्य असतें.

गावांत पाण्याचा भरपूर पुरवठा इतके दिवस व्हावा तितका नव्हता. आतां नळ आले आहेत. नळ घालण्याचें काम सुरूं झालें आहे. लवकरच चोहोंकडे नळ पसरून मुबलक पाणी पिण्यास मिळेल.

पिंजर ता० अकोला येथें एका मनुष्याला माती खणीत असतांना मोहरा, बाळीचा जोड दोन वळे, वगैरे तीन चार हजारांचा ऐवज सांपडला. सोनें बावनकशी आहे. द्रव्य सांपडल्या नंतर कामकरी, घरधनी वगैरे लोकांवर मालाची जाहिर खबर न दिल्यामुळें फौजदारी चालूं आहे.

गद्य नाटकें करून दाखविण्यांत नांवाजलेली 'शाहू नगरवासी नाटककार मंडळी' येथें आली असून तिनें दोन खेळ करून दाखविले. पहिला खेळ 'कांतिपूरचे दोन गृहस्थ' हा गेल्या बुधवारीं झाला. 'त्राटिका' नाटकाचा प्रयोग परवा शनिवारीं झाला. जगविख्यात कवि शेक्सपियर यांचे दोन उत्तम खेळ मराठी रूपान्तरानें प्रेक्षकांस चांगले कळले. असला अमोल्य फायदा ही नाटक मंडळी योडक्या खर्चांत करून देते आणि ह्मणूनच सहृदय लोक या मंडळीस यथागुण आश्रय देतात हें स्पष्ट आहे.

सिमल्याच गेल्यावर लार्ड एल्जिन यांनीं हैद्राबादचे दिवाण नवाब विकार उलमुल्क याचें चांगलें आदरातिथ्य केलें. मनमाड जवळून हैद्राबादेपर्यंत रेल्वे करण्याचें ठरलें आणि दुसरी पुष्कळ राजकीय खलबतें झालीं असें कळतें.

अफिशान रेसिडेंट कर्नल मेकंझी साहेब हे सिमल्यासच गेले आहेत. गृहस्थ मोठा धोरणी खरा. आपल्या कर्तबगारीनें हो स्वारी श्रेष्ठ पदा चढली व व्हाईसराय साहेबांशी शेक ह्यांड करण्याचा योग साधून आतां पेनशनवर जात आहे.

रा. रा. नारायण पांडुरंग जोशी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे रजा संपल्यामुळें परत आले आणि आपल्या बदलीच्या गांवीं ह्मणजे आकोल्यास या आठवड्यांत रुजू होतील.

विद्यमान सिव्हिल जज्ज उमरावती यांचे कोर्टांत रा. रा. श्रीराम मोतीराम खत्री यांनीं रा. रा. देवराव जयकृष्ण यांच्यावर ११०० रुपयांचा अब्रू नुकसानीचा दावा केला होता पण त्यांत वादीचा दावा कोर्टानें रद्द केला.

येत्या बुधवार पासून उमरावतीस वकिलीची परीक्षा सुरूं होणार आहे. मेसर्स इलियट, जोशी व फाबेंस असे तिवे परीक्षक आहेत,

रा० रा० धोंडू हरी लाळीकर यांस कमिशनरचे कचेरींत कायमची डेपुटी क्लर्क आफ कोर्टची जागा मिळाली हें कळविण्यास आनंद वाटतो.

---

### नोटीस.

गणु वा भवाणी धनगर राहणार कुरणखेड यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, ता. ३० दिसेंबर सन १८९२ रोजी रुपये ७५ पंचयाहत्तरचे व व्याज दर शेकडा रु. २ प्रमाणें देण्याचे कबूल करून तारण गहाणखत लिहून दिले. आणि त्यांत करार व्याजा सुद्धां रुपये सन मजकूरच वैशाख शुद्ध १५ पुर्णीमेस फेडू. करारास रुपये न दिल्यास लगाइत मितीपासून दर शेकडा तीन ३ प्रमाणें व्याज देण्याचें कबूल केलें व दुसरा असा करार केला कीं, गहाण शेतांतील साल मजकूराचे हंगामावर मालात रुपयाची अदाई न झाल्या सकाळी जमीन तुमचे ताब्यांत द्यावी. रुपये फीटेपर्यंत वहीं आपले ताब्यांत ठेवावी. असा करार करून दिला त्या सन मजकुरचे सालावर रुपयांची अदाई केली नाहीं. करितां नोटीसीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत व्याजा सुद्धां रुपये द्यावे किंवा काळी जमीन सर्व रुपये फीटे पर्यंत ताब्यात द्यावी. असे न केल्यास रीति प्रमाण फिर्याद करून ह्या नोटीसाच्या खरचासुद्धां अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान भरून घतले जाईल ह्मणून ही नोटीस सही ता० ३० माहे आगष्ट सन १८९५ इसवी,

सही

सही रावजी कृष्णा जानुदे दस्तुर

खुद वस्ती कुरणखेड.

---

### नोटीस

सीदुजी वा भिवाजी राहणार अकोलें हल्ली वस्ती शाहपूर तालुके खामगांव यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मांस माझे घर बक्षीस दिले होते ते अशा करारावर कीं आपण माझा सांभाळ मी जिवंत आहे तों पर्यंत अन्न वस्त्रानें व सर्व प्रकारचे सेवेनें करावा. कारण कीं मी दोन्ही डोळ्यांनें अंधळा असून महारोगानें पिडीत आहे या करितां आपण मजला जन्मभर अन्न वस्त्र द्यावे व सेवा करावी या करारानें दिले होते, आपण त्या बदल करारपत्र ही पंचांचे सहीनें दिलें आहे त्या प्रमाणें करार करून बक्षीसपत्र मी आपणास दिले त्यास आज सात (७) महिने जाहाले आपण माझा सांभाळ न करितां एक महिन्याचें आंतच चालला गेला. तो तुह्मी पुन्हा आला नाहीं आपला मुलगा दावल नावाचा हा आज १५ दिवस जाहालें तो पर्यंत होता तोंही माझे घरांतील कांहीं सामान घेऊन व सारजाबाई डांगिन इजला गाडी वगैरे मी विकले होते त्याचे रुपये ३० तीस परभारे माझे नांव सांगून मागून घेऊन निघून गेला अथात हल्लीं पंधरा दिवसां पासून यजपाशीं कोणी नसून माझी फारच फार दशा आहे. आपला मुलगा दावल यानें ७ सात महिनें शेवा चाकरी केली व अन्न वस्त्र दिले अखेरीस तो कोणास समक्ष न बोलाविता माझे घरातील जंगम माल किंमत रुपये १५ पंधराचा व नगदी रुपये ३० तीस दगाबाजी करून नेलें ते असे एकंदर रुपये ४५ पंचेचाळीसची त्यानें अफरातफर केली त्याबदल मी त्याजवर फौजदारीत फिर्याद करणार आहे आपण ही नोटीस पावल्या पासुन चार दिवसाचे आंत येऊन माझी सर्व सोय करावी. न केल्यास बक्षीसपत्र घराचे रद्द समजावे व तुमचा कोणते च प्रकारे हक्क त्याजवर चालणार नाहीं ह्या घरा पैकीं उत्तरे कडील दादनीचें कवेलु व त्याचे पिछवाडचे जागेसुद्धां व दरवाज्या सुद्धां तुमचे मुलानें रा. रा. श्रीधर गोविंद यांस रुपये ६२ बासष्टास खरेदी दिलें आहे तें मात्र मजला कबूल आहे कारण तें माझ्या मतानें विकलें आहे व त्यानें सेवा केली त्या बदल मी त्यांस रुपये ६२ त्याचे सेवे बद्दल दिले आहेत. हल्लीं राहिलेल्या बराबर तुह्मी करारावर न आल्यास तुमचा हक्क बिलकूल कोणतेही प्रकारचा राहणार नाहीं. व तुमचे मुलाचा वगैरेही हक्क राहणार नाहीं कारण त्यानें सात ७ महिने सेवा केली या बदल त्यास विक्रीचे जागेचे रुपये ६२ पावलेच आहेत ह्मणून दिली नोटीस सही. ता. १।९।९५ इ०

[ सही ]

सहीची निशाणी जानु वल्लद

बाजुजी तेली सोनटके

रहाणार अकोलें राजपुरा.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस ह्या जाहिरातीनें खालीं सही करणार यांजकडून कळविलें जातें कीं, सिदु वल्लद भिवाजी तेली राहणार अकोलें जवाहरपुरा यानें माझी जन्मभर सेवा चाकरी करून अन्नवस्त्र द्यावें व मी त्यास माझें घर बक्षीस करून द्यावें अशा करारानें रीतशीर कागद वगैरे जाहले आहेत. परंतु कागदांतील करारा प्रमाणें माझें संगोपन होत नाहीं व बक्षीस घर सदहू सिदू हा विकणार वगैरे समजते. तर माझे संमती शिवाय जर कोणी खरेदी वगैरे घेईल तर त्याचा तो नफा नुकसानीचा मालक आहे. घर किंवा मी नाहीं. ह्मणून दिली जाहिरात. सही ता० १।९।९५ इ.

सहीची निशाणी जानु वल्लद बाजुजी

तेली सोनटके राहणार

अकोला.

---

## वर्तमानसार.

निझामाचे दिवाण वऱ्याच मोठ्या परिवारासह या आठवड्यांत स्पेशल गाडीनें मुंबईस आले व स्पेशल गाडीनेंच सिमल्यास गव्हरनर जनरलांस भेटण्यास गेले. हे दिवाण तिकडे गेले ह्मणून निझामांच्या रेसिडेन्टासही सिमल्यास बलावलें आहे असें सांगतात. काय खलबत आहे कांहीं समजत नाहीं.

फ्रेंचाची जी स्वारी होवा लोकांवर आफ्रीकेंत चाल करून गेली आहे तिच्याशीं आफ्रीकेंतील एक शिद्दी सरदार ४,००० फौजेसह मोठ्या शहाणपणानें व निकरानें लढत असून फ्रेंच फौजेच्या भोवती गुप्त हेर टेवले आहेत असें विलायतची तार सांगते.

डोना इसिडोरा वासिनो नांवाची एक स्त्री आहे. तिच्या कोळशाच्या खाणी असून त्याबद्दल तिचें वार्षिक उत्पन्न १९,२०,००० रुपये आहे. शिवाय मालकीची ८०,००,००० एकर जमीन आहे. या शिवाय तांब्याच्या कांहीं खाणी असून १०।१२ आगबोटीही आहेत. ओत कामाचे कांहीं कारखाने असून तिच्या मालकीची अशी एक रेल्वेही आहे. इटाआ शहरांतली सर्व घरें तिच्याच मालकीचीं आहेत. हिंदुस्थानांत एकाद्या राजाची तरी इतकी खाजगी मिळकत आहे काय ?

उगंडा रेल्वे बांधविणें अवश्य आहे व सोडन येथें शांतता होईपर्यंत इजिप्त सोडू देतां येणारच नाहीं असें मि. स्टानले सांगतात.

इजिप्त सोडण्याची वेळ अजून आली नसल्यामुळें त्याबद्दल चर्चा करणें चांगलें नाहीं असें मि. कर्झन यांचें ह्मणणें आहे.

विलायतच्या गिरणीवाल्यांची लंडन येथें एक मोठी सभा झाली व विलायती कापडावर हिंदुस्थानसरकारानें जो जकात बसविली आहे ती उठविण्याची खटपट करण्याकरतां एक निवडक कमेटी नेमण्यांत आली.

आर्मेनियाच्या प्रकरणांत परकीय राजांचा हात घ्यावयाचा नाहीं असें अजूनही टर्कीचें ह्मणणें आहे.

१८९४ सालांत ब्रह्मदेशांत गुरांच्या रोगानें ७०,००० गुरें मेलीं.

आमच्या तालुक्यापर्यंत रेल्वे करा असा सत्यमंगल तालुक्याच्या लोकांनीं मद्रासरःकारास अर्ज केला आहे.

स्टेशनावर स्त्रियांकरितां वेगळी वेटिंग रूम असावी व त्यांत पाण्याची वगैरे सोय असावी, टिकिटें मिळण्यास उशीर न लागेल अशी व्यवस्था करावी. स्त्री उतारूंनीं टिकिटें घेण्याकरितां स्त्री टिकिटकलेक्टरच नेमाव्या, यात्रेकरूंकरितां जास्त व्यवस्था असावी व त्यांच्याकरितां थर्ड क्लास करावा आणि डब्यांत उतारू भरण्याची जी मत्ता आहे ती उन्हाळ्यांत कमी करावी असें हिंदुस्थानसरकारचें ह्मणणें असून त्याप्रमाणें अंमल करण्याविषयीं सगळ्या रेल्वेस ताकीद झाली आहे. ताकीद ठीक आहे, अंमल होण्याची मात्र वानवाच आहे. फार झालें तर हल्लीं डब्यांत १० उतारू भरावे असा नियम असतां जे १८ ही भरतात ते १९ भरूं लागतील !

ह्मैसूरच्या हद्दींत आज ११०० वर्षांपासून युरोपियन लोकांची वस्ती असून ह्मैसूरच्या राजाशीं त्यांचे करार मदारही आहेत पण त्या करार मदारांतून सुटण्याची आतां त्यांस इच्छा झाली असून त्याकरितां त्यांच्या सभा वगैरे होत आहेत. ठा. अ.

बडोदें व गोद्रा यांच्या दरम्यान रेल्वे बांधण्याचें काम, बडोदा रेल्वे कंपनी लौकर सुरू करणार आहे.

धरणीकंपाचे सात धक्के, कास्पियन व एरल सरोवराकडे लागले. अस्त्राखान येथें ही एक मोठा धक्का बसून फार नुकसान झालें.

इजिप्तमधील इंग्रजी अमलानें शेतकरी वगैरे खालच्या प्रतीच्या लोकांस सुख झालें आहे; पण वरच्या प्रतीच्या लोकांचे हक्कांचा नाश झाल्यामुळें ते नाराज आहेत अशाबद्दल, सिरिया देशांत राहणाऱ्या एका मुसलमान गृहस्थानें लंडनमधील एका प्रख्यात मासिक पुस्तकांत लेख लिहिला आहे.

रेल्वेंतून प्रवास करणारांना पुढें रेल्वे स्टेशन कोणतें आलें आहे तें दाखविणारें एक यंत्र मि. शंकर आबाजी भिसे यांनीं काढलें असून, त्याचें पेटंट मिळविण्याकरितां अर्ज करण्यांत आला आहे.

जगन्नाथपुरी येथील देवालयाचें काम बरेंच रूपास आलें आहे.

बंगाली वंगवासीचा एक मुसलमान बातमीदार कळवितो कीं, फ्रान्स देशांत एक २३ वर्षांची स्त्री आहे. तिला एकेवेळीं ७ कुत्र्यांचीं पिल्लें झालीं. पण ती ह्मणते कीं, मला कुत्र्याशींच संभोग करणें बरें वाटतें. यांत तुह्मी मला कोण सांगणार ?

चीनांत कुचेंग येथें झालेल्या ख्रिस्त्यांच्या कत्तलीचा न्याय करीत असता. चिनी अधिकारी, इंग्रजी किंवा अमेरिकन वकीलांस जवळ बसूं देत नाहींत. लंडन टाइम्स ह्मणतें कीं, तिकडे ख्रिस्ती लोकांविरुद्ध आणखी उठावणी करण्यांत येत आहे. पाद्री लोकांना तेथें उपदेश करण्याची काय जरूर ! त्याचेंच हें प्रायश्चित !

भरूचपासून तिलकवाड्यापर्यंत आगबोटी फिरविण्याची व्यवस्था येथील देशी लोकांच्या कंपनीनें केली आहे.

बडोदा रेल्वेनें असा हुकूम केला आहे कीं, ज्या उतरूंचें सामान, त्यांच्या बसण्याच्या जागेखालीं मावण्यापुरतें नसेल, तें त्यांचे सामान ब्रेकमध्यें टाकावें. हा हुकूम सक्त रीतीनें अंमलांत येणार आहे.

बडोदा रेल्वे कंपनीस सरकारचा असा हुकूम झाला आहे कीं, सन १८९९ पर्यंत तिनें आपल्या सर्व रेल्वे लाईनी डबल कराव्या, व सर्व पूल ही रीतशीर करावें. नुसत्या पुलासच ९६ लक्ष रुपये लागतात.

आर्मेनियांत जर लौकर सुधारणा होणार नाहीं तर तुर्कस्थानच्या स्वतंत्रपाला धक्का बसेल असें इंग्लंडच्या हल्लींच्या लार्ड सालिसबरी या मुख्य प्रधानानें पार्लमेंटांत बोलून दाखविलें. हल्लींच्या काळीं अशा धमकीला तुर्कस्थान कितपत भिईल याची शंकाच दिसते.

चीनमधील इंग्रजांच्या खुनाबद्दल दाद लागलीच पाहिजे असा इंग्रज कारस्थान्यांचा प्रयत्न चालला आहे. अमेरिकेच्या साह्यानें शेवटास गेला तर जाईल.

जर्मनींत स्टीरिया नांवाचा प्रांत आहे. यांत एकंदर १९ लक्ष माणसांची वस्ती आहे. तिकडचे सर्व लोक नंबर एकचे विषभक्षक आहेत. मुलांस लहानपणापासून थोडें थोडें विष देण्याचा तिकडे परिपाठच आहे. त्यामुळें त्यांना विषांची बाधा होत नाहीं. ते प्रत्यक्ष विषारी बनलेले असतात.

उसाच्या चुऱ्यापासून कागद बनविण्याचा क्रम हल्लीं युरोपांत चालू आहे. आमचे लोक झोंपा काढीत आहेत. कोणी कागदाचा कारखाना मोठ्या पायावर काढील तर त्याला पुष्कळ नफा होईल.

आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर इंग्लंड व जर्मनी यांच्या व्यापाराची चढाओढ चालली आहे. त्या साठीं युगंडाची रेल्वे लौकर तयार करण्याबद्दल इंग्लंडच्या लोकांची मागणी झाली आहे.

रेशमाचें उत्पन्न यंदा सर्व देशांत चांगलें झालें आहे.

व्हाइसराय साहेब नवंबरच्या १०।१२ तारखेच्या सुमारास पुण्यास येणार आहेत. त्यावेळीं त्यांस पुणें सार्वजनिक सभेकडून एक मानपत्र देण्यांत येणार आहे. स. वि.

---

नोटीस.

रा. रा. दादंभट बिन रामभट जोशी राहणार चांदणी तालुके बाळापूर.

यांस

खालीं सही करणार बनाप्पा वल्द महादाप्पा लिंगाइत वाणी राहणार चांदणी तालुके बाळापूर यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमच्या आमच्या घरांच्या मधली भींत समाईक उभयतांची आहे आणि तिजवर उभयतांची सारखी मालकी असून तुह्मी अलिकडे माझ्या मालकीच्या हक्काला व्यत्यय आणून माझ्या घराला उपद्रव देत आहां. माझ्या घराच्या नजूला वहिवाट मिळावी ह्मणून आडाच्या पाण्याच्या मिषानें भिंतींतल्या खिडकीचा दरवाजा करून वापर करूं लागला पण माझ्या ताकीदी वरून तुह्मी दरवाजा बंद करून वापर मोडला होता.

तथापि तारीख ११ आगष्ट १८९५ रोजीं माझ्या घरीं पुरुष मंडळी नाहीं व माझी आईही नाहीं अशी संधी पाहून दरवाजा उघडला. तेथें मी ठेविलेली कणगी तुह्मी फेकून दिली व ओटा खणून काढला. या अपक्रिये बद्दल व आगळीकी बद्दल तुमचा जबाब योग्य वेळीं फौजदारी कोर्टांत घेतला जाईल.

दरवाजा काढून टाकण्या बद्दल आणि भिंतीवर माझी मालकी शाबित करून घेण्याबद्दल स्वतंत्र दिवाणी काम चालविलें जाणार आहे. आणि तुमच्या आगळीकी मुळें हा दावा करावा लागणार आहे ह्मणून त्याचा सर्व खर्चेंच तुमच्या माथीं पडेल.

तसेंच. मी माझ्या जाग्यावर इमारत उभारण्याचें काम चालविणार आहे. त्यावेळीं खोडसाळपणानें मला उपद्रव देण्यासाठीं तुह्मी कोणती आगळीक कराल तर त्याची जबाबदारी तुमच्या माथीं राहील. फौजदारीतला आणखी गुन्हा होईल अशी गोष्ट आपण करूं नये व गोडीगुलाबीनें आमच्या हक्काला बाध न आणितां योग्य तजविजो व सरकार दरबार करावें ह्मणून सुचनार्थ आगाऊ कळविलें आहे.

कळावें तारीख २६ माहे आगष्ट १८९५ इसवी.

( सही. )

बनाप्पा वल्द महादाप्पा वाणी

मौजे चांदणी दस्तुर खुद.

---

नंबर १४३

कोणी स्थावरपन्न होती तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्य विषयी जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणे

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव सेख रहिमान

बापाचें नांव महमद कासम अज्ञान पा० आई महमुदबी मर्द महमद कासम

राहणार जैनपूर तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस मयत

महमद कासम बापाचें नांव हसन आहंमद राहाणार जैनपूर तालुके इलिचपूर जि० इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २३ माहे सपटंबर १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १९ माहे आगष्ट सन १८९५ इ०

H. Godwin Austen.

Offg. Deputy Commissioner

इलिचपूर

जिल्हा जज्ज

---

जाहीर नोटीस

वादी रामचंद्र मेघराज मारवाडी दुकान सांगवी खुर्द मयत वारीस पुत्र कन्हयालाल व लक्ष्मी नारायण यांस प्रतिवादी जयराम वल्द शंकरदास मारवाडी मयत यानें वादीस तारीख ७।९।८३ चें रुपये २०० चें गहाणखत लिहून देऊन या रुपयांचें मुद्दल व व्याजाचे फेडीचे तारणासाठीं मौजे सांगवी खुर्द येथील यांणीं आपलें घर लिहून दिलें. सदर्हू गहाणखतावरून अकोलें येथील विद्यमान ए. असिस्टंट कमिशनर साहेब बहादूर यांचे कोर्टांत दि. मो. नंबर १९९ सन १८९५ ची फिर्याद वारीस पुतणेंछेटुलाल व हजारीमल गोपाळदास मौजे खांबोरे यानवर केली आहे. याची चौकशीची तारीख ३।११।९५ इसवी रोजीं नेमिली आहे करितां मयत प्रतिवादीचा योग्य कोणी दुसरे वारस असतील त्यांनीं त्या तारखेस हजर राहावें. कळावें. तारीख २६।८।९५

( सही )

कन्हयालाल वल्द रामचंद्र वस्ती

सांगवी खुर्द दस्तुर खुद.

---

☞ हें आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साक्ष ... ... ... १।८
किरकोळ ... ... ... ... ०४
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 9 SEPTEMBAR 1895 NO 35

वर्ष२९ आकोला सोमवार तारीख ९ माहे सप्तेंबर सन १८९५ इ० अंक ३५

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आम्ही पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, कांकूड, कोलंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें असल्यास आम्ही पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी म्हणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## पुराणप्रकाश

( महाभारत व पुराण ग्रंथांचें सरळ मराठी भाषांतर. )

हल्लींच्या विद्याप्रसारामुळें जुन्या व नव्या मतांच्या लोकांस, आपल्या प्राचीन पुराणादि ग्रंथांत काय तत्व आहे व त्यांत कोण कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत, हें समजून घेण्याची बरीच उत्कंठा प्राप्त झाली आहे असें जाणून सर्वांस घेण्यास सोईवार पडावें म्हणून आम्ही श्रीमहाभारत, १८ महा पुराणें व उपपुराणें यांचें सरळ मराठी भाषांतर शके १८१७ च्या श्रावण महिन्या पासून दरमहा ९६ पृष्ठांच्या मासिक अंकद्वारें सुरू केलें आहे.

पुराणांत अनेकप्रकारचे इतिहास, मनोरंजक व उपयुक्त आख्यानें, बोधपर व नीतिपर मनोहर, कथा ईश्वराच्या अनेक अवतारकथा, सूर्यवंशी व सोमवंशी राजे कोणकोण झाले, सृष्टि कशी उत्पन्न झाली, तीर्थें कोणतीं आहेत, त्यांचीं महात्म्यें कशीं आहेत, यांची क्षेत्रें कोठें आहेत, मन्वंतराच्या कथा, कांहीं अद्भुत चमत्कारांच्या गोष्टि पुढील भविष्यें, कोणते दिवस पवित्र व त्या दिवशीं कोणतीं व्रतें व दानें करावीं, वर्णाश्रमधर्म, श्राद्ध, मोठमोठ्या यज्ञांचे इतिहास, ग्रहण, नक्षत्र, भुगोल, खगोल, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, सप्तद्वीपें, व नवखंडादिकांचीं वर्णनें, देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, नागांचीं उत्पत्ति असून सर्व उपयुक्त गोष्टींचा समावेश केला आहे.

तूर्त भारताचीं पृष्ठें ४०, गणेशपुराणाचीं २४, ब्राह्मपुराणाचीं १६ आणि नृसिंहपुराणाचीं १६ याप्रमाणें दरमहा रॉयल अष्टपत्री पृष्ठें प्रसिद्ध होत असतात.

याच्या प्रत्येक अंकाची किंमत ८ आणेप्रमाणें वर्षाच्या १२, अंकाची किंमत आगाऊ देणारास ६ रुपये व ट. ख. १२ आणे पडेल.


ता० क०—जर कोणास वर्षाच्या १२ ही अंकाची किंमत एकदम देणाराची सवड नसेल तर प्रत्येक तिमाहीचे ट. ख. सह १॥= आगाऊ पाठवावी. अधिक माहिती करितां अर्धा आण्याचें तिकीट पाठवा. म्हणजे नमुन्याचा फार्म पाठवून देऊं.

पुराणप्रकाश छापखान्याचे मालक,
पत्ता:—नळबजार तीनबत्ती शेट छबीलदास लल्लूभाईचे घरांत,

**पुराणप्रकाश मंडळी मुंबई.**

## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ०।० आह्माशब्द




मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पोतदार यांस कडे अगर आम्हां कडे.

गोविंद भा. ओक

वाशिम, वऱ्हाड.

## उत्तम सोय

आम्ही हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्रज्या ( कच्चे व पक्के रंगाच्या ) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना कलाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आपापशी करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर

नमुना ( जी )

नादारी मुकद्दमा नंबर १७ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला.

सर्व धनको यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं, बळीराम वल्लद रावजी पाटील राहाणार हसनापूर तालुके बाळापूर हा नादारी आहे असा आज तारीख २४ माहे ८ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ११ माहे सपटेंबर सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ घ्यावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. म्हणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. २।९।१८९५ इ०

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court
Akola District.

## इंग्लिश आणि नेटीव

( लिहून आलेला मजकूर. )

कांहीं विषय अशा प्रकारचे असतात कीं. त्या विषयीं लेखन अथवा संभाषण या द्वारें किती ही उहापोह झाला तरी पुनः पुनः त्यांचें उद्घाटन करणें कंटाळवाणें होत नाहीं. अशा रितीनें ते वारंवार दृष्टी समोर येत गेल्यानें, ते विषय उपस्थित करण्याचे उद्देश कांहीं अंशीं तरी साध्य होऊं लागतात. ज्ञान अथवा सामान्यत्वेंकरून जगाची प्रवृत्ति हीं एका विशिष्ठ स्थितींत दीर्घ काळ पर्यंत कधींच राहिलीं नाहींत व ती राहूं शकणार ही नाहींत. प्रवाहाला ज्या मानानें भूमीचा निम्न प्रदेश सांपडेल त्या मानानें तो आपल्या शक्ती प्रमाणें पुढें गेलाच पाहिजे. त्याला कृत्रिम उपायांनीं प्रतिरोधित केलें असतां जरी कांहीं वेळ त्याची गति कुंठीत होईल अगर तो प्रतिगामी झालासा दिसेल तरी, अखेरीस परिस्थितीच्या मानानें त्या प्रतिरोधांस न जुमानतां कांहीं विवक्षित कालानें तो पुढें गेलाच पाहिजे. ही जनसमाजाची प्रगति अश्याच रितीनें होत आहे. ती एका विवक्षित स्थितींत न राहतां नेहमी आपला पुढील मार्ग आक्रमणार. परम दयाळू ब्रिटिश सरकारचें साम्राज्य आर्यावर्तांत झाल्यानेंच आह्माला उत्कर्ष काळ प्राप्त झाला आहे. आमची आधि भौतिक आणि मानसिक सुधारणा झाली आहे. नाहीं तर देशांत पूर्वी प्रमाणेंच भालेराई सुरू असती, लोक अज्ञान तमांत बुडालेलेच राहते आणि ज्या प्रमाणें इंडियन लोक आतां नामशेष मात्र राहिले आहेत त्या प्रमाणें आह्मी हि कालवशें करून फक्त इतिहासाचा विषय बनून राहिलो असतो अथवा प्रथम मनुष्याला इश्वरानें ज्या स्थितींत उत्पन्न केलें त्या प्राथमिक स्थितींत तरी आह्मी आजला खाचित असतों, अशी विधानें करणें फार धारिष्टाचें आहे. आजला इंग्रज आमचे धनी आणि आह्मी त्यांची प्रजा हा जडलेला संबंध घडून आला नसता तरी देखील जगाची पुढें जाण्याची जी गती आहे त्या गतीला आमचा विस्तीर्ण देश अपवाद बनून राहिला नसता. जुन्या समजुती, जुने आचार विचार आणि जुनी वस्तु स्थिति यांत इष्ट दिशेनें वाचित बदल झाला असतां कारण असे बदल अनेकवार झाल्याचीं आपल्यांत प्रमाणें सांपडतात. या मुद्या संबंधी एक उदाहरण दिलें असतां त्यावरून त्याचा बराच उलगडा होणार आहे. कोमल गतभर्तृका संबंधानें आजला आपण जी अनुकंपा दाखवितों आणि त्यांच्या संबंधीं आपणाला आजला जी हळहळ वाटून दयेनें अंतःकरण कळवळून जातें त्या संबधानें पेशवाईंत एक घडलेलें उदाहरण लक्षांत ठेवण्या जोगें आहे सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत पटवर्धन सरदाराची १४।१५ वर्षांची एक सुलक्षण कन्या दैवदुर्विपाकानें विधवा झाली होती. तें पाहून तिच्या पित्याचें अंतःकरण शोककुठारीनें शतधा विदीर्ण होत होतें आणि दुःखोद्विगात त्यानें तिचा पुनर्विवाह करण्याचा संकल्प केला. या वरून अलड पोरींनीं मंगलसूचक कुंकुम तिलक आणि सुंदर कचकलाप या व्यतिरिक्त राहणें अनिष्ट असून, हा घातक प्रघात बंद झाला पाहिजे, असें त्यावेळच्या लोकांच्या मनांत येणें म्हणजे, सुधारणेच्या इष्ट दिशेनें त्याची प्रवृत्ति झाली होती असें दिसून येतें. कोमल युवतीनें वैधव्य स्थितींत

दिवस कंठणें अत्यंत शोचनीय होय असे विचार इंग्रजांच्या सहवासानेंच आमच्यांत उत्पन्न झाले असें या वरून आपल्याला ह्मणतां येणार नाहीं. इंग्रजाचें हिंदुस्थानांत राज्य होऊन आज १५० वर वर्षें झालीं इतक्या अवधींत पुनरुद्वाहित वनिता किती शा झाल्या? आह्माला वाटतें हेंच जर स्वराज्य असतें तर कदाचित हा प्रघात आमच्यांत आजला बराच पडला असता; कारण, इंग्रज लोक परकीय असल्यानें ते आमच्या सामाजिक बाबतींत आपलें पूर्ण औदासिन्य दाखवितात; तसें औदासिन्य आमच्याच राजांच्या हातून खास दाखविलें गेलें नसतें. सारांश काळाचें माहात्म्य असें आहे कीं तह्मी राजी असा अथवा नसा तो आपल्या बरोबरच जन समाजास नेणार !

या वरील विवेचना वरून कदाचित असा देखील गैरसमज होण्याचा संभव आहे ह्मणून हें येथें सांगितलें पाहिजे कीं, इंग्रजांच्या सहवासानें आह्माला लाभही मोठ्या महत्वाचे मिळाले आहेत आणि एकंदरीच्या मानानें पाहातां इष्ट दिशेकडे आमचा त्वरित गतीनें प्रवेश होण्यास ते बऱ्याच अंशीं कारण झाले आहेत असें आह्मासही कबूल आहे. आमचें ह्मणणें फक्त एवढेंच कीं सूर्य चंद्र न उगवले ह्मणजे सर्व जग अंधारमय असतें तसें इंग्रजांचा उदय आमच्या आर्यावर्तांत झाला नसता तर अज्ञानरूपी अंधकार येथें पडला असता. जगाच्या प्रगती बरोबर आह्मी पण गेलों असतों.

इंग्रजाच्या सहवासानें आह्मी कांहीं गोष्टींत बराच पुढचा मार्ग आक्रमण केला आहे पण उलट कांहीं गोष्टींत त्यांच्या चमत्कारिक राजपद्धतीनें आमची फार पिच्छेहाट झाली आहे ती इतकी कीं स्वराज्यांत आमच्या अंगीं जे सद्गुण अगर ज्या कला वास करीत होत्या त्यांस आतां आह्मी अगदीं परके झालो आहों! असो आमच्या सुदैवानें ह्मणा अगर कसेंही ह्मणा इंग्रज लोकांशी, आमचा संबंध चमत्कारिक रीतीनें घडून आला आहे. आतां हा संबंध जितका दृढ होईल आणि राज्यकर्ते आणि प्रजा यांत जितका मळोखा, प्रेम वगैरे निर्मळ मनोविकारांचें प्राबल्य होईल तितकें आह्मास इष्ट असून अवश्य झालें आहे. परंतु देशभाषा, आचारविचार, धर्म आणि मनोविकार यांत त्यांच्यांत आणि आमच्यांत फार मोठी तफावत असल्यानें असा संबंध घडून येणें तितक्याच मानानें कठीण झालें आहे. असा संबंध जुळून येणें हें इंग्रजी राज्य कायम राहण्यास मुख्य कारण असल्यानें इकडे दुर्लक्ष करणें त्यांना परिणामीं हितकर होणार नाहीं आणि देशाची प्रस्तुत स्थिति ध्यानांत आणतां आमची उन्नति होण्यास त्यांची आह्माला जरूर असल्यानें आह्मी ही पण या विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ह्या सर्व गोष्टी समजत असतां उभयतांत हल्लीं कितपत सख्य अगर प्रेमभाव आहे या विषयीं विचार करूं. विचाराअन्तीं आपल्याला दिसून येतें कीं प्रेमभावाचा आजला अभावच आहे पण त्या ऐवजी तिरस्कार, अवहेलना, असंतोष आणि बेबनाव यांचें प्राबल्य माजलें आहे. हा अनिष्ट प्रकार असण्याचें कारण काय, यांत दोष कोणाचा आणि प्रस्तुतची शोचनीय स्थिति दूर करण्यास उपाय कोणते ह्यांचा विचार करण्याच्या उद्देशानें प्रस्तुत लेख लिहिला आहे.

हिंदुस्थान देशांत सोन्याचा धूर निघतो अशी कर्णोपकर्णी आख्यायिका ऐकून युरोपियन राष्ट्रांस मोह सुटला आणि येथील संपत्तीचें हरण करावें ह्मणून इ० सन १४९७ च्या साली प्रथमतः युरोपियन राष्ट्रांनीं व्यापार करण्या करिता हिंदुस्थानांत प्रवेश केला. इ० सन १६०० च्या वर्षीं इंग्लंदात हिंदुस्थानवासी व्यापार करणारी मंडळी स्थापित होऊन, ह्या साली पहिल्यानें इंग्रजांचा व्यापारी ह्मणून हिंदुस्थानांत प्रवेश झाला. त्यावेळीं येथील सार्वभौम राजा सलिम उर्फ जहांगीर होता. ह्या युरोपियन राष्ट्रांपैकीं इंग्रज लोकांस दैवाच्या चंचल गतीनें हातची वागडी सुटून पुढें राज्याधिकार प्राप्त झाला.

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ५ शके १८१७

विलायती सुतावर व कपड्यावर जी जकात बसविण्यांत आली आहे ती रद्द करण्याविषयीं मांचेस्टरवाल्यांचे भगीरथ प्रयत्न चालूं आहेत. स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिलटन ह्मणतात कीं गेल्या फेब्रुवारींत जे विचार मी प्रगट केले तेच माझे कायम आहेत ह्मणजे विलायती कपड्या वरील जकांत अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वाला बाधक व इंडियन लोकांच्या कल्याणाला प्रतिरंधक असून ती पुन्हा बसविते वेळीं मोठी चूक झाली व राज्यपद्धतींतलें मूळ धोरण फसलें. जसे लार्ड हामिलटन तसेच त्यांचे सूत्रधारी मुख्य प्रधान लार्ड सालिसबरी; किंबहुना उदात्त विचारांनीं व इंडिया विषयींच्या कळकळीनें ते कांकणभर जास्त हितकर्ते ह्मणून जाणवले जातील! हिंदुस्थान सरकारनें जकात बसविते वेळींच सर्व तऱ्हेनें सुविचार करून त्या सुविचाराला कृतीने मंडन केलें. तथापि मांचेस्टर वाल्यांचा अर्ज हिंदुस्थान सरकाराकडे पाठवून त्यावर त्यांचा अभिप्राय विचारला आहे. हा अभिप्राय विलायतेस रवाना झाल्या नंतर स्टेट सेक्रेटरी कायमचा पक्का ठराव करणार आहेत. प्रथम जकात बसविण्यास जीं कारणें होतीं तीं अद्याप अस्तित्वांत असून दुणावलीं आहेत. हिंदुस्थान सरकारनें जर आतां वाऱ्या प्रमाणें पाठ फिरविली तर सर्व देश आश्चर्यानें चकित होईल व तें बहुत खेदास कारण होईल. चित्रळच्या मोहिमेचा खर्च तीन कोट रुपये होऊन चुकला आहे, दुष्काळ निवारणार्थ राखून ठेविलेला फंड पुन्हा उभारावयाचा आहे आणि पुष्कळ खर्चाची तोंडें खुलींच आहेत तेव्हां जकातीचें उत्पन्न सोडण्याची युक्ति कोणतें शहाणें सरकार पतकरील बरें! हिंदुस्थानचा कर्जबाजारीपण', तिजोरीची नाजूक स्थिति व पैशाच्या अडचणी इत्यादि गोष्टी लार्ड हामिलटन यांस लटक्याच वाटतात. त्यांच्या मतें सर्व खजिन्यांतला घोटाळा हुंडणावळीच्या कडक भावामुळें झाला आहे. लार्ड लान्सडोन यांनीं नाण्याचा कायदा करून टांकसाळी लोकांपुरत्याच बंद केल्या खऱ्या पण असा कृत्रिम उपायानें रुपयाची किंमत वाढली नाहीं तीनाहींच पण पूर्वीं प्रमाणें उतरतच राहिली. शिवाय विलायती कपड्यावर जकात बसविली तेव्हां तिचे दुष्परिणाम म्यांचेस्टरवाल्यांवर घडूं नयेत ह्मणून इंडियांतल्या कापडावर व सुतावर निराळा कर बसविला. पण लार्ड हामिल्टन यांच्या मतें हा कर योग्य प्रकारें वसूल केला जाणार नाहीं आणि त्यामुळें विलायतच्या कापडवाल्यांचें नुकसान चालूंच राहील लार्ड हामिलटन यांनीं इंडिया संबंधानें फार धोक्याचें विधान केलें आहे. ते ह्मणतात कीं विलायतेहून जो पैशाची मदत व लष्करची कुमक मिळते ती आह्मी काढून टाकिली तर इंडियाचें राष्ट्र रसातळास पोंचलेंच असें समजा; हिंदुस्थानांत राज्य स्थापिते वेळीं विलायतच्या लोकांच्या पैसा बहुत खर्च झाला आहे व त्यांचा रक्तपातही मोठा घडला आहे त्या अर्थीं आपल्या लोकांचा फायदा व कल्याण इंडियांत झालें नाहीं तर इंडियाचें राज्य असून काय उपयोग! इंग्लिशांनीं ज्या वसाहती केल्या आहेत त्या व इंडियाचें राज्य यांमध्यें हाच मोठा फरक कीं इंडियाचें राज्य इंग्लिशाच्या गत श्रमाच्या मोबदल्यांत सुखवैपुल्या साठींच आहे. राज्यकर्ते व प्रजाजन यांच्या मधील खऱ्या संबंधाची ओळख लार्ड हामिलटन यांस कितपत आहे हें निराळें कळविण्याचें कारण नाहीं. न्यायानें हिंदुस्थानचें राज्य करावयाचें पण इंडिया व इंग्लंड या उभयतांच्या हिताहिताचा संबंध पोंचला ह्मणजे मात्र इंग्लंडचें घोडें पुढें गेलें पाहिजे. या दृष्टीनें विलायतच्या सुताचगोल व कपड्यावरील जकांत उठविलीच पाहिजे. हिंदुस्थानच्या मालावर कर बसविला तथापि मांचेस्टरवाल्यांच्या मनाची शांति नाहीं. बरें ही जकात उठविली तर खजिन्यांतली तूट कशी भरून काढावी या प्रश्नाचें उत्तर लार्ड हामिलटन काय देतात तें त्यांच्याच मनाला ठाऊक! दुसरा कोणताही कर बसविण्यास सवड नाहीं अशा विषयीं सर आकलंड कालव्हिन सारख्यांनी जगाची खात्री करून दिली आहे पण हा विचार आमच्या स्टेट सेक्रेटरीच्या मनांत कसा यावा!

'काळा व गोरा' हा भेदाभेद आह्मी मोडण्यास पहातों पण आमचे राज्यकर्ते बोलण्यांत गोड असून कृतीनें हा आपपरभाव अगदीं दृढ करीत आहेत. दक्षिण आफ्रिकेंत नवीन वसाहती झाल्या आहेत तेथें इंडियांतले लोक गेले ह्मणजे इंग्लिश लोक त्यांचा छळ व अवहेलना करूं लागतात. इंग्लिश व इंडियन लोक सारखेच महाराणी सरकारचे प्रजाजन आहेत आणि उभयतांस सारख्याच दर्जानें गणिलें पाहिजे. व त्यांस सारखेच हक्क दिले पाहिजेत. पण सापत्नभाव आपल्या इंडियन लोकांशीं सर्वत्र दृष्टीस पडतो. दक्षिण आफ्रिकेंत आपले लोक गेले तर त्यांस तेथें स्थावर इस्टेट मिळविता येत नाहीं, परवान्या वाचून चोहींकडे हिंडता फिरता येत नाहीं, त्यांनाच रजिस्टेशन फी साडे तीन पौंडाची द्यावी लागते आणि ही फी दिल्यावर परकीयांचा प्रवेश होऊं शकत नाहीं, आंस व्यापार करण्याचा परवाना मिळण्याची मोठी पंचाईत पडते, व्यापाराचा परवाना मिळाल्यास वाटेल तेव्हां शहरापासून लांब दूरवर जाण्यास परकी लोकांस हुकूम देतात, आणि त्यांनीं रात्रीं नऊं वाजल्या पलिकडे घराबाहेर फिरता कामा नये. हा जुलूम व बेबंदशाही मोडून टाकण्या विषयीं नामदार भावनगरी व दादाभाई यांनीं विलायतच्या वसाहतीविषयक सेक्रेटरीपाशीं विनंती केली होती आणि या विनंतीचा योग्य विचार करण्यांत येईल अशा विषयीं आश्वासनही दिलें आहे. इंडिया सरकारनें या विषयाकडे लक्ष पुरविलें तर लवकरच हा प्रश्न समाधानकारक निकालास लागेल अशी आह्मास उमेद आहे. आधींच इंडियन लोक देशान्तर करण्याला सदांसर्वकाळ नाखुष असतात पण तशांतही कांहीं धोरणी, धैर्यशाली व देशाटनपटु लोक या देशांत निघाले तर त्यांस वरील प्रकारच्या विघ्नांनीं अडथळा आणितात हें आपल्या देशाचें मोठें पाप होय किंवा इंग्लिश राजनीति वेश्यांगने प्रमाणें विचित्र व भुरळ पाडणारी आहे!

वऱ्हाडांत एकंदर दिवाणी न्यायाची कोर्टें ४३ आहेत. त्या पैकीं ९ स्मालकाज कोर्टें आहेत. एक तहशिलदार व चार नायब तहशीलदार यांजकडे दिवाणी अधिकार असल्यामुळें तींही पांच दिवाणी कोर्टें गुदस्ता प्रमाणें चालूं होतीं. सन १८९४ सालीं जितके दावे दाखल झाले तितके पूर्वीं कधींच झाले नव्हते. १८९३ साल अखेरीस ४८०६ दावे शिल्लक होते आणि १८९४ त ३०१४१ नवीन दावे लोकांनीं लाविले व ९७० पुन्हा रजिस्टरी दाखल करावे लागले. हे सर्व मिळून एकंदर ३५९१७ दावे १८९४ सालीं रजिस्टरावर होते. या पैकीं ३१२१८ प्रकरणांचा निकाल लागून चालूं सालाकरितां ४६४९ प्रकरणें शिल्लक राहिलीं. दिवाणी कामातली ही मोठी वाढ स्मालकाजच्या खटल्या संबंधानेंच विशेष आहे. याबर जुडिशिअल कमिशनर साहेब यांचा असा अभिप्राय पडतो कीं दाव्यांचे निकाल जलदी आणि नियमितपणें होत गेले ह्मणजे लोक मोठ्या खुषीनें व तत्परतेनें कोडताची पायरी चढतात. आह्मास ही गोष्ट बरोबरशी वाटत नाहीं. मि. बुल्क साहेब ह्मणतात कीं स्मालकाजच्या स्वरूपाचे दावे चालविण्याचा अधिकार कांहीं ज्यास्ती न्यायाधिशास दिला यामुळें दिवाणी खटल्याची संख्या वाढली. आणि या वाढीचें कारण इतकेंच कीं निवाडे झपाट्यानें होऊं लागले. साहेब बहादुरांच्या दृष्टीनें या वाढीशीं व्यापार किंवा शेतीवाडी यांच्या कमज्यास्तपणाचा कांहीं संबंध नाहीं. आमच्या मतें गेलीं तीन वर्षें पीकपाण्या संबंधानें चांगलीशीं नव्हतीं; त्यामुळें शेतकऱ्याकडील रकमा अधिक थकल्या आणि फिर्यादी शिवाय वसूल होण्याचे मार्ग लोपले ह्मणून स्मालकाजच्या स्वरूपाचे खटले वाढले.

कामन्स सभेंत लार्ड हामिल्टन यांनीं इंडियाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रकावर गेल्या गुरुवारीं संभाषण केलें त्या वेळीं त्यांनीं सर्व भागून १ कोट २२ लक्ष रुपये शिल्लक राहील असा अंदाज कळवितांना असें बोलून दाखविलें कीं इंडियाच्या खजिन्याची सुस्थिती आज मितीस आहे अशी पूर्वीं कधींच नव्हती! खरोखर नवल आहे! आमिरांचे चि-

रंज व नसरुल्लाखान यांच्या सफरीचा खर्च त्यांचा त्यांनीं द्यावा असें ठरविलें आहे हें मात्र ऐकून परम संतोष वाटला.

---

यंदा पुण्या मुंबईकडील गणपतीचे उत्सव निर्विघ्नपणें पार पडले पण धुळ्यास मुसलमानांच्या दांडगाईनें मोठा कहर उसळला आहे. गेल्या १ ले तारखेस मशिदी समोर गणपतीचा मेळा येतांच मुसलमानानीं दंगा केला. परिणामीं, पलटणी आणवून बंदोबस्त करावा लागला. बंदुका झाडल्या, वीस मनुष्यें मरण पावलीं, व कित्येक घायाळ झालीं तेव्हां पूर्ववत् शांतता होण्यास प्रारंभ झाला. हिंदुमुसलमानामधील तंट्याचें मूळबीज सरकारनें उपटून काढल्या शिवाय असले दंगे मिटणार नाहींत. वऱ्हाड प्रांतीं असा कांहीं प्रकार घडला नाहीं हें विशेष समाधानकारक होय.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 9, 1895

The Hindus and Musalmans the two leading sections of Her Majesty's subjects in India, have now come to find after the sad experience of many fatal disturbances at various places, that a slight opportunity is sufficient to provoke an unfriendly feeling between these two communities. So long as this unfriendly feeling confines itself to the members of the two communities Governmet has had no opportunity sufficiently to perceive and appreciate the bitterness of the feeling. Unhappily things have lately come to pass which afford much reason for the Government seriously to consider what steps should be taken not to allow its indifferent attitude any further to encourage some fanatics to foster this bitterness of feeling. The recent disturbance at Dhulia exemplifies this remark.

On the first of the current month Dhulia was filled with much consternation. Like other places Dhulia has had its Ganpati processions. This year while the Ganpati procession was passing by a Musjid a number of Mahomedans who, it is reported, had concealed themselves in the Musjid, came out all of a sudden crying out "Din" "Din" and required the procession to stop all music in front of the Musjid. Mr. Cumine the Collector of Khandesh rode at the head of the procession. The procession was escorted by a very small band of the local police. All the entreaties and offers of conciliation which Mr. Cumine made at the time were of no avail. At length one Mahommedan Makhan by name rushed out of the crowd and gave a blow to Mr. Cumine in his chest. This was followed by a heavy shower of stones pelted at him and the members of the procession by the Mussalmans assembled inside the Musjid. Mr. Cumine got down and attempted to catch his assailant when he was attacked ruthlessly by some badmashas of the mob. Mr. Cumine's position was certainly very precarious. It was when the Collector of the District was reduced to such a state of imminent danger to his life that shots were fired at the mob. A few were shot dead on the spot and certain more injured. Up to this time seventeen is the number of the dead.

It was only when such extreme steps were taken in behalf of the executive authority that the mob disperced. The procession did not receive any further obstruction and went off quietly. Indeed Mr. Cumine showed much presence of mind, tact and vigour.

This fatal disturbance at Dhulia which had hitherto enjoyed perfect peace and amity between the two communities, leads us now to believe that the relations between two great communities are becoming day by day more and more unfriendly. It is high time now for the Government to take up this subject with all the eagerness and attention that it deserves and to come to some definite final conclusion as to the line on which effective measures can be adopted not only to check any further fermentation of ill-feeling between the two communities but to encourage and foster peaceful and amicable relations between them. It must at the same time be suggested that the measures to be adoped should be arrived at after a full and just considerations of the assertions of both the Communities. An impartial solution of the difficulty is what is badly wanted.

---

This year the monsoons set in very favourably. People were indulging high hopes about the condition of the crops. Heavy and continuous showers prevailed but there has been such an awful break this whole month or upwards that it is generally believed that if it does not rain now all the crops will wither away.

If the same state of things continues for some time more famine is sure and certain. The last three years were very unfavourable and if this year also turns out similarly there is no knowing what will happen in the case of poverty-striken Kunbis whose livelihood depends entirely on a good condition of lands.

Fortuately we have a return of rain in nick of time and it is interesting to read the weather-forecast based on meteriological obeervations of snow-fall in the Himalaya and the changing out—break of stormy weather at sea. The following are the inferences as regards the main geographical divisions of India:—

1st.—It is probable there wil be no prolonged general break in Northern or Central India during the month of August, and that the monsoon currents will be normal, or slightly below their usual strength in the months of August and September.

2nd.—It is probable that the rains will cease slightly earlier than usual in Upper India. Conditions are [as indicated by the existence of a local high pressure area in South-West Rajputana and Central India, West ] unfavourable in the West Punjab, Sind, Cutch and West Rajputana, and it is very probable the rainfall during the remainder of the season will be more or less considerably belwo the normal in these areas. The rainfall in the East Punjab and East Rajputana will probably be in slight to moderate defect.

3rd.—It is probable that the North-Western Provinces will obtain normal rain in August and September, and Bengal and Bihar favourable rain in September and October.

4th.—Conditions are favourable in the Central Provinces and North Deccan, and they will hence probably receive normal rain.

5th.—Conditions are at present favourable for normal rain in Southern India during the retreating south-west monsoon, but it is, on the whole, probable the rains of that period will cease earlier than usual.

6th.—It may be noted that, so far as can be judged from the present conditions, it is probable the cold-weather rains in Northern India will be below the normal.

7th.—The data for Upper Burma are two scanty and unreliable to enable an estimate of the probable character of the rains in that area to be made. Pressure conditions are generally favourable in Burma, and it will probably, as a whole, receive normal rain during the remainder of the season.

## वऱ्हाड

हवामान— गेल्या तीन दिवसांत पावसानें कृपा केली. पाऊस थोडा पडला तरी आणखी पुष्कळ पडेल अशीं लक्षणें दिसतात. पिकें नाहींतशीं होण्याच्या रंगास आलीं होतीं पण आतां चिंता दूर झाली. सार्वजनिक आरोग्य मध्यम स्थितींत आहे.

रा. रा. विष्णु रंगनाथ सेंबेकर यांस कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं कायम करण्यांत आलें.

रा. रा. विनायक आप्पाजी काणे, अकोट, मि. राहिमतुल्ला हाकिमुद्दीन, वणी, मि. अबदुल कदुस, बाळापूर यांस तहशिलदारीच्या कायमच्या जागा मिळाल्या असल्या विषयीं कळतें.

मि. एदुलजी संजाना यांस इलिचपूर जिल्ह्याचे जिल्हा रजिस्ट्रार नेमण्यांत आलें.

मि. बी. भुकन एकस्ट्रा असि. कानसरव्हेटर बुलढाणा यांस दोन महिने व सहा दिवस इतक्या मुदतीची हक्काची रजा मिळाली. आणि त्यांच्या रजेंत मि. पीक एकस्ट्रा असि. कान्सरव्हेटर यांस बुलडाण्यास नेमिलें.

बुलडाण्याचा पाण्याचा तलाव स्वच्छ राहावा ह्मणून मुनासिपालिटिनें त्या भागांत लोकांची वर्दळ बंद केली, गुरें ढोरें त्या हद्दींत आणण्याची मनाई केली, व आसपास झाडें झुडें न लावण्या विषयीं सक्त हुकूम दिला आहे. जो हे नवीन नियम मोडील तो शिक्षा पावेल.

मि. काटग्रेव्ह, पोलीस सुपरिंटेंडेंट, अकोला यांस येत्या १५ वे तारखे पासून दोन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली. व असि. पोलिस सुप० आणि पोलिस इन्स्पेक्टर मि. काफर्ड यांस अकोल्यास आक्टिंग पोलीस सुपरिंटेंडेंट नेमिलें.

रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्रे यांची बदली इलिचपुरास क्लार्क आफ कोर्टाचे जागीं झाल्या प्रमाणें ते तिकडे रवाना झाले. आणि त्यांच्या खामगांवच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. रंगनाथ विष्णु यांची नेमणूक झाली आणि ते तेथें दाखल झाले.

सैय्यद हुसेन चीफ कानस्टेबल, मलकापूर यानवर लांचाचा मोकदमा होऊन दीड वर्षाची सजा झाली.

गेल्या १ ले तारखेस जळगांव जायत्रीचा अन्नशालास्थापनसमारंभ रावसाहेब देवराव विनायक यांच्या हातून झाला. या इमारतीचा खर्च तेथील सुप्रसिद्ध उदार गृहस्थ रा. रा. दिनानाथ गोपाळ हे देणार आहेत. जळगांवास असा आनंदोत्सव अपूर्व होता रा. रा. पन्हाळकर, नगरकर, धर्माधिकारी, लक्ष्मणराव नाना, राजंदेकर, आप्पाजी बळवंत, रामराव हणमंत, दामोदर नानाजी इत्यादि गृहस्थांनीं आपापल्या रसाळवाणीनें, व प्रयत्नानें हा समारंभ मोठा अप्रातिम केला होता.

पिंपळगांव काळे येथील जायत्री साठीं एक रम्यगृह बांधण्याचा प्रारंभसमारंभ काल रोजीं होणार होता. रा. रा. एकोजी पाटील यांनीं या सत्कार्यासाठीं उदार हस्त पुढें केला आहे.

शाहू नगरवासी नाटककार मंडळीनें या आठवड्यांत मंजुघोषा व राणा भीमदेव असे दोन खेळ करून दाखविले. गाणें वगैरे कांहीं नाहीं. पण असे गद्यात्मक खेळ प्रेक्षकांस फार आवडतात. संसारांतील बहुविध गोष्टीचे रमणीय चित्रपट अशा नाटकांनीं लोकांच्या मनासमोर तत्काळ उभे रहतात ही सामान्य गोष्ट नाहीं.

रा. रा. गोपाळ वामन बापट हे आज सकाळच्या गाडीनें मेहकरास रवाना झाले.

---

नमुना ( जी )

नादारी मुकद्दमा नंबर २१ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला.

सर्व धनको यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं, गोपाळ बहिरानी मारवाडी सिंपी राहाणार अकोलें तालुके अकोलें हा नादारी आहे असा आज तारीख २४ माहे ८ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ९ माहे अक्टोबर सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. ३।९।१८९५ इ०

B. B Sule.
Judge
Bankruptcy Court
Akola District.

---

## वर्तमानसार.

ingle copy

चीनकडे ख्रिस्ती लोकांवरील कत्तलीचा बंदोबस्त ठेवण्यासाठीं जर्मनीनेंही आपल्या येथील वकीलास हुकूम दिला आहे.

फारच भयंकर—अमरेली ( गुजराथ ) येथील हिंदु सभ्यजनांनीं मुंबईच्या पत्रांस अशी तार पाठविली आहे कीं, तेथील जंकेश्वर देवालयांतील पुजाऱ्याचा कोणी मुसलमानांनीं भयंकर रीतीनें खून केला आहे, गुन्हेगार सांपडले नाहींत. याचा जारीनें तपास झालाच पाहिजे.

बेलजममध्यें एंटवर्प शहरापासून सत्तेचाळीस मैलांवर घीळ नांवाचें एक शहर आहे. येथें सर्व वेडे लोक ठेवले आहेत.

चीनमध्यें ख्रिस्त्यांचा खून करण्याच्या अपराधावरून सद्या इसमास अपराधी ठरविलें आहे, त्यांना कडक शिक्षा व्हावी म्हणून इंग्रजांची गडबड चालली आहे.

जपानांत परदेशांतून माल येत होता त्यापेक्षा त्यानें आपला माल परदेशांत पाठविण्याचा क्रम जारीनें वाढविला आहे.

चीनच्या लढाईंत मिळविलेलें पेर्डिआर्थर बंदर, जपान सरकार सोडून चाललें असून त्यापूर्वी तेथील किल्ले जमीनदोस्त करीत आहे. ही एकूणविसाव्या शतकांतली वेर पद्धतीच असी कीं किल्यांना भिऊन ते जमीनदोस्त करायाचे!

अमीराचा यूरोपाचा बेलेला मुलगा, ९ सप्टेंबर रोजीं हिंदुस्थानांत येण्यास निघणार,

गया येथील बुद्ध मंदिराच्या लटक्यांत शिक्षा झालेले हिंदु जपीलांत बेपत्तक झाले.

पृथ्वींत मनुष्यांची उत्पत्ति कशी झाली याविषयीं अमेरिकेंतील जंगली लोकांत अशी समज आहे कीं, 'महात्म्या'नें प्रथम एक चिखलाचें चित्र करून त्यांत प्राण घालून हबशी लोक निर्माण केले, नंतर त्याच प्रमाणें दुसऱ्यानें चिनी व तिसऱ्यानें अमेरिकेंतील जंगली इंडियन केले. पण याशी संपल्यावर पतंगाचा किडा घेऊन, व त्याचे पंख वगैरे काढून त्यापासून फ्रेंच उत्पन्न केले. व दुसऱ्या एका किड्यापासून इंग्रज केले.

सबर मनुष्याच्या उंची इतका मोठा फोटोग्राफ घेतां येण्याजोगा कॅमेरा, लंडीन शहरच्या वैनेरे आंड सन कंपनीनें तयार केला आहे. त्यांत सात फूट उंच व पांच फूट रुंद इतका मोठा फोटो घेतां येतो.

आंबे खाल्यावर त्यावरतीं दूध प्यालें म्हणजे आंब्याचा रस बाधत नाहीं.

भुईमुगाच्या शेंगा खाल्यावर ताक प्यावें म्हणजे त्या बाधत नाहींत. कोणी त्यावर पाणी पितात. पाण्या पासूनही बराच उपयोग होतो.

खरबुजें खाल्यावर पाण्यांत बत्तास कुसकरून तें पाणी प्यावें; म्हणजे नुकसान होत नाहीं.

बडीशेप व खडीसाखर समभाग घेऊन खात जावें, म्हणजे कसलाही उन्हाळा असला तरी बाधत नाहीं.

उन्हाळ्यामुळें नाकांत फुटकळ्या येऊं लागतात; त्यासाठीं कापूराचा खडा नाकांत घालीत जावा, म्हणजे त्या पुटकळ्या बऱ्या होऊन उन्हाचा त्रास कमी होतो.

गजकरणावर पारिजातकाच्या झाडाच्या पाल्याचा रस, दररोज दोन वेळां, याप्रमाणें कांहीं दिवस लावल्यानें, गजकर्ण साफ बरें होतें.

वडूलिरे व पांढऱ्या कांद्याचा कीस हीं समभाग घेऊन, तुपांत परतून परतून राख करावी. व त्यांतच थोडा कापूर घालून तुपांत व या सर्वांचा एकत्र खल करावा. हा मलम डब्यांत भरून ठेवावा. व खरूज, उष्ण तेच्या पुटकळ्या वगैरेंवर लावीत जावा; म्हणजे फार चांगला उपयोग होतो. लावण्यापूर्वीं ती जागा साबण लाऊन साफ धूत जावी. स० वि०

बिनतारेची तार— तारेशिवाय १८००० मैल खबर पाठविता यावी असाबद्दल अमेरिकेंत खटपट चालू आहे. ज्ञा०

भुकेनें मृत्यु:— गेल्या तीस वर्षांत चीन देशामध्यें अन्नावांचून ९ कोट लोक मेले! हाय! हाय!

खून:— रावळपिंडी शहरांत एका महिन्यांत २५ खून झाले!

तोटा:— गतवर्षी सरकाराला अफूच्या व्यापारांत ४ लाख रुपये तोट्या आला.

क्विनाईन:— गतवर्षी बंगाल्यांतील पोष्टांतून २३,१०,००० क्विनाईनच्या पुड्या खपल्या.

मद्रासेकडे एका बाईचे मुलास कुत्रा चावला या बद्दल तिनें म्युनिसिपालिटीला कळविलें. म्युनिसिपालिटीनें त्या कुत्र्यास ठार मारण्याचे ऐवजी त्याचे सर्व दांत पाडून त्याला सोडून दिलें.

रेल्वे गाडी चालली असतां मध्यंतरीं रोजगार गाई हैस आड्यास दूर करता यावी म्हणून "कौक्याचर" नांवाच्या गाडीला अमेरिकेंत असतें हें प्रसिद्ध आहे. रशियांत नवीन युक्ति कौक्याचरची निघाली असून तिची कसोटी चालू आहे. त्या युक्तीनें अमेरिकन कौक्याचर प्रमाणें ढोर बाजूला केलें जातें तसें न करतां एन्जिन खालीं एक पाळणा असतो त्यांत ठेविलें जातें. त्या ठिकाणीं त्याला दुखापत होत नाहीं.

भयंकर मातृहत्या:— दोघा पोरांस आईचा राग आला. म्हणून धाकट्या पोरानें थोरल्याचे मनांत भरवून दिलें कीं, आईची कंबक्ती काढावी! बाप गांवास गेला हें पाहून त्या दोघांनीं आईस खालीं पाडली व दांडक्यांनीं बडवून बडवून तिचा जीव घेतला. व तिचें प्रेत ज्या खोलींत होतें त्या खोलीस कुलूप लावून तिचे बाहेर एका गृहस्थाशीं चैनींत पचे खेळत आठ दिवस काढले! आठ दिवसांनीं खोलींत फारच घाण येऊं लागली म्हणून ती फोडून आंत पहातात तों—त्या मुलांचें आईचें प्रेत!!

ग्रेट ब्रिटन देशांत हल्लीं लक्षाधीश असे ३,१०,००० लोक आहेत. त्या राष्ट्राचें एकंदर वार्षिक उत्पन्न १६,८६,००,००,००० रुपये असून त्या पैकीं १,१३,००,००,००० रुपये या वर सांगितलेल्या लक्षाधीशांचें आहे.

या पृथ्वीचें वजन एका पंडितानें काढिलें तें ६,८३,१०,६४,००,००,००,००,००,००,००० टण आहे असें आढळलें. आ० व०

धिंड काढली— संभू बिन रावू या नांवाचा एक गृहस्थ इंदापूर तालुक्यांतील एका गांवीं राहणारा आहे. त्याचा व त्याच्या बायकोचा बेबनाव होऊन ती आज पांच सहा वर्षें निराळी रहात होती. पुढें दुसऱ्या एका गृहस्थानें तिला ठेविली. तीन चार महिन्यापूर्वी संभूनें तिला आपल्या जवळ आणलें व एका खोलींत कोंडून ठेविलें व रात्रीं तिचे केस कापले, तिच्या बांगड्या फोडल्या, मंगळसूत्र तोडलें, तिला वस्त्रहीन केलें, व तिच्या तोंडाला पिंजर वगैरे फांसून आणखी तिचाच्या मदतीनें तिला गाढवावर बसवून तिची सर्व गांवभर धिंड काढली. बरोबर केरोसिनचा दिवा घेउन एक मनुष्य वाजवीत होता. एकानें मशाल धरली होती. गांवची मंडळी ही मजा पाहण्या करितां जमा झाली होती. ही धिंड काढल्या नंतर तिला पुनः एका खोलींत कोंडून ठेविलें. अखेरीस पोलिसानें येऊन तिला सोडविलें. पावरून संभू बिन रावू व दुसरे पांच असामी यांजवर फिर्याद होऊन नवऱ्यास ३ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली व इतरास दंड झाला. त्यांना दंड झाला होता, त्यांची शिक्षा का वाढवूं नये असें त्या लोकांना हायकोर्टाच्या जज्जानीं, त्या खटल्याचें तपासणीबद्दल विचारलें आहे. असी धिंड काढण्याचें अलीकडे हें नवीनच उदाहरण आहे.

पाहिजे तें कापड रंग न बिघडतां स्वच्छ करणें असल्यास भाताचे पेजींत धुवावें, व किंचित् ओलसर असेल तेव्हां इस्तरी करावी, रंग बिघडणार नाहीं.

शांघाई ( चीन ) येथें हल्लीं बिजली दिवे तयार होऊं लागले आहेत. त्यांचे खेंडी काठे मात्र विलायतेहून मागविण्यांत येतात. कापूस जपान देशांतून येतो. कांचें अगदीं विलायती प्रमाणें बनतात. व ते दिवसाला २१ तासांची कामगिरी होतात.

चीन— लढाईमुळें चीनचे बादशहाचे डोळे उघडले. चीन देशांतून पुष्कळ ठिकाणीं आगगाडीनें रस्ते करण्याची परवानगी दिली; व जुना मार्ग सोडून कवायती शिपायास एकच पोषाख ठरविला व सर्व लोक युरोपियन कामदारांच्या हातून तयार करण्याचें ठरलें आहे.

आगबोट तीच आगगाडी— कोपेनहेगेन जवळ एक जोडसरोवर आहे. त्यातून पार जाण्या करितां एक आगबोट लागली आहे. या सरोवराचे मधोमध एक संयोगीभूमी आहे. ती वरून जातां यावें म्हणून ही युक्ती निघाली आहे. प्रथमतः आगबोट एका सरोवरांतून गेली म्हणजे मध्ये संयोगीभूमी लागते तीवर लोखंडी रूळ टाकले आहेत या रुळाजवळ येतांच आगबोट रुळावर चढून आगगाडी प्रमाणें धूर निघून पुनः दुसऱ्या सरोवरांत जाते व तेथें पाण्यास लागली कीं आगगाडीची आगबोट. ज्ञा.

येरदा मात्र धुळ्यास दंगा झाल्याची खबर आली आहे. या खबरीवरून असें माझ्याला कळतें कीं हिंदु लोकांचा समारंभ मशिदीवरून चालला असतां मशिदींत जमलेल्या मुसलमान लोकांनीं दगड फेकण्यास सुरुवात केली. हे बंद करण्याकरितां कलेक्टर साहेबांची स्वारी पोलिस शिपायांसह मशिदींत गेली, परंतु आमचे मुसलमान बंधु कसले ऐकतात. त्यांनीं साहेबांचें न ऐकतां पोलिस व साहेब बहादूर यांवरही हात चालविला. तेव्हां कलेक्टर साहेबांनीं गोळी घालण्याचा हुकूम दिला तेव्हां कांहीं मुसलमान मेले व २५।५० जखमी झाले असें समजतें. जास्त हकीकत कांहीं अद्याप कळली नाहीं. हें खरें असल्यास बराच अनर्थ उडाला म्हणावयाचा.

कान्स्टानटिनोपल— एका अलबेरियन टोळीचा टर्किश शिपायांनीं पराभव केला.

लंडन— टर्कीचे सुलतान आर्मेनियाबद्दल कांहीं कळत नाहींत म्हणून फार अडचण झाली आहे.

मागच्या बुधवारीं बांकीपूर येथें श्यामनाथ जोशी नांवाच्या एका मनुष्याला त्याच्या सोळा वर्षे वयाच्या मुलानें सोटे मारून ठार केलें! पापाचा अभाव हत्याच होता कीं, त्यानें या मुलाला त्याच्या चमत्कारिक लोभामुळें आपल्या घरांतून हाकलून दिलें होतें.

रूस आणि फ्रांस या दोन देशांची लष्कर बाहविषयाविषयीं एकमतानें मसलत ठरली आहे. या मसलतीचा अर्थ पुढे काय आहे तो समजला नाहीं. मु०प०

नोटीस

रा. रा. मारुती वेंकटाळणे राहणार मसारी तालुके पाळापूर जिल्हे अकोलें यास नोटीस देणार उद्भान व. नारायण करडेल राहणार शहापूर तालुके खामगांव नोटीशीनें असें कळवितों कीं तुमी मुलगी नावे सोनी हजरी माझे म्हाव भाचा बरोबर लग्न होऊन आज सुमारें १२ बारा वर्षे झालीं सोनी ही शहाणी होऊन ९ दोन वर्षे झालीं तिचे अंगावर मी चांदीचे दागीने रुपये ११९ व सोन्याचे रुपये ५७ चौवनेच व पितांबर रुपये ४९ या असें व आणखी किरकोळ जिन्नस वगैरे घातले होते. ही शहाणी झाल्यावर यावलोनें नवऱ्यापाशीं ज्या चालीनें राहावें त्या प्रमाणें ती बिलकूल राहीना व चांगल्या रीतीनें राहण्याबद्दल तिजला व तुम्हासही बहुत प्रकारांनें सांगितलें परंतु कांहीं उपयोग तर झाला नाहीं. सोनी हिंने वाटेल तेव्हां जावें व वाटेल तें करावें अशाबद्दल मी अगदीं दिक होऊन मेलों व नंतर निरुपाय म्हणून मी माझे मामाचा गंधर्व केला सोनी ही मजपासून मजला कोणत्याही प्रकारानें न कळवितां निघून गेली त्यास एक वर्ष झालें व जातेवेळीं सदरील दागीने व पितांबर घेऊन गेली व तिचे बापानें रोख रुपये १० घ्यावयास घेतले. व हे रुपये व सदरील जिन्नस तुम्हीच ठेवून घेतले म्हणून वगैरे कारणामुळें तुम्हास या नोटीशीनें कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून १९ दिवसांचे आंत सदरहू सोन्या चांदीचे दागीने पितांबर व रोख रुपये १० असे आणून द्यावेत. न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून या नोटीशीच्या खर्चासह सर्व रुपये जे होतील ते भरून घेतले जातील म्हणून दिली नोटीस सही तारीख ३।८।९५ ई०

सही

उद्भान व० नारायण करडेल बस्ती

शहापूर तालुके खामगांव

नि० खु० हातची.

☞ हें आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

कोबेर ,, ७ ,, १८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as.
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 16 SEPTEMBER 1895 NO 36

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १६ माहे सप्तंबर सन १८९५ इ० अंक ३६

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास मुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी वे ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमीशीनें व त्वरित पाठवूं एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट मुंबई.

## चंदाची भांडीं

श्रीक्षेत्र नाशिक येथें तयार झालेली हर एक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम. घडाई पाट १७॥ पेनी. चांदीबद्दल चौकशी करून घ्या लिहिल्याप्रमाणें नसल्यास डाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे १ ताटें, ताटें, गडव, पेले, मुखकेपत्रें, फुलपात्रें, वाट्या, पंचपात्रें, द्रोन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सर्व सामानाचा भाव दर तोळ्यास ०--॥। आणे वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ दळया उपकरणी देवपुजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारीक सामानाचा भाव दर तो. ०=। आणे वरतोळ्यानें देऊं—३ तबकें चौफुलें अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ०=॥ आणे प्रमाणें वरतोळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठश्या वजगेटीका सुद्धां घाटघडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारे कळेल—नाशिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस महितच आहे म्हणून आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्याशीं अडत ठेवणें असल अगर व्यापाऱ्यास हर वेळीं विक्री करितां माल पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरतोळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेल्वे रेग्युलेटर असून कांटे फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क ( नाशिक सुयस मेड मालकांचे नांव ) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षांची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नें ही पाठविलें जाईल.

पत्ता—उद्धवचंद मुळचंद छबिलदास फुलली पुणावर नाशिक सिटी

नंबर १४३

कोणी त्याचा पन्न होतो तरी त्याच कर्ज वसूल करितां येण्या साठीं सर्टिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम २७ प्रमाणें.

दिवाणी क्लास १५ मिसल नंबर ३/९५

विद्यमान मि० डफ्ट्य साहेब जि० अकोला यांचे कोर्टांत.

नांव रायभान

बापाचें नांव नवलाजी

राहणार सिरसोली तालुके आकोट जिल्हा अकोला यांस मयत

उमाई मर्द बापाचें नांव आकाजी राहणार सिरसोली तालुका आकोट जि० आकोला याचें कर्ज वसूल करिता येण्यासाठीं सर्टिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २ माहे अक्टोबर १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ११ माहे सपटेंबर सन १८९५ इ०

V. N. Dandaker.

सिविहल जज्ज.

## पुराणप्रकाश

( महाभारत व पुराण ग्रंथाचें सरळ मराठी भाषांतर. )

हल्लींच्या विद्याप्रसारामुळें जुन्या व नव्या मतांच्या लोकांस, आपल्या प्राचीन पुराणादि ग्रंथांत काय तत्व आहे व त्यांत कोण कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत, हें समजून घेण्याची खरीच उत्कंठा प्राप्त झाली आहे असें जाणून सर्वांस घेण्यास सोईवार पडावें ह्मणून आह्मी श्रीमहाभारत, १८ महा पुराणें व उपपुराणें यांचें सरळ मराठी भाषांतर शके १८१७ च्या श्रावण महिन्या पासून दरमहा ९६ पृष्ठाच्या मासिक अंकद्वारें सुरू केलें आहे.

पुराणांत अनेकप्रकारचे इतिहास, मनोरंजक व उपयुक्त आख्यानें, बोधपर व नीतिपर मनोहर, कथा ईश्वराच्या अनेक अवतारकथा, सूर्यवंशी व सोमवंशी राजे कोण कोण झाले, सृष्टि कशी उत्पन्न झाली, तीर्थें कोणतीं आहेत, त्यांचीं महात्म्यें कशीं आहेत, त्यांची क्षेत्रें कोठें आहेत, मन्वंतराच्या कथा, कांहीं अद्भुत चमत्काराच्या गोष्टी पुढील भविष्यें, कोणते दिवस पवित्र व त्या दिवशीं कोणतीं व्रतें व दानें करावीं, वर्णाश्रमधर्म, श्राद्ध, मोठमोठ्या यज्ञाचे इतिहास, ग्रहण, नक्षत्र, भुगोल, खगोल, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, सप्तद्वीपें, व नवखंडादिकांचीं वर्णनें, देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, नागांची उत्पत्ति असून सर्व उपयुक्त गोष्टींचा समावेश केला आहे.

तूर्त भारताचीं पृष्ठें ४०, गणेशपुराणाचीं २४, ब्रह्मपुराणाचीं १६ आणि नृसिंहपुराणाचीं १६ याप्रमाणें दरमहा रॉयल अष्टपत्री पृष्ठें प्रसिद्ध होत असतात.

याच्या प्रत्येक अंकाची किंमत ८ आणे प्रमाणें वर्षाच्या १२, अंकाची किंमत आगाऊ देणारास ६ रुपये व ट. ख. १२ आणे पडेल.

ता० क०—जर कोणास वर्षाच्या १२ ही अंकाची किंमत एकदम देणाराची सवड नसेल तर प्रत्येक तिमाहीचे ट ख. सह १॥= आगाऊ पाठवावी अधिक माहिती करितां अर्ध्या आण्याचें तिकीट पाठवा. ह्मणजे नमुन्याचा फार्म पाठवून देऊं.


पुराणप्रकाश छापखान्याचे मालक,

पत्ता:—नळबजार तीनबत्ती शेट छबीलदास लल्लूभाईचे वरांत,

**पुराणप्रकाश मंडळी मुंबई.**

## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ०।० आज्ञाशब्द




मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पोतदार यांजकडे अगर आह्मांकडे.

गोविंद भा. ओक

वाशिम, वऱ्हाड.

## उत्तम सोय

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्र्या ( कच्चे व पक्के रंगाच्या ) खाद्या, यॊगढ्या, नाना तऱ्हेच्या, ठाना कलाय व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रितीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये

सदर बाजार, सोलापूर

## पत्रव्यवहार

पुसद ता० ६-९-९५

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

सा. नमस्कार वि. वि. पुढील मजकुरास येत्या अंकीं स्थळ मिळण्याची कृपा व्हावी:—

हवामान—गेल्या पंधरवड्यांत मेघराजानें अगदीं डोळे झांकल्यामुळें व उन्ह फार कडक पडल्या मुळें पिकें सुकून पिवळीं पडलीं. पावसाळ्याचे सुरुवातीपासूनच पाऊस पडावा तसा न पडल्यामुळें जमिनींत ओलावा राहिला नाहीं व आता जंगलांत गुरांस पाणी मिळण्याची पंचाईत आहे. परमेश्वर कृपेनें काल पासून पर्जन्यवृष्टीचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. अमांश, हिंवताप, खोकला वगैरेकरून किरकोळ दुखणीं गांवांत सुरू आहेत.

कोर्ट गेलें—येथें दिवाणी कोर्ट असल्यामुळें गांवास विशेष महत्व होतें व पक्षकार लोकांस फार सोय होती, परंतु कांहीं कारणामुळें गल्या मे महिन्यांत कोर्ट काढून जिल्ह्याचे ठिकाणीं नेलें, व ५० रुपया पर्यंतचे दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार येथील नायब तहशिलदार यांस मिळाला आहे.

लायब्ररी—ही संस्था येथें बरेच दिवसापासून आहे व कांहीं दिवस तिची स्थिति चांगली होती. अलीकडे सुमारें तीन वर्षेंत तिजकडे कोणाचें लक्ष नसल्यामुळें ती केवळ नामधारी होऊन राहिली होती. शेवटीं मागील महिन्याच्या १६ तारखेस असलेल्या लायब्ररीचा जीर्णोद्धार करण्याच्या हेतूनें सर्व सभ्य ग्रामस्थांची सभा भरली. अध्यक्षस्थानीं माजी पेन्शनर नहसीलदार खान बहादूर सादत मिरखा साहेब यांची योजना झाल्यानंतर हल्लींचे तहशिलदार यानीं उठून आपल्या स्वाभाविक रसिक भाषणानें सभेचा उद्देश सांगितला व मेसर्स भगवंतराव शास्त्री व चिमणाजी माधव हेडमास्तर यांनीं लायब्ररीची सद्य

स्थिति, तिची अवश्यकता व तिजपासून होणारे फायदे—ह्या संबंधानें भाषणें होऊन सर्वानुमतें मे. तहशिलदार साहेब यांस लायब्ररी करितां प्रेसिडेन्ट व मि. चिमणाजी माधव यांस सेक्रेटरी निवडण्यांत आलें. नंतर लागलेंच कायमच्या वर्गणीदारांची यादी होऊन पुढील व्यवस्था स्पेशल मिटिंगमध्येंच होण्याचें ठरलें. याच प्रसंगीं खान बहादूर साहेब येथून हैद्राबादेस राहण्या करितां जाणार ह्मणून त्यांचें स्वागत करून हार तुरे अत्तर गुलाब व पानसुपारी वांटून सभा विसर्जन झाली.

पूर्वी ठरल्याप्रमाणें स्पेशल मीटिंग ता. २३ आगस्ट रोजीं भरून लायब्ररीचे इमारती ची दुरस्ती, नवीन वर्तमानपत्रें वगैरे बोलावणें यासंबंधानें विचार होऊन त्याप्रमाणें ता० १ मिनहू पावेतों सर्व कॉम आटोपून लायब्ररीस लायब्ररीचें स्वरूप आलें. ह्या सर्व स्तुत्य गोष्टींचें श्रेय आमचे येथील लोकप्रिय तहशिलदार साहेब यांसच आहे. ईश्वरकृपेनें ही संस्था चिरायु होवो.

पत्र विस्ताराची माफी असावी.

आपला
'क्ष'

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद वद्य १२ शके १८१७

## दिवाणी न्यायखातें

सन १८९४ सालीं नव्या फिर्यादी ३०१४१ झाल्या त्या पैकीं शेंकडा ८७ ह्मणजे २६२१८ फिर्यादी पैशा संबंधी व इतर जंगम माला संबंधी होत्या. जमिनी संबंधानें दावे कांहीं थोडे अधिक होते आणि ते नवीन जमाबंदीच्या कारणामुळें असावेत असा अंदाज आहे. गहाणाच्या फिर्यादी १६४५ होत्या. ही संख्या आदले वर्षापेक्षां २४९ वाढली. याचें कारण अलिकडे दोन तीन वर्षे पिकें चांगलीं आली नाहींत हें होय. इलिचपुर जिल्ह्यांत गहाणाच्या फिर्यादी पुष्कळ अधिक दाखल झाल्या. इलिचपुराप्रमाणें वऱ्हाडांत अन्यत्र मुसलमानांची गर्दी कोठेंच नाहीं. हे लोक स्वभावतः अदूरदर्शी व अति उधळे असतात आणि त्या कारणानें ते गहाणाच्या नादीं पडून अखेरीस सफै बुडतात. इलिचपुरवाल्यांसारखी शोचनीय स्थिती कमजास्त मानानें सर्व वऱ्हाडांत आहे हें कांहीं ठीक नाहीं.

सट्याच्या फिर्यादी आकोला जिल्ह्यांत बऱ्याच होत्या हे सट्टे ह्मणजे धान्याचे व कापसाचे असतात. उमरावतीस तर मूळ तंटा पडला होता कीं सट्याच्या फिर्यादी ह्मणजे जुगाराच्या स्वरूपाच्या आहेत आणि त्यासाठीं या फिर्यादी चालूं नयेत. पण अखेरीस असा ठराव झाला कीं हे सट्टे कायदेशीर आहेत आणि वेळ पडली ह्मणजे सट्यांत कबूल केलेला एक तर माल मोजून द्यावा किंवा खरेदीविक्रीदारांनीं नफ्या तोट्याच्या रकमा निर्णीत करून परस्परावर देणें घेणें काढावें. मुंबई हायकोर्टांत असेच ठराव होऊन चुकले आहेत. मि. बुलक साहेबांच्यामतें सट्टे हे जुगार केव्हां होतात आणि केव्हां खरोखर कायदेशीर व्यवहार आहेत हें शोधून काढणेंच मोठें कठीण आहे. धान्याचे व कापसाचे सट्याचे सवदे कधीं कधीं बेतालपणानें होतात आणि तेव्हां त्या सवद्यांस जुगारचे खेळ कां समजूं नये हें सांगणें सोपें नाहीं. परंतु अशा भानगडींत न्याय कोडतांनीं हात घालण्यापेक्षां कायदे घालून देणाऱ्यांनीं या गोष्टीकडे लक्ष पुरविल्यास पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे.

दाव्यांच्या स्वरूपांत ह्मणण्या सारखा फरक नाहीं. बहुतेक दावे जमिनी संबंधानें व गहाणा संबंधानें होते. नवी जमाबंदी चालली आहे तसतशी स्थावर संबंधी दाव्यांची संख्या वाढेल अशी कल्पना आहे. वऱ्हाडांतील सावकारांविषयीं मि. बुलक साहेब ह्मणतात कीं या सावकारांची पूर्ण ओळख पटली ह्मणजे त्यांच्या वरचा सर्व विश्वास आपोआप उडतो. व्याजाचे आंकडे हरतऱ्हेनें फुगवितात, ऋणकोंची संकटवेळा ह्मणजे सावकारांची लक्ष्मीपूजनवेळा असते, आणि हिशोबांत अशी विलक्षण फडणिशी लढवितात कीं तीनच वर्षांच्या मुदतींत मुद्दलाची दामदुप्पट होऊन जाते. कोण विलक्षण सावकारी ही !

एकंदर दावे ३०१४१ होते त्या पैकीं १३८०२ दावे पन्नास रुपया खालचे होते आणि हजार रुपया वरील दावे सर्व ४८५ होते. या आंकड्या वरूनच वाचकांच्या ध्यानांत येईल. कीं किरकोळ पन्नास रुपया खालील फिर्यादी बहुत आहेत ह्मणजे गरीब ऋणको लोकांची सावकारा जवळ पत उरली नाहीं आणि शेतकरी पिकपाण्याच्या तंगीमुळें अधिक कर्जबाजारी होऊन सावकारांस आपल्या कर्जाचा भरंवसा वाटत नाहींसा झाला. दाव्याची वर्गवारी त्यांच्या किंमती वरून करितांना जुडिशियल कमिशनर साहेब लिहितात कीं दाव्याच्या किंमती सरासरीनें वाढत्या प्रमाणावर आहेत आणि याला कारण असें कीं प्रांत सुधरत चालला आहे व व्यापारही पुष्कळ वाढला आहे.

धुळ्याचा दंगा सध्यां मिटला खरा पण दंग्या नंतर फौजदारी खटल्यांचें सत्र सुरू झालें आहे. सोळा मुसलमान आरोपी तर्फे बारिस्टर इनव्हरारिटी यांनीं मुंबई हाय कोर्टास विनंती केली होती कीं दंग्या संबंधीं खटले धुळ्यास असि. कलेक्टरा समोर न चालतां मुंबईस चालवेत पण हाय कोर्टानें ही मागणी अमान्य केली. माजिस्ट्रेटाचा कांहीं पक्षपात दृष्टीस पडण्यांत आला नाहीं, मुंबईस खटले चालविल्यानें न्याय देण्यास विलंब लागेल व साक्षीदारांस मोठे प्रयास पडतील या तीन कारणा वरून धुळ्यास खटले चालवेत असा निकाल झाला. धुळ्यास फौजदारी कामास सुरवातही झाली. कलेक्टर व मामलेदार यांच्या साक्षी झाल्या. या खटल्यांत काय निष्पन्न होतें तें पहावें ! सरकारनें तंट्याचें मूळबीज उपटून काढल्या शिवाय समाधानकारक व्यवस्था लागणार नाहीं.

एक शिवप्रसाद नांवाचा लबाड विद्यार्थी लखनौ येथें १८९३ सालीं 'मिडल इंग्लिश' परीक्षेला बसला होता. परीक्षेंतल्या उत्तरांचे कागद गोळा झाले ह्मणजे ते दररोज शाळेच्या कारकूनाच्या ताब्यांत दिले जात असत. या कारकुनाशीं शिवप्रसादची दोस्ती होती. संध्याकाळीं सर्वजण निघून गेल्यानंतर उत्तरांचे कागदाचें पुडकें खुलें करून शिव प्रसादानें दुसऱ्यानें लिहिलेलीं उत्तरें आपल्या नांवाखालीं ठेवावीं आणि आपलीं उत्तरें दुसऱ्याच्या नावा खालीं ठेवावींत. अबदूल गनी नावाच्या विद्यार्थ्याचे उत्तराचे कागद दोन वेळ अशाच्या नावाखालीं घातले. परिणामीं शिवप्रसाद पास झाला आणि अबदूल गनी नापास झाला. अबदूल गनी हा वर्गांतला हुषार विद्यार्थी होता ह्मणून संशय येऊन चौकशी झाली आणि अखेर लबाडी उजेडांत आली. शिवप्रसादास चौदा महिन्यांची शिक्षा झाली. या शिक्षेला कलकत्ता हायकोर्टाचा ठराव प्रतिकूल होता तथापि मद्रास व अलहाबाद हायकोर्टांच्या निकालांच्या आधारें औधच्या जुडिशिअल कमिशनरांनीं हा शिक्षेचा ठराव अपिलांत कायम केला हें उदाहरण ऐकून लबाड विद्यार्थ्यांस दहशत पडेल अशी आह्मास उमेद आहे.

अकोला मुनिसिपाल कमिटीनें गांवांतील घाण पाणी उत्तम प्रकारें उपयोगांत आणिलें आहे. मोऱ्याचे व नाल्यांचें पाणी पक्क्या गटारानें एका मोकळ्या जागेंत सोडू तेथें कळकींचीं बेटें, केळी, आळू वगैरे पेरून एक नामी उत्पन्नाची बाब काढली आहे. गांवांतल्या घाण पाण्यानें कळकी, केळी, आळू वगैरे झाडांस आपोआप खत मिळून पाण्याचा पुरवठा होतो. वर सांगितलेलीं झाडें या घाण पाण्यामुळें चांगलीं माजतात, आणि एक रम्य व हिरवागार बगिचा तयार होतो. या योजनेनें घाण पाणी नदींत सोडावें लागत नाहीं, त्याचा उपयोग बगिच्याकडे केल्यानें दुर्गंधी मोडते आणि गांवांतील बखळ व पडीत जाग्यासही उत्तम शोभा येते. ही कल्पना रावसाहेब देवराव विनायक यांस सुचली आणि तिची उपयुक्तता अकोला मुनसिपाल कमिटीनें चांगली व्यक्त करून दाखविली आहे. डाक्टर लिटल यांस ही व्यवस्था पसंत पडली आणि त्यांनीं इतर म्युनिसिपालिट्यांस घाण पाण्याचा असाच सदुपयोग करण्या विषयीं उपदेश केला आहे. मि. बुलक यांच्या विचारास ही गोष्ट पसंत पडली आणि आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं रावसाहेब देवराव विनायक यांची कल्पना इतकी कदरू झाली.

चित्रळच्या मोहिमेची मूळ पीठिका सरकारी रिपोर्टांतून प्रसिद्ध झाली आहे आणि ती ध्यानांत ठेवण्या सारखी आहे. राजकीय धोरणें फार गूढ असतात आणि राज्यकर्त्यांनीं पूर्वी पासूनच मूळ तत्वाला धरून संधानें बांधलेलीं असतात. हीच गोष्ट चित्रळच्या इतिहासांत चांगली स्पष्ट होते सुमारें अठरा वर्षांपूर्वी लार्ड लिटन हे व्हाइसराय असतांना त्यांनीं असा बेत बसविला होता कीं चित्रळ, यासीन, व होर येथील संस्थानिकांनीं काश्मिरच्या महाराजांचे मांडलिक ह्मणून शांततेनें व धर्मन्यायानें राज्य करावें आणि अमीराचें सार्वभौमत्व कबूल करूं नये. या व्यवस्थेनें काश्मीरच्या महाराजांच्या द्वारानें ब्रिटिश सरकारास हिंदुकुशच्या पहाडाचे मुख्य मुख्य मार्गी लष्कर ठेवून व राजकीय संबंध तसेच कायम राखून आपल्या ताब्यांत पूर्णपणें ठेवतां यावे. व या प्रकारें आपली प्रभुसत्ता चिरकाल स्थापून पहाडी संस्थानिकांचा ब्रिटिश राज्यकर्त्यांशीं स्नेह संबंध जोडावा. या राजनीतीनें दुसऱ्या राष्ट्राचें वर्चस्व तेथें चाललें. नाहीं. हें उघड आहे. आणि गेल्या चित्रळच्या स्वारीनें तेथें राज्य स्थापिल्या प्रमाणेंच झालें आहे. एक अर्भक गादीवर बसवून सर्व राज्यसूत्रें इंग्लिशांच्या हातांत राहतील आणि फौजफाटाही तेथें ठेवण्यांत येईल. सर्व खर्च मात्र इंडियावर लादला तरच खरा न्याय!

"क्वचिद्विद्वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितम्"— या भर्तृहरीच्या उक्ती प्रमाणें पर्जन्यानें दोन ठिकाणीं दोन विरुद्ध प्रकार अनुभवास आणिले आहेत. वऱ्हाडांत पाऊस नसल्यामुळें पीकें बहुतेक ठार झालींच होतीं पण ईश्वरकृपेनें या आठवड्यांत पाऊस पडूं लागला तेव्हा लोक सोन्याचा पाऊस पडत आहे, किंबहुना अमृतवृष्टी होत आहे ह्मणून आनंदातिरेकानें नाचूं बागडूं लागले. याचा उलट प्रकार सोलापूर, गाणगापूर वगैरे कडेस उडाला आहे. पर्जन्य अतोनात झाला, रेलवे वाहून गेली, मार्ग कुंठले, आणि नद्यांच्या पुरानें पीकांची व मालमत्तेची नासधूस झाली. अशा ईश्वरीकोपानें तिकडील लोक हवालदील झाले आहेत ! सारांश, परमेश्वराची योजना कांहीं अतर्क्य आहे.

श्रीमंत महाराज होळकर सरकार यांच्या संबंधानें अलिकडे मोठा गवगवा आहे. प्रजेला त्यांच्या पासून अती पीडा होते. आणि कांहीं नाजूक गोष्टी इतक्या विकोपाला पोचल्या आहेत कीं परिणाम कसा काय होतो या बद्दल मोठमोठ्या लोकांस मोठी चिंता पडली आहे. होळकर सरकारा विरुद्ध गुप्त अर्ज ही हिंदुस्थान सरकाराकडे पुष्कळ गेले आहेत असें ऐकण्यांत आहे. ब्रिटिश सरकारचें कारस्थान व तिऱ्हाईतपणा हीं फार चमत्कारिक असतात. कांहीं गोष्टी अगदीं बिकट थराला कांहीं काळ वाढवूं देतील, मध्यंतरीं बिलकूल हात घालणार नाहींत आणि थोडासा कानाडोळा ही महाराजांच्या वर्तनाकडे करितील पण वेळ येऊन बेतलीच ह्मणजे एका निमिषमात्रात श्रीमंत बाळासाहेबांस राज्य नको व जीव नको असें करून सोडतील. इतर संस्थानिकांचा वृत्तांत डोळ्या समोर असून देखील त्या पासून इंदूर सरकारच्या डोळ्याला अंजन मिळत नाहीं, व सरकारची स्वारी राज्यातली बेदा काढून प्रजाजनांचे आशिर्वाद घेत नाहीं तर काळ फिरला असें ह्मणावें लागेल. ईश्वर करो आणि आमचे इंदूर सरकार सुयंत्र व सुचिर राज्य करोत ! आपल्या लोकांच्या कर्मगतीचीच हली परीक्षा आहे. मंत्रीमंडळानें राजाचे दोष दूर करून त्यांस सन्मार्गगामी केलें तरच सर्वांचो भलाई व प्रजेचें कोटकल्याण होईल.

आमच्या एका मित्रानें रेनाल्डच्या सोल्जर्स वाईफ्ला 'वीरपत्नी मंजुळा' या नांवाखालीं कादम्बरीचें रूप टाकून नाट्यरूप दिलें आहे. मूळचा रस व मूळचें पर्यवसान साधण्याचा यत्न केला आहे. मूळच्या भूमिकांना फांट देऊन दुसऱ्याच नव्या भूमिकांचा अंतर्भाव केला आहे. राजेरजवाड्यांच्या अथवा थोर पात्रांच्या भूमिका रंगभूमीवर अनेक आल्या आहेत परंतु कनिष्ठ वर्गावर समाज संस्थेतील वरिष्ठ प्रतीच्या वर्गांचा कसा रोष असतो, व कनिष्ठ वर्गांतील अंतर्भूत गुणांची कशी अवहेलना होते आणि त्यामुळें त्यांच्या नैसर्गिक गुणांचा कसा जागच्या जागींच लोप होतो व सर्व वर्गांमध्यें मिथः प्रेम कसें वाढावें या विषयावर गद्यात्मक नाटकें फार कमी आहेत किंबहुना नाहींतच असें झटलें तरी चालेल. हें लक्षांत आणून प्रत्यहीं मनोरंजन देणारीं सहस्रशः पुस्तकें आमच्या व इतर भाषामध्यें तयार होत असूनही दुसऱ्यानें तयार करून ठेविलेल्या सामुग्रीवर आमच्या मित्रानें आपली नाटकरचना केली आहे तथापि सद्गुणांचा इहलोकीं नेहमीं जयच होतो असें आपल्या अनुभवास नेहमीं येत नाहीं त्याचाच दृष्टांत दाखविणाऱ्या नाटकाचा कोणीही रंगभूमीवर प्रयोग करून दाखविल्यास प्रेक्षकास बोध होईल आणि प्रयोग करणाऱ्यांस चिंगला लाभ होईल अशी आमची खात्री आहे. हें नाटक स्वच्छवकाशा प्रमाणें अही छापण्याच्या विचारांत आहों.

वऱ्हाडांत शेतकऱ्यासाठीं चांगली पेढी निघेल तर भांडवलवाल्यांचा फायदा होऊन शेतकऱ्यांस माफक व्याजानें पैसा मिळेल, वेळोवेळ त्यांच्या गरजा भागतील आणि कर्जाची फेड करणें त्यांच्या ऐपती बाहेर जाणार नाहीं. हल्लीं जो व्याजाचा दर या प्रांतीं आहे तो शेकडा सालिना २४ पासून ३६ पर्यंत आहे. सोनें चांदी अगर जमीन जुमला गहाण ठेविला तरी शेंकडा १२ व्याज ऋणकोस भरावें लागतें. सावकारा मुळें शेतकरी नाडला गेला नाहीं असा एखादा कदाचितच आढळेल! व्याजाचे दर कमी होण्यास सावकारांशीं स्पर्धा करणारी मंडळीची पेढी निघाली पाहिजे. अकोल्या सारख्या जिल्ह्यांत लाख दीड लाख भांडवल लोक खुशीनें व्याजीं घेतील आणि कर्जाच्या तारणार्थ गहाण मालही ठेवण्यास मागें सरणार नाहींत. शेतकऱ्यांस तगाईचा म्हणून पैसा कर्जाऊ सरकारांतून मिळतो पण पूर्वीचें कर्ज फेडण्याकडे या रकमेचा उपयोग करितां येत नसल्यामुळें गरीब रयतेस सावकाराचेंच घर (आणि तेंही जुन्याच सावकाराचें) पाहावें लागतें. या कारणानें सरकारी तगाई—फंडाचा व्हावा तितका उपयोग रयतेस होत नाहीं. व्याजाचा नवा कायदा झाला तरी लोक कुळास कमी व्याजानें पैसे देतील असें आह्मास वाटत नाहीं दामदुपटीपेक्षां अधिक व्याज सरकार नव्या कायद्या अन्वयें देवविणार नाहीं असें कळतांच सावकारही व्याज पूर्वीं प्रमाणेंच पुष्कळ उपटण्याच्या नव्या युक्त्या काढतील. व्याजाचा दर शेकडा वाढविल्यानें आणि वारंवार थोड्या मुदतींत फिर्यादी करून कर्ज नवें जुनें केल्यानें दामदुपटीचा कायदा देखील रद्द झाल्या प्रमाणेंच होईल. तेव्हां शेतकऱ्या साठींच निराळी पेढी निघाली पाहिजे आणि अशी व्यवस्था होईल त्या वेळींच शेतकऱ्यांस शेती मध्यें पोटा पुरता कांहीं फायदा राहील. अशी पेढी सरकारनें काढावी किंवा धनिक लोकास कायद्यानें अनेक सवलती देऊन त्यांच्या कडून काढवावी पण अशा कार्यांत सरकारची प्रत्यक्ष मदत असल्या शिवाय कोणतीच गोष्ट साध्य नाहीं हें आज पर्यंतच्या अनुभवारून लोकांच्या चांगलें प्रत्ययास आलें आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 16, 1895

It is a circumstance of great interest to many to note that the Honourable Mr. Justice M. G. Ranade comes forward as a champion to espouse the cause of an unlucky host of students who fail to get through the ordeal of University examinations. The learned Justice has lately moved the Senate of the University of Bombay, to consider a proposition purporting to necessitate a radical change in the test which has hitherto been generally accepted as the best and convenient one fitted for the true appreciation of the merits of candidates. The proposition requires that a candidate getting as many as 45 p. c. or more of the requisite number of marks assigned to a subject, may be considered to have satisfied the pass-test in the subject even though he may happen to fail in other subjects. Under the present system which, it is to be remembered prevails since the birth of the University, it is necessary that a candidate in order that he should be declared to have passed the examination for which he appears, should obtain in each subject at least the minimum number of pass-marks and also score in total as as high as 30 or 33 and one third p. c. of the aggregate number of marks. This requisition involves as a matter of necessity the fact that a candidate must have a sufficiently comprehensive knowledge of all the prescribed subjects at the time when he puts forth high pretentions for qualification. This means cther words that the candidate is required to give a satis—factory proof that he has spared no pains to exercise and develop his mental faculties in a manner and to an amount commensurate with the progressive standard of literary efficiency. It is this intellectual vigour that it is the aim of the university to diffuse largely and freely and on a steadily progressive scale among her sons.

The proposed amendment coming as it does from such an able educationalist as the learned Judge, must have received a calm and patient deliberation at his hands and must have been the outcome of an elaborate comparative analysis based upon statistical calculations. We accord to it therefore all the respect and consideration that we feel gratefully bound to give to its author. We have nevertheless to observe that in many quarters serious doubts are likely to be entertained as to the practical good to emanate from the proposed change. In the first place if a piecemeal system of examination like the one proposed is allowed, lots of undeserving aspirants will nominally rank with the deserved few and thus pass for the best cream of a nation. They would thus impose upon the public by assuming a title which they have no right to claim and which it is for the good of the public, that they should not be allowed to claim. Public safety and advancement rest in a great measure, upon the degree of confidence reposed by them in their educated leaders. But when once the confidence is mis—placed, there is no knowing what evil consequences may follow. Utility therefore requires that trust and honour should be due only to those who deserve them and deserve them best.

Secondly the change if brought about will work as a high impetus to indolence and will tend to engender and to foster unsteady habits in youths with promising future before them. Literary ambitions will be greatly narrowed and a very weak ray of culture will light the youthful heart and mind. Our political condition considered we shall have to bid farewell even to the last speck of hope that now gladdens the heart of the few hard working enthusiasts who are heaving up mountains to raise the tone of their social fabric to a degree at which they imagine they can creditably endeavour to keep pace with the brisk march of civilization characterizing the surrounding societies.

Thirdly the maximum of 45 seems to be too low. If it be raised to 55 or more it will at least serve as a safeguard against the possibility of raw candidates obtaining credit by chance. Candidates getting as many as 55 p. c. or upwards, are in the majority of cases, candidates who can not be considered as below the mark of average mental competence required for a due qualification for the examination for which they appear.

Fourthly the proposed change serious is likely to entail trouble and expenditure to the Uni—versity and will require a highly complex official apparatus for an efficient execution of the proposed scheme.

These are the disadvantages which to many, appear as the inevitable consequences of the change proposed. The proposal no doubt originates in an ardent desire to relieve the students from the heavy strain of studies burdened upon their backs under the present system. Under the present system their energies are damped, physic impaired and life curtailed. Many a promising youth succumbs to the overpowering strain and is forced to retire dispaired and dejected. These and many other of a like nature are among the mischievous results of the long and elaborate programme prescribed by the University. These are no doubt to be overcome. He who comes forward to achieve this object will indeed deserve to secure and will secure the gratitude of hundreds of youngsters who fall victim to the present ruinous curriculum. But it will at the same time be admitted on all hands, that the means to such an end must not be means which should prove fruitful of a graver mischief and absurdity. In short the advantages held out by the proposed change require to be weighed against the disadvantages that would follow upon the abrogation of the present system. We leave it now to the readers to judge which of the two has preponderance.

---

"The net revenue from stamps of all kinds increased by less than one per cent. from Rs. 8,40,121 to Rs. 8,48,227, a decrease of Rs. 29, 053 under General Stamps (from Rs. 3,64,469 to Rs. 3,35,416) being more than counterbalanced by an increase of Rs. 31,212 [from Rs.4, 92795 to Rs. 5,24,007] under Court-fee Stamps. The fluctuations in the sale of stamps continue to receive explanations at the hands of district officers of a generally speculative character, for which in at least one case [Amraoti] there is no foundation in fact so far as Colonel Mackenzie is aware."

Stamp Report.

## वऱ्हाड

हवामान— पावसानें सुरुवात केल्यामुळें लोक आनंदांत आहेत. आणखी पाऊस पडण्याचीं लक्षणें चांगलीं आहेत रोगराई म्हणण्या सारखी कांहीं विशेष नाहीं.

रा. रा. दामोधर नानाजी शिंदेकर हे नळगांव तहशिलीचा चार्ज देऊन परत आकोल्यास क्लार्क आफ कोर्टचे जागीं रुजूं झाले.

आणि रा. रा. बाळकृष्ण भाईजी दुर्ग हे खामगांवास आपल्या जागीं परत गेले.

शाहू नगरवासी नाटक मंडळीनें या आठवड्यांत 'फाल्गुनराव' व 'ह्यामलेट' हें दोन प्रयोग करून दाखविले. शनिवारचें नाटक बरें झालें पण पावसामुळें नाटकवाल्यांचा बराच हिरमोड झाला.

वऱ्हाडच्या सानेटरी कामिशनरची मुख्य कचेरी शिकंदराबादेस येत्या २० वे तारखे पासून बदलली जाईल.

आलिशान रेसिडेन्ट मि. क्लैडन यांनीं ता. १९ आक्टोबर पर्यंत रजा वाढविली असें कळतें.

---

नोटीस

क्लास नंबर ७

किरकोळ मु० नंबर ७/९५

विद्यमान बाळकृष्ण बळवंत सुळे साहेब बी. ए. इंन्सॉल्व्हंसी कोर्टाचे जड्ज कोर्ट अकोले.

साबकार:

उसमान रहिमतुल्ला कच्छी राहणार आकोट.

जुमाअयब कच्छी राहणार आकोट.

गनी सुमार कच्छी राहणार आकोट

उसमानअली कच्छी राहणार आकोट.

उपराहाजी सरीफ कच्छी राहणार आकोट.

घुनीलाल शिवचंद मारवाडी राहणार आकोट.

नमीचंद नारायणदास राहणार आकोट.

नादार:

कुवर मर्द मोहनलाल जात परदेशी भोई राहणार अकोट.

दावा रुपये ४६६८।०८३

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं नादार कुवर मर्द मोहनलाल परदेशी भोई राहणार आकोट हिनें आमचे कोर्टांत नादारींत अर्ज दाखल केला आहे त्याचे चौकशीची तारीख २१।९।९५ इ. ची नेमिली आहे कारितां ज्या कोणास नादारा विरुद्ध आपली तकरार सांगणें असल त्यांनीं सदरहू तारखेस आमचे कोर्टांत सकाळीं १० वाजतां हजर व्हावें कळावें ता. १०।९।९५

B. B. Sule
Judge.
Bankruptcy Court

---

## वर्तमानसार.

मि. फ्रेडरिक पिन्कॉट यांनीं सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या 'रीहा' नावाच्या झाडापासून रेशीम व लोकरीपेक्षां उत्तम व स्वस्त कापड बनवितां येण्यास आमच्या लोकांना कठीण जाणार नाहीं. या वनस्पतीचा उपयोग कापडाऐवजी कसा करतां येईल यावद्दल जी रसायनक्रिया सफळ झाली आहे ती शोधून काढणारे गृहस्थ आपल्या हिंदुस्थानापैकींच असून, यांचें नाव मि. गोमेझ असें कळल्याचें कळतें. शिवाय या कामास विशेष मोठें भांडवलही लागत नाहीं. यासाठीं व्यापारी लोकांनीं व व्यवसाऊ लोकांनीं आपले पैसे अशा महत्वाच्या धंद्यांत घालून आपणासही चांगला फायदा करून घेऊन देशाचा उत्कर्ष करावा. जास्त माहिती पाहिजे असेल त्यांनीं बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन मार्फत मि. फ्रेडरिक पिन्कॉट यांजकडे शोध करून ती मिळवावी.

इंदुरच्या महाराजांवर लोकरच कडक कायदा फिरणार अशी अफवा उठली आहे काहीं खचित माऊन बडकल्याची बातमी आहे महाराजांनीं अजून तरी आपली बाजू सुधरावी.

जुडीचा हक्क जुडविण्याच्या दुसऱ्या प्रकारचा खर्डा, पुन्हा व्हाइसरायाच्या कौन्सिलांत आला असून, त्याविरुद्ध कलकत्याकडे पुन्हा चळवळ उडाली आहे.

जेजुरी येथें एक सोनाराची ९ दिवसाची बाळंतीण स्त्री, मुलासुद्धां एकाएकी नाहींशी होऊन १५१२० दिवस झाले; सर्व ठिकाणीं शोध केला पण कांहीं पत्ता लागत नसल्यामुळें, लोकाना मोठा चमत्कार वाटत आहे.

सयामची उत्तरेकडील निरनिराळ्या परगण्यासंबंधीं सरहद्द ठरविण्यांत फ्रांस व चीन बरोबर इंग्लंडचा वांधा पडला आहे. त्याचा निकाल कसा काय होतो तें पाहण्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे.

बंगलोर येथील नाटकगृहांत पतियालच्या महाराजांच्या जागेवर एक युरोपियन जाऊन बसला. व महाराजांना दाद दिली नाहीं. युरोपियनाचा उद्धटपणा फार वाढत चालला!

कराचीपासून थेट दिल्लीपर्यंत एक नवीन रेलवे होणार आहे. यामुळें हल्लींपेक्षां २२७ मैल अंतर कमी होईल.

हल्लीं सिमला, कार्शीग, अमृतसर, श्रीनगर, फिरोजपूर इत्यादि ठिकाणीं उल्का (चांदण्या) पात फार होत आहे. किलेक तर अत्यंत प्रकाशमान असतात.

होईल कां?—रेलवे कंपन्याकडून देशी उतारूंच्या सोयी होण्यासाठीं पुढील प्रमाणें सूचना हिं० सरकाराकडून स्थानिक सरकाराकडे झाल्या आहेत. उपयोग किंपत होतो पहावें:— हे ईतोंपर्यंत स्टेशनावर स्त्रियांसाठीं निराळी जागा (वेटिंगरूम) व स्त्रियांच्या टिकिटा घेण्यास स्त्री कामदाराची नेमणूक व्हावी. यात्रेकरी व दूरचा प्रवास करणारासाठीं स्वतंत्र डबे ठरवावे. खाणें व पिण्याचें पाणी मिळण्याची दरेक स्टेशनावर सोय असावी. उन्हाळ्यांत उतारूंची हल्ल्या हवेपासून कमी असावी.

वायव्यप्रांतांतही प्रांतिक सभा भरण्याचा ठराव झाला आहे.

मारवाडांतील जेसलमीर शहराकडे पाऊस बिल्कुल नसल्यानं दुष्काळाचीं लक्षणें होऊं लागलीं आहेत. शिवाय हल्लीं तिकडे कालऱ्यानेंही कहर करून दिला आहे.

पंजाबांत हल्लीं एक कांचेचा कारखाना चांगल्या स्थितींत चालला आहे. इकडे कोणी प्रयत्न करील का?

त्रावणकोर राज्यांत दुष्काळ पडल्यामुळें महाराजांनीं सर्वत्र अन्नछत्रें सुरू केलीं आहेत. कसें केलें तरी स्वराज्य वाया जात नाहीं.

यंदा काश्मीरांत विक्रयती माल तेरा लाख रुपयांना जास्त आला. यासाठींच राज्यावर अधिकार मिळविला कीं काय?

हल्लीं पंजाब प्रांतांत सर्वत्र पावसानें रेलचेल उडाली आहे. फार नुकसानी झाली.

दिवसा चांदणी!— मथुरेच्या दक्षिण-पश्चिमेच्या बाजूला बरेंच दिवसापर्यंत तीन वाजतां एक चांदणी आकाशांत दिसत असे. ती निळ्या रंगाची व फार तेजस्वी असे.

श्री.स. बि.

पोष्ट खात्यापासून आह्मांस दिवसेंदिवस जास्तच उपयोग होत आहे असें झटलें असतां हरकत नाहीं. कारण पोष्टानें आज आणखी एक नवी सोय करून दिली आहे. येत्या महिन्यापासून २, ३ व ५ रुपये दराचीं टिकिटें निघणार, याचा उपयोग मोठमोठीं पार्सलें विमा उतरून पाठवितांना विशेष होईल. पाकिटावर टिकिटें चिकटविण्यास जागा पुरेना ह्मणून एखाद्या कागदाच्या पानावर चिकटवून तो कागद पार्सलच्या मेळ्यात बांधावयाची अशी वेळ येण्याची पाळी चुकेल लोकांच्या सोयीकडे पोष्टखात्याचें लक्ष दिवसेंदिवस लागत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आह्मां वर्तमानपत्रकारांकरितां पाव आण्याचीं टिकिटें अथवा वेष्टणें लौकर निघतील तर बरें होईल आगाऊ पैसे भरावे लागणार नाहींत व दुरस्थान उपस्त वर्गणीदार वाढण्यास त्यांस पत्रें पाठवितांना पंचाईत पडणार नाहीं.

गुजराथ प्रांतामध्यें एक गाडीवाला आपल्या मालकाच्या बायकोस गाडींत बसवुन परगांवीं पोंचविण्या करितां चालला असतां वाटेंत त्याला द्रव्यलोभ सुटला व तिला ठार मारून तिच्या अंगावरील चीजवस्त उपटण्याची त्याला इच्छा झाली. परंतु बाईचा मृत्यु जवळ आला नव्हता. गाडीवानानें आपल्या जवळची कुऱ्हाड बाहेर काढिली व तिचा एक घाव त्या बाईवर घालणार तो दांड्यांतून कुऱ्हाड निसटून जाऊन लांब पडली व त्या दुष्टाच्या हाताला मात्र फुकट हिसका बसला. तथापि तो नराधम येवढ्यानें शुद्धीवर न येता लोभ आपला दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याकरितां ती कुऱ्हाड आणावयास गेला. ती कुऱ्हाड दांड्यातून निसटून जी लांब जाऊन पडली ती नेमकी एका वारुळावर पडली होती व तिला ह्यानें स्पर्श करता क्षणींच "अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते" ह्या सिद्धांताप्रमाणें वारुळांतून प्रत्यक्ष यमाजीपंताची स्वारीच सर्परूपानें बाहेर आली आणि गाडीवानाला दंश करून परलोकीं घेऊन गेली. तात्पर्य, अशा रीतीनें ती बाई मृत्यूचे मुखांतून पार पडली. खरोखर "अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं सुरक्षितं दैवहतं विनश्यति॥ जीवत्यनाथोऽपि वने विसर्जितः कृतप्रयत्नोऽपि गृहे न जीवति॥" हें पूर्वीच्या महात्म्यांनीं जें लिहून ठेविलें आहे त्याची साक्ष ह्या बाईचें उदाहरणात अक्षरशः खरी दिसेल.

न्या. सिं.

पोलादी नाटकगृह—प्यारिस येथें एक पोलादी नाटकगृह बांधण्यांत आलें आहे.

कागद आणि लांकडाचा करवतलेला भुस्सा यांचे पासून उत्तम प्रकारचे बूट आणि जोडे करण्याची एका आस्ट्रियन कारागिरानें युक्ति काढली आहे.

नवीन जीन—एका युरोपियनानें घोड्यावर घालावयाचें एक नवीन प्रकारचें जीन तयार करण्याचें काम चालविलें असून हें जीन घोड्यावर चढविलें ह्मणजे त्यावर बसून स्वारांना अतिशय लांब जावयाचें हरवत पडूं नये अशी त्यांत सोय करण्याची विशेष व्यवस्था केली आहे. ह्मणजे, घोडेस्वाराच्या घोड्यांवर जिनवर निजून चालवायला येते. व त्यामुळें त्याला घोड्यावरून खालीं न उतरतां तडाक लांब प्रवास करतां येतो.

एका ज्योतिषानें वेध घेऊन मंगळग्रहावर मोठमोठे कालवे खोदलेले आहेत असा शोध लाविला आहे ह्या कालव्याची लांबी लाखों मैल असून त्याचें काम वीस कोट माणसांकडून १००० वर्षे पर्यंत चाललें असावें असा तर्क आहे. शिवाय सदर ज्योतिषाचें असें मत आहे कीं, हा कालवा दैवी नसून मानवी कृतीचा आहे. धन्य आहे ह्या ज्योतिषाची! वरील शोध कितपत खरा आहे याविषयीं आह्मी साशंक आहोंत.

सातारप्पास सरकारी कचेरीवरच चोरांनीं हात मारला! तेथील असि० कलेक्टरच्या आफिसांतील मुद्देमाला पैकीं १४११५ शें रुपये किमतीचा माल चोरांनीं उपटला! २१३ फौजदार चौकशीसाठीं जाणार आहेत. चोरांची दिवसेंदिवस सुधारणा आहे. पोलिससुधारणा ह्मणजे बंदोबस्ताची ढिलाईच नव्हे काय!

विजेच्या दिव्यानें शिकार—विजेच्या दिव्याच्या साह्यानें शिकार करण्याची एक नवीन कल्पना एका इंग्रजी शिकारप्रिय गृहस्थानें काढली आहे, ती अशी:—शिकारी मनुष्यानें विजेचें यंत्र व तारा वगैरे आपल्या बरोबर रानांत न्यावयाच्या. आणि ज्या हिंस्र पशूची शिकार करावयाची, त्याच्या नजरेस पडेल अशा बेतानें जें आमिष ठेवावयाचें त्याचेवरच विजेचा दिवा अडकावून ठेवावा व त्याच्या तारा तेथून ३० फुटाचे अंतरावर बसणाऱ्या शिकारी गृहस्थानें आपल्या बंदुकीला लावाव्या. तो हिंस्र पशु ते आमिष खाण्यास येतांच त्या मनुष्यानें आपल्या बंदुकीस हिसका दिल्या बरोबर तो दिवा एकाएकीं प्रकाशित झाला ह्मणजे मग अर्थातच त्या मनुष्यास ती शिकार सहज साधेल. शास्त्रीय ज्ञान ह्मणजे या युगांतली कामधेनु आहे असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. असे पूर्वीचे ऋषि व शास्त्रे त्याच्या रूपानें पाश्चिमात्य राष्ट्रांत अवतरले नाहींत न?

न्या. स.

एक पल्टण अहमदनगर येथें मशीदीवरून वाजत वगैरे न जात गेली.—मुसलमान लोकांनीं हें वाद्य वगैरे तडीचें असतांही या बेळीं कांहीं हरकत केली नाहीं.

इंग्लंडातील पार्लमेंटाकरितां दरसाल २३ लक्ष रुपये खर्च होतो. यापैकीं सुमारें २९,००० रुपयांचे कोळसेच लागतात.

अंबाला येथें अतिवृष्टीनें फार नुकसानी झाली आहे यंदा पावसानें कांहीं ठिकाणीं फार नुकसान केलें आहे.

सर अर्थर हावेलाक यांना मद्रासचे गव्हरनर नेमणार असें समजतें.

इटालियन सरकार आबिसिनियावर स्वारी करणार असें समजतें.

कोरियाच्या संबंधानें जपान व रशिया यांजमध्यें फार वैमनस्य वाढत चाललें आहे. परिणाम लढाईवर जाणार असें वाटत आहे.

इंग्लंडच्या मनातून अद्याप इजिप्त सोडावयाचें नाहीं असें आहे.

जपानांत एक बंदूक तयार करण्यांत आली आहे ती फार हलकी असून तिची किंमत ही फार कमी आहे.

२३॥ लक्ष रुपये खर्चून सिंधूनदीवर पूल बांधण्याची परवानगी सेक्रेटरी आफ स्टेट यांनीं दिली आहे.

इटली भाषेंत पुराण महाभारतांतील दुष्यंत राजाच्या कथेचें इटली भाषेंत भाषांतर झालें आहे.

टर्कीचे सुल्तान आर्मिनियांत सुधारणा करण्याला तयार आहेत व त्यां बदलचे त्यांचे विचार त्यांना इतर राष्ट्रांच्या वकिलानां कळविले.

हिंदुस्थान सरकार बेंगाल नागपूर रेल्वेला कर्ज थोड्या व्याजाच्या हप्त्यानें देणार.

येत्या सालीं रशियांतील कांहीं ठिकाणीं खबुतरांचे टपाल चालू करण्यांत येईल असें समजतें.

कान्स्टांटिनोपल येथें अशी बातमी आहे कीं, सुलतान साहेबांनीं इजिप्तच्या प्रश्नांत आपलें लक्ष अधीक जोरानें घालावें ह्मणून त्यांना खेदिवनें पांच लक्ष पौंड किमतीची नजर आणली आहे.

मेसर्स कार्लाइल व टॉम पामर असे बॉरिस्टर्स सिमला येथें हैद्राबाद येथील रत्नांच्या चोरीचा खटला तपासण्या करितां नेमिलेलें कमिशन पार्लमेंट्रीय आफिसाकडून रद्द ठरविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं गेले आहेत, असें ह्मणतात.

हैद्राबाद संस्थानांतील पोस्ट आफिसांवर देखरेख करण्या करितां एक हुषार युरोपियन पोस्ट मास्तर जनरल ह्मणून नेमण्यांत येणार आहे. हैद्राबादचे दिवाण साहेब परवां सिमल्यास गेले होते तेव्हां यांनीं व्हाइसराय साहेबांची याबद्दल परवानगी घेतली.

सु०प्र०

गुलाबाचें अत्तर प्रसिद्ध नूरजहान आणि तिची आई या काढीत असत.

छोटानागपूर प्रांतांतील कोचांग येथें मुसलमानांनीं दंग्याची तयारी चालविली आहे. त्यांना १०,००० लोकांचा समाज जमला असून ते पोलिस वगैरे सरकारी अधिकाऱ्यांचें कांहीं ऐकत नाहींत. व ह्या साठीं त्या प्रांताचे कमिशनर लष्करी मदत बोलवून घेत आहेत. मुंबईची ता० १०९ ची तार.

ज्ञा० च०

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .... .... .... ६४

Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०१
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

**VOL XXIX — AKOLA MONDAY 23 SEPTEMBER 1895 — NO 37**

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख २३ माहे सप्तंबर सन १८९५ इ० — अंक ३७

In the case of Sriram Motiram vs. DeoRao Jaikrishna on the file of the Civil Judge at Amraoti we have published a good deal of important matter in separate supplements. We have also got with us the learned reply of the defendant to the written address of the plaintiff with a rejoinder in *seriatum* of the latter. They are well and good in their own ways; but as they have been considered in full in the course of the judgment we wish to take leave of the case with that portion of the judgment where the learned judge proceeds to show how he arrives at the decision he has come to. After reciting the text of the plaint, and the written statements of both the parties the Civil Judge proceeds to remark as follows:—

"Before recording my finding on issue no. I I think it right to dispose of the plea raised by the Plaintiff in argument that the said issue was subject to amendment at a later stage of the suit. There is nothing in the proceeding of 11th January 1895 to show this, and the insertion of the word "not" in the issue was made in the presence and with the knowledge of the pleaders of the parties. Indeed, if I remember aright Plaintiffs' pleader consented to the addition of the word "not" However after reading the arguments of the parties, I think that the onus of proving the 1st issue lies on the Defendant and that it was wrongly thrown on the Plaintiff.

Even if the word "not" be struck out and the onus thrown on the Defendant yet I hold that he has discharged it, because the report was made in reply to a requistion from the Deputy Commissioner, and therefore his act falls under the head of "qualified" privilege and is protected. He is subordinate to the Deputy Commissioner of Akola and as the latter called for his explanation, it was his duty to submit. This act must therefore be held to have been done in the bona fide performance of his duty. (vide the following extract from Odgers on Libel and slander page 197 2nd edition)

"cases of qualified privilege may be grouped under three heads."

1 "Where circumstances cast upon the Defendant the duty of making a communication to a certain other person to whom he makes such communication in the bona fide performance of such duty."

My finding on the 2nd Issue is that the act of the Defendant was not done in his judicial capacity, and he is not protected by act XVIII of 1850. That act says "no Judge, Magistrate, Justice of the peace, collector, or other person acting judicially shall be liable to be sued in any civil court for any act done or ordered to be done by him in the discharge of his judicial duty, whether or not within the limits of his jurisdiction' &c.

The act of the Defendant in submitting the report was made in his excutive capacity in obedience to an order of his superior officer, and not in the discharge of judicial work. I do not agree with the defendant's pleader that gecause the Defendant had authority over Plaintiff as a Judge and it was in that capacity that he submitted the report that his act must be held to be judicial

My finding on the 3rd Issue is in the affirmative. I proceed to deal with the report para by para.

Para I is the heading of the report.

Para II— On referring to the bundle of papers marked no. 14 case no 353, wrongly numbered "363" in the report I find that on a repart from Mr. Davies, the then District Registrar of Akola No. 674 dated 4th November 1889 complaining that Shriram (Plaintiff) "has been giving great deal of trouble by presenting all sorts of petitions against the sub—Registrar there, and in one instance without just cause". Mr. Hare, after hearing Plaintiff's explanation as to why his license should not be cancelled recorded an order on 30th December 89 that Shriram he warned that he would lose his license, if he would give any more trouble "by putting in false and frivolous complaints." With regard to the further statement in this para that Plaintiff sent petitions in the names of the persons, who knew nothing about them there is the evidence taken on commission of Defendant's witnesses Nos. 1 and 2 Narhar Balaji and Trimbak Bapuji whom I do not see any reason to disbelieve.

Para III Two petitions are referred to in this para, one dated the 1st June 1890 and the other dated the 27th July 1890 The one 1st June 1890 is signed by the Plaintiff and it is a complaint against the SubRegitrar of Telhara for allowing certain unlicensed petition writers to work within the precincts of the Court of Small Causes This petition was forwarded to the Defendant for report, and ultimately filed by the Deputy Commissioner. There is no petition of 27th July 1890 signed by the Plaintiff but there is one of 27th September 1890 signed by Trimbak Bapuji, Krishnarao and Laxman. In it they apply for licenses to work as petition writers. There is a petition of 11th September 1890 bearing the signature of Plaintiff, but the allegations contained therein appear to have been true, as the Deputy Commissioner ordered that the persons complained against be given licenses. Paras 4&5

The statement contained in these paras is satisfactorily proved by Defendant's witnesses No. 1 Narhar Balaji, no. 2 Trimbak Bapuji, no 3 Shamrao Hari and no. 4 Sakharam Anandrao. In this connection, I may refer to the evidence of Plaintiff's witnesses no. 3 Jaikrishna Tukaram late record-keeper at Telhara and no. 9 Mr. Parshram Ganesh late clerk of Court there. Witness Jaikrishna says the Plaintiff used to come to the Record room to "obtain inspection for litigants and to correct darkhasts." Witness Parshram says that he never saw nor heard that Plaintiff searched the records. I hesitate to believe these two witnesses because if they now admit that Plaintiff obtained infomation surruptitiously, they would be quilty of a grave dereliction of duty.

Para 6

I take Defendant's statement as true. It is also supported by the evidence of Defendant's witness no. 4 Sakharam Anandrao examined on commission.

Para 7. For the statement contained in this para Defendant relies on the first para of the written statement (vide certified copy filed by Plff (Ex)) filed by Plff as Muktyar for the Plaintiff in suit no. 476 of 1891. The para in question runs thus.

"प्रतिवादी नंबर १ चा जबाब होते वेळेस कोर्टांत प्रतिज्ञा प्रतिवादीनीं घेतली व जबाब वकिलानीं दिला हें बरोबर नाहीं कारण खरा प्रकार कळण्या करितां खुद्द प्रतिवादीचेच तोंडचा जबाब झाला पाहिजे होता."

i. e. "the Defendant was sworn in in order to be examined, but his pleader made the statement. This is not right. In order to ascertain the truth the Defendant himself should have been examined." This sentence does not quite mean that Plff charged the Defendant with writing false statement, but defendant took it in that light, and I do not think that this reading of it is entirely unwarranted.

Para 8.

The allegation made in this para is based on the report of the Punchas themselves, and nothing is shown why that report should not be believed.

Para 9.

I have seen the petition (vide Petition filed in Ex. case no. 405 of 1888) referred to in this para. There appears to be no ground for supposing that Plaintiff gave a wrong date to that petition with intent to deceive the Court. In his examination taken on 8th. August 1891 in that case, he distinctly stated that the mistake in the date was accident, and that the petition was probably written by him on 7th. April. He repeats this statement before me. When the report was written Defendant referred to the papers connected with the matters mentioned therein. This is clear from Plaintiff's witness no. 8 Dhondo Anant who says in his cross—examination that the papers which were handed to him by the Deft. were those referred to in the report, and connected therewith. Thus I hold that Defendant made the report "fairly, impartially without exaggeration or the introduction of irrelevant calumniatory matter" (Odgers page 197)

No doubt there are some allegations in the report which do not appear to be strictly borne out by the papers but they are not of such a nature as could be regarded as exaggerations, or wilful misrepresentations so as to raise a presumption of malice against him. At the most they were the outcome of an error of judgment. The fact that he forwarded with his report all the connected papers on which it was based is the strongest evidence of his bona fides. Plff has not succeeded in proving any malice on Defendant's part. Plff refers to Defendant's action subsequent to the report. In criminal case no. 38 of 1894 he charges the Defendant with antedating a remand order and detaining Plaintiff in custody unlawfully. This charge is altogether unfounded, as will be seen from the judgments of the Judicial Commissioner, and the Civil and and Sessions Judge, copies of which are filed in this case. Plff also refers to the Defendant's letter to the Civil and Sessons Judge No. 66 dated 9-2-92 in which he speaks unfavorably of Plaintiff, but there is nothing in it, which can be called malicious, as the Defendant spoke from papers as the letter itself shows. That there existed good feeling between the parties till shortly before the date of the report, is evident from the statement of the Plaintiff's own witnesses, and the certificate of good character admitted to have been given by Defendant to Plaintiff in May 1891. The bad opinion arose subsequently and was the result of things that happened or came to the knowledge of the Defendant subsequently. The petition of 1st. June 1890 referred to in para 3 of the report was the only matter of which the Defendant was personally aware before the date of the certificate, but it was not so serious as to prevent Defendant's giving a good character certificate to Plff a year afterwards. There is therefore no ground for supposing that in making the report Defendant acted maliciously.

No findings are now necessary on the 4th. and 5th. issues.

I dismiss the Plaintiff's claim with cost. Dated Amroti the 27th. August 1895."

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आश्विन शुद्ध ५ शके १८१७

---

लार्ड सालिसबरींचें प्रधानमंडळ स्थापित झाल्या बरोबर इंडियांतील राजकीय प्रश्नांची दिशा बदलली इतकेंच नाहीं तर पूर्वींच्या लिबरल प्रधानमंडळानें केलेले ठराव रद्दही करण्यात आले. चित्रळ प्रांत काबीज न करितां सोडून द्यावा असा प्रथम विचार ठरला होता परंतु तो प्रांत हस्तगत केला असून सर्व राज्यसूत्रें अपरोक्षरीत्या ब्रिटिश सरकारनें आपल्या हातांत घेतलीं आहेत. इंडियाचे

प्रश्नांचा विचार पार्लमेंटांत समतोल न्यायबुद्धीनें व एकदिलानें खरोखर व्हावयाला पाहिजे पण स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिल्टन यांस विलायतच्या लोकांचा कळवळा अधिक आहे आणि ज्या लांकाशायरच्या व इतर ठिकाणच्या लोकांच्या मतसंख्येनें नवें प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें या लोकांचे उपकार स्टेट सेक्रेटरींच्या मनांत जागृत आहेत तेव्हां अनृणी होण्याच्या कृतज्ञताबुद्धीनें इंडियाच्या राज्यकारभारांत काय काय खलबतें चालतील यांचा कांहीं नेमच उरला नाहीं. सध्यां तीन प्रश्न लोकांच्या मनांत विशेष घोळत आहेत. पहिला प्रश्न चित्रळ संबंधानें होता त्याचा निकाल लागल्या सारखांच आहे. चित्रळ सारख्या पहाडी संस्थानिकांशीं केलेले पूर्वींचे मैत्रीचे तहनामे नवीन योजनेनें पाळण्यांत आले नाहींत, चित्रळमध्यें ब्रिटिश अंमल बसविल्यामुळें खर्च विलक्षण पडत आहे, परराज्यांत हात घातल्यानें हा व्यापार वृथा व घातुक आहे आणि विनाकारण असंतुष्टता व द्रोहबुद्धि या वाढत आहेत. चित्रळच्या मोहिमेंत मूळ हेतु असा होता कीं चित्रळवर कोणाचा हल्ला होऊं नये व किंवा दुसऱ्या कोणाचें वर्चस्व असूं नये; पण अंतस्थ विचार ब्रिटिश सरकारच्याच ताब्यांत चित्रळ प्रांत ठेवण्याचा होता. लार्ड रोझबरी मुख्य प्रधान असतांना त्यांनीं निक्षून कळविलें होतें कीं पहाड व जंगलें यांमुळें चित्रळ कडून इंडियावर परचक्र येण्याचे मार्ग बंद आहेत ते मात्र आपण चित्रळ सर केल्यानें खुले होतील आणि रशियाशीं पामीरच्या सरहद्दी संबंधानें झालेल्या ठरावा विरुद्ध ब्रिटिश सरकारच्या हातून आगाळिकीच्या गोष्टी घडणार आहेत. किंबहुना चित्रळच्या द्वारानें इंग्लिश सरकारास त्रास देण्यास व राजकीय चिंता उत्पन्न करण्यास रशियास चांगली संधि मिळेल. चित्रळच्या मोहिमेच्या मोठ्या खर्चा शिवाय कायम एक मोठा खर्च इंडियावर बसला जात आहे हें कोणी लक्ष्यांतच घेत नाहीं. ११ हजार फौज चित्रळ पर्यंतच्या रस्त्यावर ठेवणें हें कांहीं सामान्य खर्चाचें काम नाहीं. पहाडी लोकांच्या स्वतंत्रतेवर गदा घालण्यानें ब्रिटिश सरकारचीं गत अभिवचनें मोडण्यांत आलीं आणि त्यामुळें ब्रिटिश सरकारावरील पहाडी लोकांचा विश्वास उडाला हेंही कांहीं ठीक झालें नाहीं.

नवीन प्रधान मंडळामुळें इंडियाच्या राज्यव्यवस्थेला धक्का पोंचेल असेल असा दुसरा प्रश्न जकातीच्या कायद्या संबंधानें आहे. विलायती कपड्यावर व सुतावर जकात माफ करावी अशा विषयीं इंग्लंडांत मोठे भगीरथ प्रयत्न चालू आहेत. चित्रळच्या मोहिमेचा खर्च बसला नव्हता आणि जकातीचें उत्पन्न चालूंच आहे तेव्हां देखील हिंदुस्थानचे फडणीस सर वेस्टलांड यांस जमाखर्चाचीं तोंडें मिळवितांना मोठी पंचाईत पडली होती. सांप्रतच्या अधिक निकृष्ट स्थितींत लांकाशायरच्या लोकांच्या खुषीसाठीं कपड्यावरील जकात बंद केली जाईल कीं काय या विषयीं आह्मास मोठें गूढ पडलें आहे. उत्पन्नाच्या बाजूनें मोठी अडचण नसेल तर आयात मालावर जकातच नसावी हें तत्व आह्मास कबूल आहे; परंतु कपड्या वरील मात्र जकात घ्यावयाची नाहीं आणि इतर आयात मालावर जकात चोपून वसूल करावयाची ह्मणजे मोठा अन्याय होईल आणि इतकी चळवळ उडाल्या नंतर असा अन्याय करणें फार धोक्याचें होईल. गेल्या जानेवारींत मि. आस्क्विथ या संबंधानें पार्लमेंटांत असें बोलले कीं कोणत्या तत्वावर जकाती पासून फक्त कापड व सूत हीं वगळतां येतील हें कळत नाहीं. शिवाय आपलें राज्य तरवारीच्या बळावर कमावलें आहे तथापि या राज्याची सर्व इमारत व वैभव इंडियन प्रजेच्या विश्वासावर आहे; आणि हा विश्वास असा बसला आहे कीं राज्यकारभारांत इंडियाचें कल्याण प्रथम पाहतील इतकेंच नाहीं तर प्रसंगानुसार आपल्या लौकिका प्रमाणें राज्यकर्ते स्वताच्या नुकसानी कडेही पाहणार नाहींत नामदार फौलर साहेबांच्या व्यवस्थेंत मि. बाल्फर दोष काढतात कीं २० नंबरी सुतावरील जकात बसविल्यानें विलायतच्या कापडाच्या व्यापाराला कांहीं लाभ न होतां इंडियांत वीस नंबरा खालील सुताचा कपडा बहुत तयार होईल व त्याचा खपही पुष्कळ होईल. हा कोटिक्रम वस्तुतः खोटा आहे पण खरोखर इंडियन लोक दृढनिश्चयानें वीस नंबरा खालील सुताचाच कपडा वापरतील तर आमचा भाग्यकाल अगदीं समीप आला असें आह्मी समजूं.

तिसरा महत्वाचा प्रश्न सिव्हिल सर्व्हिस परीक्षे संबंधानें आहे. ही परीक्षा इंग्लंडांत व इंडियांत अशा दोन ठिकाणीं एक कालीं कां होऊं नये याला योग्य, मुद्देसुत व विचारयुक्त असें कारण कांहींच दाखविण्यांत आलें नाहीं. लार्ड हामिल्टन यांचे अभिप्राय असे बनलेले आहेत कीं त्यांच्या संबंधानें आमच्या मनांत कांहीं आशातंतु शिल्लक नाहीं; पण ते जर सर स्टाफर्ड नार्थकोट सारख्या उदार विचाराच्या महापुरुषाचें वचन लक्ष्यांत घेतील तर त्यांचे डोळे थोडेबहुत आमच्या संबंधानें उघडतील.

फार वर्षांपूर्वीं ह्मणजे सन १८६७ सालीं सर नार्थकोट यांनीं लार्ड नेपियर यांस लिहिलें होतें कीं इंडियन लोकांनीं इंग्लंडांत येऊन इंग्लिश गृहस्थांशीं परीक्षेंत सामना द्यावा असें ह्मणणें निव्वळ थट्टा आहे. असेच पुष्कळ विषय स्टेट सेक्रेटरींना विचारांत घेण्यासारखे आहेत आणि दरसाल राष्ट्रीय सभा हेच विषय आपल्या ठरावांच्या रूपानें सरकारापुढें मांडीत आहे तथापि कोणी खरी कळकळ बाळगणारा मिळेपर्यंत सर्व आशा मृगजळा प्रमाणें भ्रामक व लटक्या आहेत.

---

नामदार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मुंबई युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमा संबंधानें दोन उपयुक्त व महत्वाच्या सूचना आणिल्या होत्या. त्या पैकीं पहिली सूचना अशी होती कीं युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसलेल्या उमेदवाराला शेकडा ४५ हून अधिक गूण ज्या विषयांत मिळतील त्या विषयांत त्याला पुन्हा परीक्षेस बसण्याची जरूर नसावी; आणि विषयवारीनें परीक्षा देत देत गोळाबेरजेनें ज्याची परीक्षा सर्व उतरली त्याची ती परीक्षा उतरली असें समजावें. ही सूचना निराळ्या शाखेच्या फ्याकल्टीकडे धाडण्यांत येऊन नंतर तिचा विचार होणार आहे. सारांश ही लांबणीवर पडली आहे.

आर्ट शाखेकडील परीक्षा तीन आहेत त्या दोन करण्या विषयीं नामदार रानडे यांनीं दुसरी सूचना आणिली होती पण ती सहाजणांच्या बहुमतानें नापसंत ठरली. एकंदर मत देणार ८० गृहस्थ सिनेटमध्यें हजर होते. या सूचनेचा असा निकाल झाल्यामुळें विद्यार्थ्यांचा त्रास न सुटता एक चांगली सूचना मागें पडली. अलिकडे परीक्षांची जंत्री मोठी बिकट व सर्वव्यापी असल्यामुळें त्यांचा वाईट परिणाम विद्यार्थिसमूहाच्या मनावर व शरीरावर दिसून पडतो. कांहीं कालान्तरानें तरी ही सूचना पुन्हां सिनेट पुढें येईल व पसार होईल अशी आह्मास उमेद आहे.

---

वऱ्हाड प्रांतीं एकंदर फ्याक्टरी १०५ आहेत. त्यांपैकीं फक्त ६६ फ्याक्टरी आक्टा खालीं येतात. यामध्यें ३७ कापूस वटण्याचे कारखाने असून २८ कापसाचे गठ्ठे बांधण्याचे कारखाने आहेत आणि फक्त एकच गिरणी वढनेऱ्यास आहे तिच्यामध्यें सूत निघतें आणि कापडही निघतें. एकंदर कारखान्यांतून ९८५२ मनुष्यें काम करीत असतात. कापसाचे रेचे व गठडी बांधण्याचे प्रेस वर्षांतून सरासरी आठ महिने चालतात. फ्याक्टरी आक्टा प्रमाणें हे कारखाने चालविल्यामुळें कांहीं नवीन फेरफार करावे लागले नाहींत किंवा कारखानदार व कामकरी लोक या उभयतांस ही कांहीं त्रास पडला नाहीं. दर आठवड्यांतून ठिकठिकाणच्या बाजारच्या दिवशीं सुटी असते. दररोज अर्धा घंटा नियमा प्रमाणें विश्रांति मिळते किंवा नाहीं हें पक्कें कळत नाहीं. तथापि कोणाची तक्रार नसते आणि विश्रांती दिली जात असेल ह्मणूनच कांहीं बोभाटा नाहीं.

फ्याक्टरीच्या इमारतींत स्वच्छता चांगली ठेविलेली असते. कांहीं जुन्या कारखान्यांतून पायखान्यांची सोय चांगलीशी नसते. शेतीच्या कामा पेक्षां फ्याक्टरीचें काम शरीराला कमी आरोग्यकारक खरें तथापि वऱ्हाडांतील कारखान्या संबंधानें कांहीं अपवाद घेण्याचें मि. जिरार्ड बायलर इन्स्पेक्टर यांस कारण दिसत नाहीं. पुरुषाची रोजी ४ चार आणे व बायकाची ३ आणे असते. फ्याक्टरींतले मजूरदार बारा वर्षां नंतर मजूरी सोडून मग दुसरा स्वतंत्र धंदा करितात असें बहुशः आढळून येतें बायका एकंदर २०९८ आहेत आणि त्यांस १० तास दररोज काम करावें लागतें. कायद्यानें ११ तासांची मोकळीक आहे तेव्हां कांहींच नड पडत नाहीं. १८९० च्या फ्याक्टरी कामिशनचें ह्मणणें असें होतें कीं, बायकांना मध्यंतरीं १॥ तासाची रजा द्यावी पण वऱ्हाडात फ्याक्टरी पासून मजूरदारणींचीं घरें लांब असल्या मुळें लवकर कामबंदा सुरू करून संध्याकाळीं घरीं जलदी जाण्यास मिळालें तर त्यांस बरें पडतें ह्मणून सर्वत्र तशीच व्यवस्था आढळते. सन १८९४ मध्यें एकंदर आठ अपघात घडले त्या पैकीं चार भयंकर होते आणि हे सर्व वढनेऱ्याच्या गिरणींत घडले. एकाचीं बोटेंच चाकाची वादी बसविते वेळीं सांपडून तुटलीं गेलीं. फ्याक्टरी आक्टा प्रमाणें एकही गुन्हा दृष्टोत्पत्तीस आला नाहीं हें मोठें समाधानकारक होय.

---

‘ बांबे प्रेसिडेन्सी असोशिएशन ’ नांवाच्या मुंबईच्या सार्वजनिक सभेनें दोन ठराव करून लोकांच्या माहिती साठीं प्रसिद्ध केले आहेत त्यांचा मतलब येणें प्रमाणें:—

दादाभाई नवरोजी

गेल्या पार्लमेंटरी निवडणुकीच्या वेळीं मि. दादाभाई नवरोजी यांची कामन्स सभेंत निवड झाली नाहीं हें पाहून इंडियन लोकांस पराकाष्ठेचें दुःख वाटलें व त्यांच्या मनाचा मोठा हिरमोड झाला. इंडियाच्या अत्यंत कल्याणागोष्टी साधण्यासाठीं या गृहस्थानें आपलीं सभासदपणाचीं तीन वर्षें लोकोत्तर देशसेवेंत खर्च केलीं. यांच्या कर्तव्यदक्षतेला व लोकप्रियतेला अनुलक्षून ग्रेट ब्रिटनचे उदारशील मतदार लोक पुन्हा योग्य प्रसंगीं यांची बहुमतानें निवड करितील अशी उमेद आहे.

सर वुलियम वेडरबर्न—सर वुलियम वेडरबर्न यांची फिरून निवडणूक झाली हें पाहून सर्व लोक आनंद पावले. सर वुलियम वेडरबर्न यांनीं गेल्या तीन वर्षांत आपल्या मतदार लोकांच्या वतीनें मोठ्या जबाबदारीचीं व जिकिरीचीं कार्यें परम उत्साहानें व कर्तबगारीनें केलीं इतकेंच नाहीं तर या देशाच पक्ष त्यांनीं उत्तम तऱ्हेनें स्वीकारला आणि सर्व कामकाज विलक्षण विचारस्वातंत्र्यानें व अनुपम निर्भेळपणानें बजावलें. त्यांच्या अशा महाकार्यामुळें लोकांचा विश्वास त्यांच्यावर अतुल बसला आहे आणि सर्वत्र त्यांच्या नामोच्चाराचा जयघोष लोक मोठ्या कृतज्ञतेनें करित असतात.

---

वऱ्हाडांत वकिलीचा धंदा करण्याची परवानगी मिळण्या विषयीं जे नियम आहेत त्या अन्वयें वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा तरी उतरलेली पाहिजे किंवा बाकी प्रांतांतील हायकोर्टाच्या वकिलीची सनद असून तीन वर्षें वकिली केल्याचा अनुभव पाहिजे ह्मणजे वऱ्हाडांत वकिलीची सनद दिली जाईल. या नियमामुळें बाहेरचे हायकोर्ट वकील वऱ्हाडांत येऊन स्थाइक होण्याची मनाई झाली इतकेंच नाहीं तर वऱ्हाडचे विद्यार्थी एल. एल. बी. परीक्षेंत पास होऊन ही त्यांस वऱ्हाडांत वकिली करण्याची बंदी झाली होती. हे नियम फार कडक झाले आणि त्या नियमांचा पांडित्यप्रकर्ष मूळच्छेदी झाला. वकील चांगले शिकलेले, सवरलेले व दृढ व्यासंगी असे असावेत ह्मणून जुने नियम सुधारून गेल्या १८९२ आगष्ट महिन्यांत नवे नियम केले पण त्या मुळें प्रांतातलेच गृहस्थ बी. ए. एल. एल. बी. होऊन ही त्यास वकिलीचा परवानगी नाहीं असें झालें. ही गोष्ट नजर चुकीनें घडली असो किंवा बुद्धिपुरस्पर तसाच नियम बनविला असो, हा घातुक नियम दुरुस्त करण्यांत आला आहे तेव्हां कुरकुरीची जागा आतां कांहीं राहिली नाहीं. आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं तीन वर्षांच्या अनुभवानंतर ही दुरुस्ती करण्यांत आली, गेल्या १३ व्या तारखेचा हुकूम हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केला आहे कीं मुलुख असमानी हैदराबाद यांस लागूं केलेल्या वकिलीच्या नियमांपैकीं २६ व्या नियमांत खालील गोष्ट अधिक सामील क-

काबूलच्या अमिराच्या मुलाला ज्या उत्साहानें इंग्लंडांत नेण्यांत आलें, त्याचा विशेष सा अंश, तो येते वेळीं राहिला नाहीं. या विषयीं गतांकीं आह्मी लिहिलेंच आहे. त्या शिवाय ज्या बातम्या आल्या आहेत त्या वरून या सगळ्या खटपटीनें अंतस्थ कारण बहुतेक बाहेर आलें आहे. इंग्रजांच्या मनांतून, अमीरावर आपल्या महत्वाची छाप बसवावी व आपलें विशेष सख्य वाढावें अशी इच्छा असणें स्वाभाविक होते. पण अखेरीं परिणाम निराळाच झाला; अमीराच्या मनांतील हेतु, या सफरींत आपल्या मुलानें युरोप मधील सर्व व्यवहार पाहून हुषार व्हावें व आपला वकील खुद्द इंग्लंडमध्यें राहून, स्वतंत्र राज्याप्रमाणें आपला व्यवहार, खुद्द इंग्लंडशीं चालावा असा असल्या विषयीं, अनेक बातम्या सबळ पुरावा देत आहेत. परंतु अमीराचा हेतु पुरा झाला नाहीं; कारण शहाजादा नसरुल्लाखानाची पाहुणचाराची मुदत भरून गेली तरी त्याचा हेतु जो, वकील राहविण्याचा, तो सिद्ध होण्यासाठी त्याचें रहाणें जास्त झालें. तें इंग्लंडला कबूल नव्हतें, व वकील ठेवणेंही मान्य नाहीं असा जबाब द्यावा लागला. त्यामुळें अमीराला संतोष झाला नाहीं हें उघड आहे. शहाजाद्याचें जास्त रहाणें झालें त्यावेळीं त्याच्या मनानें असें घेतलें होतें कीं, माझ्यावर कांहीं हल्ला होणार आहे आणि तो त्यासाठीं मोठ्या बंदोबस्तानें राहिला होता. पुष्कळसा दारूगोळाही त्यानें आपल्या बिऱ्हाडी ठेवला होता. पण इतका दारूगोळा ठेवणें कायद्याविरुद्ध आहे वगैरे समज मिळाल्या वरून तो परत करण्यांत आला. अशा प्रकारें या मुशाफरीचा मोठा चमत्कार उडून राहिला होता, राजकीय अंतरंग असें असल्यास मोठेसें नवल नाहीं. तितक्यांतून वेळ हरलीची !

अस्त्रिलियाच्या परीसला शहरांत एक बलून (विमान) उतरलें होतें. त्यांत एक वायुवकील व दोन रशियन अमलदार होते. त्यांस पकडण्यांत आलें आहे. ते ह्मणतात कीं, आमचे बलून येथें स्वभाविक पडलें. पण त्यांच्या पाशीं कांहीं नकाशे व फोटोग्राफचें सामान आढळल्यावरून त्यांचा तपास चालला आहे कीं हे लोक कांहीं गुप्त कामासाठीं आले आहेत कीं काय?

पारीसमधील एक मोठी ब्यांक, दारूच्या योगानें उडवून देण्याचा प्रयत्न एका एनारकिस्ट पंथाच्या गृहस्थानें केला होता. पण तो निष्फळ होऊन, त्यास पकडण्यांत आलें.

जपानसाठीं लढाईचीं जहाजें व इतर सामान घेण्यासाठीं, तेथील मुख्य प्रधानाचा मुलगा, नवंबर महिन्यांत इंग्लंडला जाणार आहे.

इजिप्ताचा कबजा, इंग्लंड सोडून जाई पर्यंत कांगो, नाईल व उहांनगा हीं बंदरें फ्रान्सनें आपल्या ताब्यात, जामिनगिरी दाखल ठेवावी अशी सुचना फ्रेंच पत्रांतून होऊं लागली आहे.

कराचीस पाद्री लोकांनीं एका पारशाच्या अज्ञान मुलास बाटविलें होतें. हल्लीं तो वयांत आल्यामुळें, आपल्या अज्ञानपणांत झालेल्या बापतिस्म्याबद्दल आपलें विरुद्ध मत प्रकट करून, आपण ख्रिस्ती नसल्याबद्दल त्यानें प्रसिद्ध केलें आहे.

निजाम हैद्राबाद रेल्वे, मनमाडपासून औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेड या रस्त्यानें हैद्राबादपर्यंत वाढणार आहे. श्रीस. वि.

खून—रावळपिंडी शहरांत एका महिन्यांत २५ खून झाले !

फ्रान्सच्या मनांत रशिया, जर्मनी व टर्की यांस मिळवून घेऊन इंग्रजांस इजिप्त येथून नाहींसें करावयाचें आहे.

कोडंगल येथें एक महार जातीची बाई बाळंत होऊन तिला एक मूल झालें त्याचा निम्मे भाग पुरुषाचा असून निम्मे स्त्रीचा आहे व पाय तीन आहेत ! मूल जिवंत आहे ! !

पातळ पदार्थ पितांना मिशा माखल्या जाऊन त्रास होऊं नये ह्मणून एकानें टिपकागदासारख्या कागदाचा पट्टा केला आहे. तो लावून कानावर तार अडकवून दिली ह्मणजे खुशाल बासुंदी झोडावी. आ. व.

बैलाची आगगाडीशीं टक्कर—स्पेन व पोर्च्युगालचे सरहद्दीवरून आगगाडी जात असतां एक बैलाचा कळप दृष्टीस पडला. गार्डानें शिटी फुंकली; तीं सरसे सर्व बैल पळाले; पण एक दांडगा सडकेवरून समोरून धांवत आला व एंजिनला टक्कर दिली. त्याचे तुकडे तुकडे झाले व ते चाकास वगैरे लागले ह्मणून काढण्याकरितां माणसें गुंतलीं इतक्यांत सर्व कळप शिंगें वर करून धांवत आला व एंजिनास व डब्यास धडाधड धडके मारीत सुटला ! माणसांनीं धोंडे जमा करून बैलास मारले व गोळ्या घातल्या; पण दोन तास तीं जनावरें टक्करा घेत होतीं व अखेर रात्र होऊन काळोख पडला तेव्हां पळालीं.

मि. ओल्डनामक एका यूरोपियन फलज्योतिष्यानें राणीसरकारच्या जन्मग्रहावरून वगैरे असें भाकीत वर्तविलें आहे कीं चालू वर्षाच्या सप्टेंबर आक्टोबर व नोव्हेंबर ह्या महिन्यापर्यंत मात्र महाराणीसाहेब वांचतील परंतु डिंडिगल येथील एक हिंदु फलज्योतिषि राणीसाहेबांच्या पत्रिकेवरून असें भविष्य वर्तवितो कीं त्यांना १९१३ पर्यंत कांहीं एक भिती नाहीं. या पैकीं कोणते भविष्य अनुभवास येतें तें पाहणें आहे.

दौंड मनमाड लायनी वरील आनकाई स्टेशनापासून तों हैद्राबाद पावेतों, ३०० मैल आगगाडीचा फांटा करण्याचें ठरलें; मात्र लाईन न्यारोगेज (अरुंद प्रमाणाची) करावयाची. न्या. सिं.

सन १९०० सालीं पारिस तेथें जें जंगी प्रदर्शन भरावयाचें आहे त्या प्रसंगीं तेथें अशी टूम उडविण्यांत येणार आहे कीं एक दोनशें फूट लांबीची जंगी दुर्बीण व एक आरसा यांच्या योगानें चंद्राचें प्रतिबिंब एका पडद्यावर उतरून चंद्राच्या अगदीं निकट आपण आहों असें प्रेक्षकांना भासावयाचें.

फोर्मोसा बेटांतील ब्लॅक फ्लॅग्स शिपायांवर एकदां निकराचा हल्ला करण्यासाठीं जपानी लोक जारीनें तयारी करीत आहेत.

बेटन नांवाच्या एका अमेरिकन शोधकानें समुद्राच्या तळीं जाऊन तेथील वस्तूंच्या तसबिरा काढण्याचें एक यंत्र तयार केलें आहे— याचा नवीन शास्त्रीय शोध करणाऱ्यांना मोठा उपयोग होईल.

व्हाईसराय साहेब येणार आहेत त्यांच्या नें आदरसत्कार करण्या करितां २०,००० रुपये खर्च करण्याचे म्हैसूर सरकारानें ठरविलें आहे.

पोलिसच्या हातीं न सांपडतां आपला उद्देश सिद्धीस नेतां यावा ह्मणून युरोपांतील अनार्किस्टांनीं हल्लीं पोस्टांतून पार्सलरूपानें मोठमोठ्यांना फुटणारीं कुलपीं गोळ्यांचीं अस्त्रें पाठविण्याची नवीन युक्ति अमलांत आणिली आहे.

इंग्रज सरकारच्या हद्दीवर मिळविलेल्या फीवर इनकमटाक्स घेऊं नये असें सरकारानें ठरविलें आहे.

हैदराबादच्या दिवाण साहेबांनीं सिमल्याहून निघण्या पूर्वी ३००० रु. निरनिराळ्या संस्थांनास वांटून देण्या करितां तेथील म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांच्या हवाली केले. श० प्र०

## NOTICE

No. 300. dated 17 August 1895

The following rules for the supervision and regulation of the Satrabur tank at Buldana made by the Municipal Committee of Buldana at a special meeting held on December 31, 1894, under section 116, part (1), clause h, and part (2) of the Berar Municipal Law are confirmed by the Resident under part (3) of the same section. These rules will have effect on and after the 15th September 1895:—

1 No person shall trespass on land included within the boundaries of the reservoir or tank; neither shall any person bathe or wash clothes or other articles in the reservoir.

2. No person shall permit cattle to graze within the limits of the land taken up for the reservoir, or for the main pipe. No person shall on any account permit cattle to enter the water.

3. No person shall throw any refuse into or in any other way defile the streams from which the reservoir is supplied.

4. Fishing with nets in any part of the reservoir is strictly prohibited. Rod fishing shall not be allowed except under the written permission of the Municipal Committee

5. No trees shall be planted along the margin of the reservoir or within 500 yards of it, nor shall the erection of any new house or hut within the drainage area be permitted without the sanction of the Deputy Commissioner obtained through the Municipal Committee.

6. No water from the said tank or reservoir shall be used for irrigation except under the special permission of the Municipal Committee

7. Any person convicted before a Magistrate of a breach of the foregoing rules 1, 2, 4, and 6 shall be punishable with fine that may extend to twenty rupees.

8. Any person convicted before a Magistrate of a breach of the foregoing rule 3 shall be punishable with fine that may extend to rupees fifty, and, if the breach be a continuing breach, with a further fine of rupees five for every day after the first during which the breach continues.

9. Any person convicted before a Magistrate of a breach of the foregoing rule 5 shall be punishable with fine that may extend to rupees twenty, and if the breach be a continuing breach, with a further fine of rupees three for every day after the first during which the breach continues.


## चांदीचीं भांडीं

श्रीक्षेत्र नासिक येथें तयार झालेली हरएक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम. घनिई पाट १७॥ पेनी. चांदीबदल चौकशी करून घ्या. लिहिल्याप्रमाणें नसल्यास डाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे १ तांटें, तांबे, गडंच, पेले, मुबईपात्रें, फुलपात्रें, वाट्या, पंचपात्रें, द्रोन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सर्व सामानाचा भाव दर तोळ्यास ८–॥। आणे वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ पळ्या उपकरणी देवपुजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारिक सामानाचा भाव दर तो. ८=। आणे वरताळ्यानें देऊं—३ तबकें चौफुलें अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ८=॥ आणे प्रमाणें वरताळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठुश्या वजरटीका सुद्धां घाटवडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारें कळेल—नासिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यांत आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्यापाशीं अडत ठेवणें असेल अगर व्यापाऱ्यास हर वेळीं विक्री करितां माल पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरताळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेल्वे रेग्युलेटर असून कांटे फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क (नासिक सुयस मेड मालकाचें नांव) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षाची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नेंहि पाठविलें जाईल.

पत्ता—उदेचंद मुळचंद छाजेड फुल गल्ली पुलावर नासिक सिटी.



## उत्तम सोय

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [व्यापारी अथवा खासगत] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, सतरंज्या (कच्चे व पक्के रंगाच्या) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना क्लाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोड साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची, मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .... .... .... ०४

Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 30 SEPTEMBER 1895 NO 38

वर्ष२९ आकोला सोमवार तारीख ३० माहे सप्तंबर सन १८९५ इ० अंक ३८

## किंमत पाउणपट केली

वासुदेव चिंतामण बापट वकील आद्य वनस्पती वैद्य याची
शुद्ध वनस्पतींचीं औषधें

खाली लिहिलेले सर्व प्रकारचे पांक पक्या शेरास तीन रुपये प्रमाणें.

बालरोग निवारक चूर्ण— किं. तोळ्यास ०८



पत्ता
वासुदेव चिंतामण बापट
वकील माहालन.
मु० नारिंग्रे.
ता. देवगड.
जि. रत्नागिरी.

१ मदन विलास पाक—नपुंसकत्व दूर करणारा
२ ज्ञानानळ पाक—सर्व प्रकारचे वायुवर.
३ वधु भूषण पाक— सर्व प्रकारचे प्रदरावर.
४ सालंमिश्री पाक, मुसळी पाक, बदाम पांक भुय कोव्हाळे पाक— उत्तम पौष्टीक.
५ बालंत रोग व क्षय रोगावरील— ४२ दिवसांत गुण येतो.
६ आम्लपित्त पोट शुळावरील पाक—८ दिवसांत गुण.
७ मधुमेहावरील पाक—४० दिवसांत गुण.

अन्य औषधें

८ आकडी वरील गोळ्या— डबीस किं रु. २
९ दम्या वरील गोळ्या— डबीस किं. रु.१॥
१० दम्या वरील गोळ्या· डबीस किं. २०४
११ दम्या वरील पुड्या—दर रुपयास २०
१२ अद्भुत चमत्कारिक वीर्यस्तंभक चूर्ण— तोळ्यास ०३ आणे.
१३ सर्व रोगा वरील गोळ्या·डबीस किं. रु.१
१४ उपदंश शामक गोळ्या— डबीस किं. रु० २०४
१५ वात विध्वंसक तेल—सर्व व युवर पावशेराचे कुपीस किं. २०१०
१६ उपदंशशामक मलम—डबीस किं. रु. १
१७ प्रमेहावरील गोळ्या— ८ गोळ्यास किं. रु० १
१८ शतपुटी ओवा— संधीवात, आमवात वगैरेवर किं. दर तोळ्यास ०६ आणे.
१९ शतौषधी मलम— रक्तपीती, व्रण वगैरेवर दर तोळ्यास किं० ०६ आणे.
२० बाळगुटीच्या गोळ्या— मुलाची प्रकृती चांगली राहून आगडी डबा वगैरे होत नाहीं. किं. दर तोळ्यास ०१२ आणे.
२१ रक्त पीती वरिल औषध— तोळ्यास किं० रु० १०८
२२ नेत्र रोगावरील काजळ— डबीस किं० रु० ०१२ आणे.
२३ प्रवाळ भस्म—पित्त विकारावर किं. दर तोळ्यास रु. ०१२ आणें.
२४ खोकल्या वरील गोळ्या— डबीस किं. ०१२ आणे.
२५ पाचक गोळ्या—अन्न पचन होऊन क्षुधा वाढते ३० गोळ्याचे डबीस किं० रु. १
२६ कुडे पाक— संग्रहणी, पांडु यांजवर ३० गोळ्याचे डबीस रुपया १.
२७ पटकी वरील फळें—दर रुपयास २०
२८ वाकेरीचें भातें—दर रुपयास तोळे १०
२९ तापाच्या गोळ्या—सर्व ज्वरावर डबीस किं. ०१२ आणे.
३० रक्त शुद्धीच्या गोळ्या— दर रुपयास डब्या २
३१ स्तंभक, कामोत्तेजक सुवर्ण कस्तुरीयुक्त संजीवनी गुटीका—डबीस किं० रु० १
३२ वनौषधी गुटीका— भ्रमण पीतावर व मस्तकांतील कडकीवर किं. रु. १
३३ व्रणावर औषध— किं. रु. ६
३४ भगंद्रवळासुर याजवरील औषध. किंमत रुपये ७
३५ प्लीहा गुल्म या वरील औषध किं. रु. ६
३६ बहुमुत्रा वरील औषध—किं० रु० १०
३७ कामले वरील औषध—किं० रु. ५
३८ धातुक्षय, उरक्षत, पांडु याजवरील औषध किं. रु. १५
३९ गंडमाळे वरील औषध— किं. रु. ७
४० श्वेत कुष्टावरील औषध किं. रु. ३०
४१ कर्ण रोगनाशक तेल—दर कुपीस रु.१
४२ दाताचे मंजन—सर्व मुख रागावर किं० दर तोळ्यास आणे ०३
४३ रक्त मुळ व्याधी वरील मलम व मुळी दर तोळ्यास किं. ०१२ आणे.
४४ वृश्चिक दोषा वरील औषध— तोळ्यास किं० ०१२ आणे.

वरील औषधें व अन्य सर्व रोगा वरील औषधें आणि वनौषधी प्रकाश, गरमीचें पुस्तक, सुषेण चिकित्सा; गरीबाचा वैद्य. बाल वैद्य, गुराचा वैद्य हीं पुस्तकें सहीतील पत्यावर आह्माकडे मिळतील.

सावगीची सुचना

आमचे कारखान्यांत काम केल्याचें लिहून कोणी ही आमचे औषधांची जाहिरात दिली तथापि त्यांशी आमचा कोणच्या ही प्रकारचा संबंध नाहीं. ह्मणुन ती आमची असें समजून घेऊन फसूं नये. व खरी माहिती अद्यापी कोणासही दिली नाहीं. आमचा खरा माल आह्माकडेसच सहीतील पत्यावर मिळेल.

प्रकृती मान कळविलें असतां निदान करून योग्य औषधाची योजना करणेंत येईल.

वासुदेव चिंतामण बापट वकील
मु० नारिंग्रे.
ता० देवगड
जि० रत्नागिरी.

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस सुतारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदूल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

NOTICE.

AUCTION SALE OF ONE THIRD SHARE IN THE NEW AKOLA PRESS BERAR

On WEDNESDAY, the 9th. October next at 4 p. m., Messrs. BENNETT and Co. will sell by public auction, at their Rooms by order of Bai Manabai, wife of Koorpal Khimji the mortgagee, and with the consent and concurrence of Charles Agnew Turner, Esq, Official Assignee and Assignee of the Estate and Effects of Bharmul Bhojraj, Insolvent, the mortgagor, the following property:—

All the right, title and interest of Bharmul Bhojraj in the land, hereditaments and premises in the New Akola Press, Berar, containing by admeasurement 240,000 square feet or thereabouts, together with all the messuages, tenements or buildings known as the Akola Press buildings, standing thereon and bounded as follows:—That is to say, on or towards the east by the public road leading to Akola, on or towards the west by fields belonging to certain cultivators, on or towards the south by the public road leading to the cotton market, and on or towards the north by a road leading to the river Morna. And also all the presses, engines boilers, gearings drums, shafts, machines, tools, implements, utensils, fixtures, office furniture, articles and things which have been erected, brought upon or affixed to and which are now standing or being in or upon or affixed to the said premises.

For further particulars and conditions of sale application may be made to Messrs. Motabhai and Jamietram Solicitors to the vendor, or to the undersigned.

BENNETT & CO.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध १२ शके १८१७

## दिवाणी न्यायखातें

सन १८९४ सालीं ३१२६८ फिर्यादींचा निकाल लागला यापैकीं शेंकडा ७६·६ खटल्या मध्यें ह्मणजे २३९९१ खटल्यांत फारसा वाद पडला नाहीं. ८७४४ दाव्यांत प्रतिवादीचे कबूली जबाब होते, ८४७८ दाव्यांत एकतर्फी निकाल लागले व ३७३६ मध्यें आपसांत तंटा मिटला. कबुलीजबाबाचे व एकतर्फी निकालाचे दावे वाढले ह्मणजे निकालाचे दावे वाढले ह्मणजे आह्मी असें मानतों कीं ऋणको कर्ज फेडण्यास असमर्थ असल्यामुळें फिर्यादी झाल्या किंवा सावकाराचे व कुळांचे व्यवहार नीटसे चालत नसल्यामुळें फिर्यादी पर्यंत मजल येऊन पोचली. वादग्रस्त दावे शेंकडा २३.२ या प्रमाणानें होते; त्यांत शेंकडा १९.१ ह्मणजे ५८९१ दाव्यांत वादीतर्फे निकाल झाले आणि बाकीच्या १२८५ दाव्यांत प्रतिवादी तर्फे निकाल झाले. बहुत दावे वादीच्या बाजूनें जिंकले याचा एक अर्थ असा निघतो कीं कोडतात जे वादींचे दावे येतात त्यांचा पूर्वींच पूर्ण विचार होऊन नंतर ते कोर्टा समोर येतात. वादी तर्फे बहुत निकाल होतात याचें कारण मि. हेअर साहेब यांच्या मतें निराळेंच आहे. ते ह्मणतात कीं कोडतांतें काम अति वाढल्यामुळें न्यायाधीश नीकस दृष्टीनें व बारकाईनें दाव्याची चौकशी करित नाहींत आणि ह्मणून वादी अनेक वेळां विजयी होतात. परंतु हें स्पष्टीकरण देऊन काढतांना मि. बुलक साहेब ह्मणतात कीं अलिकडे लेखी कबुलायती व दस्तऐवजांची देवघेव अधिक झाली आणि समाजांत कायदेशीरपणाचे वळण पडल्यामुळे खटले पुष्कळ वाढले ही गोष्ट विसरतां कामा नये. आणि त्या शिवाय घाईघाईनें व पूर्ण चौकशी न होतां काम केलें तरी आटोपलें जातें असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं कांकीं पक्षकाराला नेहमी कायद्याच्या सर्व सवलती दिल्या जातात व खटले निकालास लागण्यास दोनावधिही मोठा लागतो.

जिल्ह्याच्या वर्गवारीनें कामाची व्यवस्था कशी काय लागली हें सांगतांना मि. बुलक लिहितात कीं वणी व बुलढाणा या जिल्ह्यांचीं कामें पुष्कळ निकालास लागलीं. मुख्य कुरकूर आकोला जिल्ह्यासंबंधानें आहे

णि त्याच प्रमाणें उमरावती जिल्ह्यासंबंधानें आहे. आकोला जिल्ह्यांत १६६९ दावे तरी शिल्लक राहिले. ही संख्या अधिकच आहे. सर्व वर्षभर कामाचा क्रम अगदीं मंदावलेला व सुस्तपणाचा होता आणि आकोल्याचे सिव्हिल जज्ज यांचें लांबणीवर पडत असलेलें काम पाहून मि. बुल्क नाखुष झाले. आकोल्यास पुष्कळ कोर्टें आहेत तेव्हां कामें अधिक जलदीनें व्हावयाला पाहिजे. उमरावतीस १११२ दावे शिल्लक बाकी अखेर होते. डेप्युटी कमिशनर याचें कारण असें सांगतात कीं अधिकारी वारंवार बदलल्यामुळें कामाची उठावणी चांगली नाहीं. परंतु हें मत मि. बुल्क यांस पसंत नाहीं आणि त्यांच्या मतें उमरावतीस वकिलांचा कलकलाट अधिक असल्यामुळें काम थोडें होतें आणि अशीच अवस्था अकोल्यासही दृष्टीस पडत चालली आहे हें पाहून त्यांस दुःख वाटतें.

वास्तविक प्रकार अगदीं निराळा आहे. उदाहरणार्थ अकोल्याचे सिव्हिल जज्ज रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांच्यावर कामाचा बोजा मोठा आहे आणि दिवसा अकरा वाजल्या बरोबर कामास सुरुवात झाल्यापासून सायंकाळचे पांच साडे पांच वाजे पर्यंत मध्यंतरी बिलकूल खळ न पडतां राजश्री दांडेकर यांचें काम सतत चालूं असतें. त्यांच्यापुढें हजार रुपये वरील सर्व दावे असतात. दावे बहुत भानगडीचे असतात. साक्षीदारांचा खटाटोप बहुत चालला असतो. बहुतेक सर्व खटल्यांत चांगले चांगले वकील काम करीत असतात आणि नफा नुकसानींच्या मोठमोठ्या बाबी असल्या मुळें पक्षकार, वकील व न्यायाधीश आपल्या श्रमाची, विद्वत्तेची, व अनुभवाची पराकाष्ठा करून कामें चालवीत असतात. तेव्हां अशा प्रकारच्या उत्तम कामाला बहुत वेळ लागला तरी त्यामध्यें समाधान व आनंदच मानण्याचे आम्हास विशेष कारणें दिसतात. असें असून मि. बुल्क यांस ही न्याय पद्धति पसंत नाहीं हें विचारवैचित्र्या पेक्षां कमी गुणग्राहीपणाचें द्योतक आहे असें आम्हास वाटतें. राजश्री दांडेकर यांच्या तोडीचें चिकट व चौकस काम मि. हेअर यांचेंही असे पण त्याबद्दल अवाक्षर नाहीं हें पाहून आश्चर्य वाटतें. दुसरा मुद्दा वकिलांच्या संबंधानें आहे वकील काम चालविण्यास उभे असले म्हणजे काम संपण्यास थोडा विलंब लागतो हें खरें पण न्यायाच्या कारभाराला तें वाईट आहे अशी आमची समजूत नाहीं. सिव्हिल जज्जाकडील खजिन्याचें व फौजदारीचें काम कमी करण्या विषयीं बाही जिल्ह्यांत खटपटी चालू आहेत हें ठीक आहे आणि हल्लीं कोडतांनीं कामें वाढल्यामुळें कामगार मंडळी वाढविण्या संबंधानें मि. हक्रियट साहेबांनीं पूर्ण चौकशी केली आहे तेव्हां त्या संबंधानें कांहीं नवीन तजवीज लवकरच होतील अशी आशा आहे.

---

यंदा मध्यंतरीं पाऊस पडला नव्हता तेव्हां दुष्काळ वटारून पाहतो कीं काय अशी धास्ती पडली होती. पण ईश्वरी प्रसादानें तो अनिष्ट काल टळला हें फार उत्तम झालें. सध्यां रयतेची स्थिति अगदी शोचनीय व कष्टमय आहे. धान्याचा सांठा बिलकूल नाहीं. शेतांत उभें पीक असतांनाच सावकारी किंवा सरकारी तगाद्यामुळें पिकाची विक्री करावी लागते किंवा धान्य व कापूस वगैरे घरीं येई पर्यंत दम धरण्याची ताकद असली तरी लवकरच शेतांतल्या मालाला बाजार दाखवावा लागतो. धान्याचा सांठा शेतकऱ्या जवळ नाहीं. आणि सावकारा जवळही नाहीं. मोठ्या मारामारीनें या हंगामा पासून त्या हंगामापर्यंत कशीबशी बेगमी केलेली असते आणि या खेरीज बाकीचें धान्य बाहेर द्वीपान्तरीं जातें. रयत मोठ्या जिकिरीला आली आहे. आमचें मरण उद्यांवर या न्यायानें कालाची लोटालोट चालली आहे. आणि असा बिकट जीवनकलह उत्तरोत्तर आमच्या वऱ्हाड सारख्या शेतकीच्या प्रांतांत फार जांचतो. एक साल नीट पिकपाणी झालें नाहीं तर निम्मी रयत हवालदील होऊन जाते.

वऱ्हाड प्रांतांत शेतकऱ्या संबंधानें कांहीं सवलती सरकारांतून योग्य वेळेवर मिळाल्या नाहींत तर या प्रांताची दैना पराकाष्ठेची होईल. सरकारांतून सवलती दोन मार्गांनीं मिळाल्या पाहिजेत. पहिला मार्ग न्यायकोर्टांच्या हातून चालू झाला पाहिजे. दक्षिणेंतील शेतकऱ्याचा कायदा जसा आहे तसा आमच्या प्रांतासाठीं निराळा कायदा केला जावा. आणि मुलकी खात्या कडून दुसरा मार्ग खुला व्हावयाला पाहिजे. या मार्गांत मुख्य तीन गोष्टी येतात पहिली बाब शेतऱ्यास कमी व माफक व्याजानें कर्ज मिळावें ही होय. सरकारचीच किंवा सरकारच्याच आश्रया खालीं शेतकऱ्यांची पेढी निघाली पाहिजे. अशी पेढी जों पर्यंत निघत नाहीं तों पर्यंत शेतकऱ्यास काबाडकष्ट करूनही पोटभर खाण्यास मिळणार नाहीं. शेतकऱ्यांच्या जमिनी न विकल्या जातील अशा विषयीं कडक मुलकी नियम पाहिजेत. कर्नल मेकंझी जुडिशिअल कमिशनर असतांनाच त्यांनीं हें संकट ध्वनित केलें होतें. त्यांच्या पक्कें लक्ष्यांत आलें होतें कीं, जमिनी बहुतक शेतकऱ्यांच्या हातून भराभर जात चालल्या आहेत आणि शेतकरी म्हणजे शेतांतले मोलमजूरदार होत आहेत. दहा वर्षां पूर्वीं भावी संकटाचीं पूर्व चिन्हें म्हणून ही गोष्ट कर्नल मेकंझी यांच्या लक्ष्यांत आली होती. परंतु सांप्रतची शेतऱ्यांची स्थिती पक्केपणीं ओळखली म्हणजे जमिनी शेतकऱ्यांच्या हातांतून हिरावल्या जात आहेत हें मोठें अरिष्टकारक वाटेल. तिसरी बाब सारा वसूल करण्या संबंधानें आहे. शेत पिको अगर बुडो, वायदा हा चुकावयाचा नाहीं किंवा पै भर कमी व्हावयाचा नाहीं आणि शिवाय तो देण्याची तारीख ही मागे पुढें व्हावयाची नाहीं. असा जबरदस्त मुलकी कारभार आहे. साऱ्या संबंधानें कांहीं उणें पडलें कीं तत्काळ जमिनीचा लिलाव होऊन व कुठचें घरदार विकलें जाऊन पैसा वसूल केला जातो. जन्मभर पोट शेतीवर चालवावयाचें असतें तेव्हां ती नाहींशी झाली कसें होणार म्हणजे मग इतकी रात्रंदिवस शेती वरांत च कायम राखण्या विषयीं लोक दक्षता ठेवितात तथापि कर्जावरील व्याजाचा व वायद्याचा थोडा भरधांव सुटलेला असतो आणि त्याच्या टांपाखालीं व दुगाण्या खालीं वापाळ होऊन शेतकऱ्यास आपली जमीन दुसऱ्याच्या स्वाधीन करावी लागते. चौदा वर्षांपूर्वी या प्रश्नाचा खल दुष्काळ—कमिशनानें केला होता आणि त्यावेळीं कमिशननें अभिप्राय असा दिला होता कीं शेतकऱ्यांची सुस्थिती राखणें म्हणजे शेतकरी, त्यांचीं कुटुंबें, व गुरें ढोरें यांच्या खाण्यापिण्याचा योग्य बंदोबस्त झाला पाहिजे. आणि शेतीचीं आऊतें, पाण्याचा पुरवठा व काम धंद्याच्या सोयी हीं सर्व साधनें मुबलक पाहिजेत. यापैकीं कोणतेंही कमी पडलें तरी शेती नीट चालणार नाहीं.

सारांश, सरकारी सारा जबर बसला, सारा वसूल करण्यांत कडक नजर ठेविली, कर्जाऊ पैसा माफक व्याजानें मिळाला नाहीं, आणि पीकपाणी बरोबर झालें नाहीं तर शेतकऱ्यांची निभावणूक व्हावी म्हणून सरकारनें वेळेवरच उदार बुद्धीनें कांहीं सवलती दिल्या पाहिजेत.

आम्ही सरकारापाशीं जी मदत वर मागत आहों ती मिळण्याची आशा आम्हास नाहींच पण हल्लीं जो सारा वाढविण्याचा तडाखा चालविला आहे त्यामुळें सरकारच्या विषयीं आमची अगदींच निराशा झाली आहे. वऱ्हाड सार्वजनिक सभेनें गुदस्तां प्रचंड लोकसभा भरविली होती आणि स्थानिक सरकारापाशीं मोठ्यानें टाहो फोडला होता परंतु मनोराज्यांतला प्रकार झाला! लोकमताला झुगारून तीस वर्षांची जमाबंदी पुरी होतांच सारा वाढविण्याचा सरकारनें संकल्प केला आणि तो अमलांतही येत चालला आहे हें पाहून फार वाईट वाटतें.

---

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास फार थोड्या लोकांस माहित आहे. अडीचशें वर्षांपूर्वींचा इतिहास जसा उपलब्ध असावा तसा नाहीं. जी थोडी बहुत माहिती ग्रंथान्तरीं आढळते ती अगदी संक्षिप्त, अर्धवट व विसंगत अशी आहे. इतिहास लेखनाला लागणाऱ्या कांहीं बखरी आख्यायिका वगैरे साधनें दुर्मिळतेनें व कष्टानें उपयोगांत आणण्या सारखीं आहेत पण इतिहास लेखन आमच्या राष्ट्रा संबंधानें सर्वथैव लोपल्या प्रमाणें झालें आहे. अलिकडे इतिहासाविषयक कांहीं चरित्रें प्रसिद्ध होत आहेत तीं मात्र समग्र व साद्यंत हिंदुस्थानच्या इतिहासाला चांगले घटकावयव बनतील अशी खात्री आहे. नूतन बहुश्रुत चरित्रकारांच्या हातून जी अपूर्व ग्रंथमाला बाहेर पडत आहे तिजवरून आमच्या पूर्वीच्या इतिहास वाचनानें बनलेल्या कल्पना व शाळोपयोगी क्रमिक इतिहास ग्रंथावरून पक्कीं झालेलीं अनुमानें हीं एकतर्फी सत्याला सोडून व अविश्वसनीय होतीं असा आतां पक्का ग्रह होत चालला आहे. आमचे विचार कसे पालटत आहेत याला अगदीं अलिकडचा दाखला म्हटला म्हणजे नामदार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनीं श्री शिवाजी महाराजांच्या राज्यकर्तृत्वा विषयीं रायल एशिआटिक सोसाएटी पुढें वाचलेला निबंध होय. शिवाजी महाराज राज्यकर्ते या नात्यानें कसे काय होऊन गेले याची कल्पनाच हा निबंध वाचला नव्हता तोंपर्यंत कांहीं एक नव्हती असें म्हणण्यास कांहींएक हरकत नाहीं. गुरुमुखापासून खरी विद्याच समजते. तद्वत नामदार रानडे यांचा निबंध वाचून शिवाजी महाराजांचें अलौकिक राज्यकर्तृत्व वाचकांच्या झटकन लक्षांत येईल.

---

इंडियन बजेटा संबंधानें पार्लमेंटांत कांहींच विचार होत नाहीं असें म्हटलें तरी फारसा प्रत्यवाय नाहीं. इंडियन बजेट निघालें म्हणजे सर्व सभासदांस सुटीचा घंटा झाल्यासारखी होते. नामदार फौलर हे मागें बोलले कीं पार्लमेंटांतील प्रत्येक सभासद इंडिया तर्फे सभासद आहे, आणि ही जबाबदारी प्रत्येकानें ओळखून वागलें पाहिजे. ही प्रौढ उक्ती कोणीकडे आणि इंडियन बजेट ज्या वेळीं रिकामें सभागृह कोणीकडे! या दोन गोष्टीचा बिलकूल मेळ बसत नाहीं. लार्ड हामिल्टन बोलले कीं बजेटा प्रमाणें ४॥ लाख रुपये खर्च भागून शिल्लक राहतील असा अंदाज होता पण चित्रळच्या मोहिमेमुळें ११ कोट रुपयांची तूट पडली आहे. स्टेट सेक्रेटरींचें संभाषण सर्व सामान्य विधानांनीं परिपूर्ण होतें पण त्यांत विशेष महत्वाची गोष्ट विलायतच्या कपड्यावरील जकाती संबंधानें होती. लार्ड हामिल्टन म्हणाले कीं खर्चाची व जमेची तोंडमिळवणी नीटशी झाली व कर कमी करण्याची थोडी बहुत संधी मिळाली म्हणजे प्रथम मिठावरील कर कमी करण्यांत येईल, अलम दुनियेंत इतरत्र मिठासारख्या अत्यावश्यक पदार्थांवर कर नाहीं आणि इंडियांत हाच कर जबर आहे हें आमचें सरकार चांगलें जाणतें हें कळविण्यास आनंद वाटतो. मिठावरील कर प्रथम कमी होईल असें आश्वासन मिळाल्यानें मांचेस्टरवाल्यास हा अप्रत्यक्ष जबाब समजावयाचा कीं विलायती सुतावरील व कपड्यावरील जकात ही सध्यां बंद करण्यांत येणार नाहीं. हीच गोष्ट सरळ व रीतीची आहे पण त्याच्या उलट प्रकार होत होता म्हणून सर्व जो चळवळ उडाली होती तिची यथार्थ कल्पना सरकारनें केली हें समाधानकारक होय.

---

पुण्यास यंदा पांचवी औद्योगिक परिषद भरली होती आणि तिचा समारंभ निर्विघ्नपणें शेवटास गेला हें चांगलें झालें. या परिषदे संबंधानें आमच्या प्रांतीं कडे मात्र हालचाल नसते आणि तिच्या बद्दल इकडील लोकांची आस्थाही दिसून येत नाहीं. हें आमच्या प्रांतस्थ पुढारी गृहस्थांस शोभत नाहीं. यासाली परिषदेची हकीकत फार संक्षेपानें कळली आणि कांहीं वार्षिकी मामुली प्रमाणें महत्वाचे ठराव करण्यांत आले आहेत.

करवीर संस्थानची औद्योगिक पहाणी होऊन एक उपयुक्त रिपोर्ट तयार झाला आहे. त्या धर्तीवर मुंबई इलाख्याची पहाणी करण्या विषयीं सरकारास विनंती करावी असें ठरविण्यांत आलें. पुण्यास एक रसायनशाळा स्थापित करण्यासाठीं वर्गणी उभारण्यांत यावी असें ठरलें. देशी कापडाच्या व्यापारास उत्तेजन मिळावें, रेल्वेचें मांडवल पौंडामध्यें न उभारतां रुपयाच्या नाण्यानें उभारावें, संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यास अधिक सवलती असाव्या आणि खेड्या पाड्यांतून प्राथमिक शिक्षण मोफत दिलें जावें इत्यादि महत्वाच्या गोष्टी संबंधानें सरकारास विनंती करावी.

वरील ठरावावरून या परिषदेच्या कामाची दिशा चांगली कळून येईल. अशा प्रका-

रची संस्था सर्वत्र वर्षानुवर्ष लोकप्रिय होत गेल्यानें भावी लाभ बहुत होण्या सारखे आहेत परंतु राजाश्रया वरील सर्व व्यर्थ आहे. सरकार वकेल तो सुदीन मानला पाहिजे.

पुण्यास सर्कटी व विघ्नसंतोषी लोक बहुत आहेत. गेल्या दहा वर्षांत ज्या कल्पनेला नाटसा थारा कोठेंच मिळाला नाहीं ती कल्पना आज मितीला पुर्णकरास सुरुवात आहे. व वहावून सोडीत आहे. ही मानसिक बाधा इतकीच आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत समाजिक परिषद भरूं देऊं नये, आणि जर राजकीय व सामाजिक सभा एकाच राष्ट्रीय मंडपांत भरवावयाच्या असल्या तर कांहीं बिधरलेली मंडळी वर्गणी देण्याचें नाकारतात. व दुसऱ्यास गतानुगतिक करण्या साठीं मंत्र जपण्यासही माघर घेत नाहीं. नामदार महादेव गोविंद रानडे यांनीं लाहोरच्या सभेंत दृष्टान्ताच्या रूपानें कळविल्या प्रमाणें राजकीय सभा व सामाजिक सभा या आपल्या जनसमुहाच्या दोन आया आहेत. आणि उभयतांच्या सल्लपत्रांनें आपली सुधारणा होणार आहे. हा विषय अनेक वेळां चर्चित झाला आहे तेव्हां अखेरचा निकाल प्रसिद्ध करण्या पलिकडे आधिक लिहिण्याचें आह्मास प्रयोजन दिसत नाहीं. वऱ्हाड प्रांताचें लोकमत राजकीय व समाजिक सभा एकाच मंडपांत भराव्या असें असल्या विषयीं सार्वजनिक सभेनें पूर्वीच लिहून कळविलें आहे.

## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 30, 1895

### Sir A Miller's Bill

Finding probably that Sir C. Elliot's Jury Bill was dropped owing to popular agitation Sir A. Miller introduces a new device of encroaching on the privileges of the Jury. The latter aims at curtailing the powers of the Jury but in a more judicious manner of bringing them to yield to a scrutiny of questions put by the Judge.

In 1892 the Times had spoken on the Jury question and had spoken against the Government of India. The opinions expressed by that powerful national organ always command the greatest weight; but to its opinion on the Jury question more than ordinary importance was attached. Seldom does the Times express itself against the powers that be. The fact that it did so, then may be taken as an indication of the prevailing opinion at the India office. The present bill aims at hampering the Jury by a set of cross examinations and thus at materially modifying the right of trials by Jury.

If official statistics were examined, it may be inferred that they contain no evidence whatever of the defeat of justice resulting from trial by Jury. It acknowledges that the ideas of personal and political liberty are the same in India as in the United Kingdom. It has a sort of constitutional value. So long as no extraneous and special influences intervene to render the system worthless or pernicious there can be no reason for the privilege being curtailed, withdrawn, or modified. No European or Native has complained against the operation of the system. It is not of course meant that an outcry of the European or Anglo Indian element is a criterion for the modification of the system. But as there is an apparent diversity of interests between the rulers and the ruled that class generally decries whatever may put it on the same level with that ruled. That it is singularly silent proves that the system is alike palatable to the rulers as well as the ruled. To the Government of India whose pretexts are often fragile and unsound, even this pretext is wanting.

As it is expected every effort will be made by the Government of India, to vindicate its action and all sorts of plausible arguments will be put forward to mislead public opinion. The Government's strange attempt, to disparage the whole institution of trial by Jury, bore no fruit in 1892 The system of trial by Jury before the court Session, has been acknowledged to be an established form of the machinery of justice in this country, though with certain modifications. It then follows that the system must not be tampered with at the suggestion of every whim of the person holding the office of a Governor or a Lieutenant Governor for the time being without his assigning any adequate cause for his interference and without any previous intimation to the public. If the system be unimportant why should the Government be so anxious to improve it? Why should its shadow be suffered to remain while its substance is to be destroyed? The ideas of personal and political liberty are identical in all parts of the British Empire and whether in India, the system of trial by Jury be a part of the established judicial Machinery or not, Her Majesty's subjects should not be deprived of a right that they have enjoyed for over thirty years and they have learnt to value highly.

By subjecting the jury to a vile legardimain of a series of cross examinations would materially affect the present privilege and tend to make the presiding judge independent of the Jury.

Against this proposed arrangement the people have a right strongly to remonstrate in a memorial to the Secretary of State and we have no doubt that whatever may be the view taken by the *narrowminded* bureaucracy in this country, the people in England will see through the danger of conferring this additional power on the judge which would enable him to encroach on powers never meant to be his own. It remains to be seen how the ensuing Congress deals with this important proposal which may be compared to a beautiful rose having a serpent lurking under it.

---

An interview is a nice devise to throw a feeler. Great leading men are not only the exponents of the public opinion but they take an active part in its formation as well. Besides an interview has a special advantage. It removes the bar of conventional formalities and keeps the speaker in his happy mood of familiar talk. Now that Mr. Dadabhoy Navoroji is unseated in the Parliament it will interest many persons to read and study inwardly his views in general on Indian politics and also to have before themselves some model ideal of the grand old man of India whether the ultimate result be its acceptance or rejection. The Rev. Harris M. A. has published the subject—matter of his interview and we promise to publish next week the gloomy prospects that threaten the Indian horizon and the indications of a wise policy that will avert them.

---

The Judicial Commissioner has made some observations on the arrears of cases in the Akola and Amrooti districts. We give them below for what they are worth with a dissentient voice thereon:—

"The Akola district had the largest pending file, 1,669 cases, of which 309 are over three months' duration. It is attributed to the large number of cases filed in the last quiter of the year, but I am not satisfied with the explanation. The rate of progres has been slow all the year brough in Akola, and I found occasion to be dissatisfied with the dilatory way in which the work in the Civil Judge's court was disposed of at my inspection The courts in Akola are numerous, especially at head quarters, and better progress should be made with cases."

"In Amraoti the pending file has risen from 1,046 to 1112, and of this number 553 are over three months' duration. There have been a good many changes of the staff in Amraoti and the Deputy Commissioner attributes the slow progress to this cause with some show of reason; but Amraoti is always rather hampered by pleaders and other causes, and I regret to see that Akola is showing a similar tendency."

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत उघाडी बरी आहे. मधून मधून ढग पुष्कळ येतात, मनस्वी उकडते आणि थोडा थोडा पाऊसही पडतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. पीकें चांगलीं जोमांत आहेत.

कर्नेल लेन साहेब यांस डाक्टरांनीं सल्ला दिली कीं त्यांनीं शरिरस्वास्थ्या साठीं इंडिया सोडून विलायतेस गेलें पाहिजे. म्हणून ते पेनशन घेण्याच्या मुदती पूर्वीच तीन महिने रजेवर विलायतेस जाण्यासाठीं गेल्या गुरुवारीं वऱ्हाडांतून गेले. साहेब मजकूर जुन्या सरदार मंडळी पैकीं होते आणि त्यांच्या तोडीचा कार्यदक्ष, कुशल व न्यायी अंमलदार विरळा आढळेल !

कर्नल लेन साहेब यांच्या जागेंचें काम क्याप्टन बारन हेस्टिंग हे पाहूं लागले. या गृहस्थाची नेमणूक इन्स्पेक्टर जनरलच्या जागीं होत असल्या विषयीं गताकीं आह्मीं प्रसिद्ध केलेंच होतें.

क्याप्टन बारन हेस्टिंग यांचें बुलढाण्याच्या डेपुटी कमिशनरचें काम लेफ्टनंट मारिस हे पाहत आहेत. या बदलीबदलीच्या कायमच्या नेमणुका अद्याप बाहेर आल्या नाहींत.

एक इसम वकिलापाशीं दलाली मागत होता आणि त्यानें दलालीचे म्हणून ६० रुपये कुळानें वकीलास पाठविलेल्या ३०० रुपया पैकीं ठेवून घेतले असें शाबित झा-

ल्यावरून उमरावतीचे असिस्टंट कमिशनर मि. अजीजुद्दीन माजिस्ट्रेट वर्ग १ यांनीं त्या दलालास सहा महिन्याची कैद व दोनशें रुपये दंड केल्याविषयीं कळतें. हें उदाहरण वकीलांनीं व दलालांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

उमरावती जिल्ह्याचे पोस्टल इनस्पेक्टर रा. रा. आबाराव महादेव यांनीं सहा महिन्यांची आजारीपणाची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं रा. रा. बाबू केदारनाथ दत्त पोस्ट मास्तर, यवतमाळ यांस नेमिलें.

---

### नोटीस

रा. रा. शंकर केशव, अनंत केशव, चिंतामण केशव व मयत विष्णु केशव यांचा वारस श्रीपाद विष्णु राहणार नागपूर यांस आणि इतर सर्वत्र लोकांस या लेखान्वयें कळविण्यांत येते कीं:—

अकोलें येथील 'काळयाच्या हवेली' नजिक एक राहतें घर ज्याच्या चतुःसीमा येणें प्रमाणें:— उत्तरेस नारू पटवेकऱ्याचें घर, दक्षिणेस नारायण हरी याचें घर, पूर्वेस व पश्चिमेस दोन गल्ल्या आहेत. हें घर रा. रा. वासुदेव केशव राहतेकर यांनीं खालीं सही करणाऱ्यांपाशीं ८०० आठशें रुपयांस खरेदी देण्याचा करार करून २५ पंचवीस रुपये इसाऱ्या ऐवजीं मोबदला करून घेतले आहेत राजश्री वासुदेवराव यांनीं या विक्री विषयीं असा जिम्मा घेतला आहे कीं या घरावर दुसऱ्या कोणाची संपूर्ण किंवा अंशतः मालकी नाहीं किंवा दुसऱ्या कोणाचा गहाण वैगेरे कोणत्याही प्रकारचा काडीमात्र हक्क नाहीं; आणि खरेदीखत बिनबोभाट करून देऊन सदरहु स्थावर इस्टेट तिच्यावरील मालकीच्या सर्व हक्कासह आमच्या ताब्यात द्यावी येणेंप्रमाणें करार पुरा न झाल्यास आमची सर्व नुकसानी व घर पूर्णपणें ताब्यांत येईपर्यंत होण्यास खर्च राजश्री वासुदेवराव यांच्या शिरावर बसवून ती रक्कम खरेदीच्या ८०० आठशें रुपयांत मुजरा घ्यावयाची आहे.

तर वरील चार गृहस्थांस व इतर सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं ज्या कोणाचा कांहीं हक्क त्या घरावर असेल त्यांनीं नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून पंधरा दिवसांचे आंत आपले हक्क लेखी कैफियतेनें आह्मास कळवावें म्हणजे खाजगी रितीनें किंवा कोर्ट मार्फत काम चालवून राजश्री वासुदेवराव यांच्या कडून त्याच्या हक्काची निरवानिरव करविण्यांत येईल कळावें. ता. २८ सप्तेम्बर १८९५ इ.

(सही)

वासुदेवराव चिमणाजी कोल्हटकर

दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार.

मुंबई युनिव्हरसिटीचे व्हाइस चान्सलर डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा दोन वर्षांची व्हाईस चान्सलरपणाची मुदत संपल्यामुळें त्याच्या जागीं नामदार न्यायमूर्ती जार्डिन यांची नेमणूक मुंबई सरकारनें केली आहे. हे गृहस्थ लोकमतानेंच पूर्वी पसंत ठरलेले होते आणि त्यांचीच निवड सरकारांतून झाली ही गोष्ट ठीक झाली.

चित्राळकडे एक नवीनच जागा शोधून काढली असून, तेथें इंग्रजसरकार छावणी करणार आहेत. यामुळें थोड्या लष्करांत चांगला बंदोबस्त होईल असें ह्मणतात.

अमेरिकेंतील कित्येक कापडाच्या गिरणींचे मालक, आपल्या गिरण्या जपानांत नेण्याच्या विचारांत आहेत.

चीनच्या नजीक बोर्नियो बेट आहे. तेथें कापूस झपाटून पिकवून, तो चीनमध्यें पाठविण्याचा तेथील व्यापाऱ्यांचा हेतु आहे. हें बेट इंग्रजांच्याच स्वाधीन आहे.

उसाचा उपयोग गूळ करण्यापेक्षां साखरेकडे केल्यास जास्त उत्पन्न होईल. परंतु साकर केल्यास, त्यांतून काकवी निघते तिचा खप झाला पाहिजे अशी अडचण पुढें आणण्यांत येत असेत. त्या अडचणीचाही सुरेख व फार हितावह निकाल लागला आहे. कारण, काकवी रेतींत मिश्रण करून, त्याचें बांधकाम केल्यास ते चुन्यापेक्षां तर अहेच, पण सिमेंटपेक्षांही जास्त बळकट व उत्कृष्ट होतें. यापासून हिंदुस्थानचें पुष्कळ कल्याण होईल. एक तर खसार उत्पन्न झाल्यानें बाहेरचा माल कमी येईल व सिमिट बाह्य प्रदेशांतून येते तेंही बंद होईल.

पारीस येथें मुसलमानाची एक मशीद करण्याबद्दल फ्रेंच राजद्वारी लोकांनीं, मुसलमानांचें लक्ष्य आपल्याकडे लागावें ह्मणून खटपट चालविली आहे. या कामास तुर्कीच्या सुल्तानानें ३॥ लाख रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

बंगाल प्रांतांतील छोटा नागपूर जिल्ह्यांत सोन्याच्या खाणीचा संपूर्ण तपास करण्याकरितां सरकार कांहीं तजवीज करणार असून, जमल्यास खाणीचें कामही सुरू करविणार आहे.

रशिया, फ्रान्स व जर्मनी या तिन्ही राष्ट्रांचा एकजीव होऊन, त्यांचा इंग्लंडवर मोठा कटाक्ष असल्याबद्दल सध्या जोरानें चर्चा सुरू आहे.

मि. बाल्फर यांच्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, सोनें व रुपें असें दोन्हीं प्रकारचें नाणें सुरू करण्याच्या खटपटीस कांहीं कमीपणा आला असावा अथवा येण्याचा संभव आहे. श्रीस. वि,

पेकीन येथील 'गॅझेट' पत्र आज नऊशें वर्षें चाललें असून तितक्या मुदतींत त्याच्या १८०० एडिटरांचा त्यांनीं सरकारला न आवडतील असे लेख लिहिल्यामुळें शिरच्छेद झालेला आहे.

हल्लीं थोडे दिवस बहोदें येथें मकरपुऱ्यांतील टॉवरवर कधीं कधीं एक 'सिल्व्हर टौन प्रोजेक्टर' नांवाचा पांचशें मेणबत्त्यांच्या उजेडासारखा प्रकाश पाडणारा दिवा महाराजांच्या हुकुमानें लावण्यांत येत असतो; त्याच्या योगानें एक मैलापर्यंत वाचतां येतें आणि तो पांच मैलावरूनही दिसतो.

जलालाबादेकडून आलेल्या बातम्यांवरून समजतें कीं, वझीरी लोकांपैकीं पुष्कळ जातींनीं येत्या हिवाळ्यांत ब्रिटिश सरकारशी लढण्याचा ठराव केला आहे. दि.

प्रसिद्ध लॉर्ड वार्नर चाकरी सोडून गेल्या विलायतेस गेले.

पोरबंदरास कांहीं दंगा झाल्यास तो मोडण्याकरतां कांहीं लष्करी लोक तेथें आणून ठेवले आहेत.

पामीर सरहद्द कायम करणाऱ्या इंग्रजी व रशियन कामदारांत कांहीं मतभेद होऊन वेबनाव झाला होता व त्यामुळें सरहद्द कायम करण्याचें काम बंद पडून रशियन कामदार तें काम टाकून परत जाण्यासही निघाला होता; पण मतभेदाच्या मुद्याबद्दल उभय सरकाराकडे लागलीच लिहून जाऊन त्याचा निकाल झाला व त्या रशियन कामदाराचें परत जाणें रहित झालें असें समजतें.

चीनच्या हद्दींत कुचेंग येथें ख्रिस्ती लोकांची जी कत्तल झाली त्याबद्दल तेथील गव्हरनर व इतर बडे कामदार यांस जबाबदार धरण्याचा इंग्लंडचे प्रधान लार्ड सालिसबरी यांचा विचार आहे.

स्पेनचें एक गलबत बुडून वरील खलाशी वगैरे ४१ माणसें मेलीं.

युरोपांत एक बारिस्टर होडींत बसून मासांची शिकार करीत असतां त्यांचे घड्याळ समुद्रांत पडून हरवलें. आठ दिवसांनीं तो पुन्हा तेथेंच मासे मारण्यास गेला असतां एक मासा सांपडला व त्याच्या पोटांत तें घड्याळ सांपडलें. घड्याळ चालतच होतें.

कोंगो संस्थानांत जिकडे तिकडे दंगे सुरू झाले असून बेलजमचा जेथें कडक बंदोबस्त आहे तेथेंही दंगे चालू असून क्या. पेटझर यांस त्यांच्याच ताब्यांतल्या शिपायांनीं ठार केलें.

दोघां अर्मेनियन माणसांनीं टर्कीच्या एका माणसास ठार केला व त्याबद्दल तपास चालू आहे.

फ्रेंचांचें एक व्यापारी मंडळ चीनांत जाण्याकरितां निघालें आहे.

चीनच्या तुर्कस्थान प्रांतांत तर्फेनें रशियानें आपलें पोलिटिकल ठाणें स्थापन केलें व त्या पोलिटिकल कामदाराच्या रक्षणार्थ कांहीं फौजही तेथें पाठविण्याचें ठरविलें आहे.

जपानानें चीनचा लिओटंग प्रांत सोडावा असें जें रशिया व फ्रांन्स यांचें ह्मणणें आहे त्यांत जर्मनीही सामील झाला.

व्यवस्थित रितीनें तयार झालेल्या लूटफाट करणाऱ्या वेगळाल्या सहा टोळ्या नाथिचद्रान, चाकर, अलेकझांड्रीपल व नोंबोबाजेट या चार प्रांतांत शिरल्या व त्यांणीं त्या प्रांतांतील गरीब शेतकऱ्यांचीं खेडीं लुटून जाळून पेटवून टाकलीं व बायका मुलांस मारलें. ही बातमी शेतांत खपत असलेल्या शेतकऱ्यांस कळल्यावर ते आपआपल्या घरीं येऊन पाहातात तों त्यांचीं घरेंदारें निकाल झाल्याचीं आढळून तरुण बायका मुलींचा पत्ता नाहीं असें आढळलें. या दंग्याच्या बंदोबस्तार्थ एरिवान प्रांताच्या गव्हरनरानें लष्करी लोक बढविले आहेत. हे बहुतेक लुटारू मुसलमान असून हत्यारबंद होते. त्या प्रांताची प्राव्हिन्शीयल फौज १,७६,००० असून ती या लुटारूवर स्वारी करणार आहे असें टिफ्लिसची १९ आगष्टची बातमी सांगते. अ० द०

## चांदीचीं भांडीं

श्रीक्षेत्र नासिक येथें तयार झालेली हरएक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम. चीनई पाट १७॥ पेनी. चांदीबद्दल चौकशी करून घ्या. लिहिल्याप्रमाणें नसल्यास डाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे. १ तांटें, तांबे, गडवे, पेले, मुंबईपात्रें, फुलपात्रें, वाट्या. पंचपात्रें, द्रोन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सर्व सामानाचा भाव दर तोळ्यास ८-॥। आणि वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ देव्हा उपकरणी देवपुजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारिक सामानाचा भाव दर तो. ८=। आणे वरताळ्यानें देऊं—३ तबकें चौफुले अतर दाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ८=॥ आणे प्रमाणें वरताळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठुश्या वजरटीका सुद्धां घाटघडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारें कळेल—नासिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यांत आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्यापाशीं अडत ठेवणें असेल अगर व्यापाऱ्यास हर वेळीं विक्री करितां मात्र पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरताळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेल्वे रेग्युलेटर असून कोट फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क (नासिक सुयसे मेड मालकाचें नांव) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षांची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नेंही पाठविलें जाईल.

पत्ता—उदेचंद मुळचंद छाजेड फुलगली पुलावर नासिक सिटी.

## नोटिस

नोटीस— शिवलाल गुलाबचंद मारवाडी मौजे निंब ता० बाळापूर जि० अकोला. यांस दुकानचे मालक वहिवाटदार कस्तुरचंद हनवंतराम वल्द गुलाबचंद मारवाडी यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुह्मापासून शेत १ मौजे हिंगण ता० बाळापूर एथील रकम रुपये ५०० स सालबंदीचे करारानें घेतलें होतें. त्या सालबंद्या पैकी वसूल जातां ३०० रुपयाच्या सालबंद्या पडीत झाल्या. त्या रुपया एकत्री आणि नगदी २९० मिळून ५९० रुपयाचे दुसरे गाहाणखत मजपासून लिहून घेतलें आहे त्या दस्तैवजा पैकी २९० रुपये तुह्मी आह्मास नगदी द्यावे असें ठरविलें होतें त्या प्रमाणें तुह्मी आह्मांस ते रुपये मी पुष्कळ वेळ मागितलें तरी आज पावेतो दिले नाहींत. आतां तुमचे सांगण्यावर आमचा भरंवसा असल्यामुळें सबरजिस्टर पुढें दस्तैवजा प्रमाणें भरणा कबूल केला परंतु घरीं देण्याचे ते २९० रुपये दिले नाहींत करितां या नोटिशीनें तुह्मास असें कळविलें जाते कीं ही नोटीस पावल्या दिवसा पासून १८ दिवसांचे आंत तुह्मी आह्मांस सदहू रकम रुपये २९० आज पावेतो आमचे व्याजाचे शर्ती प्रमाणें हिशेबानें रकम द्यावी. नाहीं तर तुमचे पाशी असलेलें गाहाणखत पोकळ आहे असें समजावें. आणि आह्मांस तुह्मी रकम रुपये ३०० शिवाय दस्तैवजाचे तारखे पासून जें व्याज होईल तितके एकूण रकम रुपये तुह्मी आमचे पासून घेऊन जावे. जर तुह्मी न घेतल्यास आज तारखेपासून तुमचे रकमेचे व्याज आह्मी देणार नाहीं.

जे शेत आह्मी तुमचे पासून खरेदी घेतलेले त्याबद्दल कोर्टांत दावा चालल्यामुळें जो खर्च झाला आहे तो तुह्मी द्यावा असें कबूल केल्यामुळें तुह्मांपासून तो घेणें राहिला आहे तो मुजरा द्यावा. कळावे तारीख २५ माहे सप्टेंबर सन १८९५ इ०

(सहीची निशाणी)

पुर्णाजी वल्लद कर्णाजी कुणबी राहणार निंब ता० बाळापूर निशाणी

वखर.

## उत्तम सोप

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [व्यापारी अथवा खासगत] सोलापूर येथे सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्र्ज्या (कच्चे व पक्के रंगाच्या) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना कलाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.


आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये

सदर बाजार, सोलापूर

## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ०१० आज्ञाशद्व मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पोतदार यांजकडे अगर आह्मांकडे.



गोविंद भा. ओक

वाशिम, वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.